४४

# आमचे मुख्यमंत्री





M352.233095
Ray
018488

M352.2330954792/
018488
LIBRARY

# आमचे मुख्यमंत्री

श्री. बाळासाहेब खेर ते मोरारजी देसाई

*आणि*

श्री. यशवंतराव चव्हाण ते श्री. विलासराव देशमुख

Y. B. CHAVAN LIBRARY
- MUMBAI -
CALL NO..
ACC. NO.: 18488
DATE: 29/10/07

डॉ. बाळकृष्ण रायरीकर
डॉ. श्रीनिवास सुरनीस

YCP-LIB
M/352.2330954792 Ray018488

आवृत्ती पहिली : जून २००७

लेखक : **डॉ. बाळकृष्ण रायरीकर**
**डॉ. श्रीनिवास सुरनीस**
*(सर्व हक्क लेखकांचे स्वाधीन)*

मुखपृष्ठ : जान्हवी ग्राफीक्स्
दूरध्वनी - २८१६ ८१६९

प्रकाशक : **डॉ. बाळकृष्ण रायरीकर**
ब्लॉक ४, 'साफल्य',
देविदास को.ऑ.हौ.सो.,
नाथ पै नगर, घाटकोपर (पूर्व),
मुंबई ४०० ०७७.
दूरध्वनी : २५०६ ७५९४
(पुस्तके मिळण्याचे ठिकाण)

मुद्रक : श्री. विश्राम शिरवाडकर
पृथ्वी प्रकाशन,
९, आसरा, खेरवाडी, वांद्रे (पूर्व),
मुंबई ४०० ०५१.
दूरध्वनी : ९८१९१९०८०२

**मूल्य : १००/-**

## अनुक्रम :


१. प्रस्तावना - - - - - ४
२. लेखकांचे दोन शब्द - - - - - - ६
३. मुंबई आणि महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचा कार्यकाळ - - ८
४. मुख्यमंत्र्यांचे घटनात्मक स्थान - - - - १०
५. सत्तेचे रचनाशास्त्र - - - - - १३


**त्रिभाषिक मुंबई राज्य**


६. श्री. धनजी शा. कूपर - - - - १६
७. श्री. बाळासाहेब खेर - - - - १९
८. श्री. मोरारजी देसाई - - - - २८


**द्विभाषिक मुंबई राज्य / संयुक्त महाराष्ट्र**


९. श्री. यशवंतराव चव्हाण - - - - ३३
१०. श्री. एम. एस. कन्नमवार - - - - ४१
११. श्री. वसंतराव नाईक - - - - - ४४
१२. श्री. शंकरराव चव्हाण - - - - - ५०
१३. श्री. वसंतदादा पाटील- - - - - ५७
१४. श्री. शरद पवार - - - - - ६३
१५. बॅ. ए. आर. अंतुले - - - - - ७१
१६. श्री. बाबासाहेब भोसले - - - - ७५
१७. श्री. शिवाजीराव पाटील निलंगेकर - - - ७९
१८. श्री. सुधाकरराव नाईक - - - - ८३
१९. श्री. मनोहर जोशी - - - - - ८७
२०. श्री. नारायणराव राणे - - - - - ९१
२१. श्री. विलासराव देशमुख - - - - ९४
२२. श्री. सुशीलकुमारजी शिंदे - - - - १०३
२३. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री - - - - - ११०
२४. मुख्यमंत्री व त्यांचे विकासात योगदान - - - ११६
२५. मुख्यमंत्र्यांचे त्यांच्या मतदारसंघातील कार्य - - १२१
२६. परिशिष्ट : जीवनपट - - - - - १२७
२७. महाराष्ट्राचा नकाशा - - - - - १३२

## प्रस्तावना

भारतामध्ये महाराष्ट्राची गणना प्रगत राज्यांमध्ये होते ही काही योगायोगाची बाब नव्हे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरची साडेपाच शतके महाराष्ट्राला जे राजकीय स्थैर्य लाभले त्याचाच हा परिपाक आहे. या स्थैर्यामुळे महाराष्ट्राला कर्तृत्ववान अशा मुख्यमंत्र्यांची परंपरा लाभली आणि महाराष्ट्र विकासाच्या मार्गावर आरूढ झाला. हा विकास सांस्कृतिक, शैक्षणिक, औद्योगिक, शेतकी अशा सर्व पातळ्यांवर झाला. आजपर्यंतची महाराष्ट्राची या सर्व क्षेत्रांतील कामगिरी कोणत्याही मराठी माणसाला अभिमान वाटावा व इतर राज्यांना हेवा वाटावा अशीच आहे. म्हणूनच आपल्या मुख्यमंत्र्यांच्या राजकीय आणि सामाजिक कार्याची तपशीलवार नोंद घेणे अगत्याचे होते व ही नोंद घेण्याचे महत्त्वाचे कार्य या ग्रंथाद्वारे झालेले आहे.

लेखकांनी मुंबई राज्याचे पहिले मुख्यमंत्री मा. श्री. धनजी शा. कूपर (त्यावेळी त्यांना 'पंतप्रधान' असे बिरुद होते) ह्यांच्यापासून ते मा. श्री. विलासराव देशमुखांच्या कार्याचा आढावा ह्या पुस्तकामध्ये घेतलेला आहे. एका परीने पाहता महाराष्ट्राच्या स्वातंत्र्योत्तर कालखंडाचा हा संक्षिप्त इतिहास आहे. लेखकाच्याच शब्दांत सांगायचे झाले तर त्यांनी हे लेखन क्रिकेटच्या समालोचकाच्या भूमिकेतून केलेले असून वस्तुस्थितीचे वर्णन त्याने कोणतेही भाष्य न करता केलेले आहे.

लेखकांनी वस्तुस्थितीचे वर्णन करताना आणि राजकीय व सामाजिक घटनांचा अभ्यास करताना बारीकसारीक तपशीलांची जी नोंद केलेली आहे तिला दाद द्यावीशी वाटते आणि त्यांच्या प्रदीर्घ साधनेचा प्रत्यय येतो. कोणता मुख्यमंत्री विशिष्ट निवडणूक किती साली जिंकला, कोणत्या मतदारसंघातून लढला, अशा प्रकारचा तपशील सर्वसामान्य वाचकाला कदाचित कंटाळवाणा वाटेल, परंतु इतिहासाची नोंद होण्याच्या दृष्टीने ते महत्त्वाचे आहे. पॉलिटिक्स घेऊन पदवी परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना या पुस्तकाचा अतिशय उपयोग होईल याची खात्री आहे.

लेखकांनी मा. श्री. यशवंतराव चव्हाण, मा. श्री. मोरारजी देसाई, मा. श्री. शरद पवार ह्यांच्यासारख्या लोकप्रिय नेत्यांबद्दल जेवढ्या आत्मीयतेने लिहिले आहे तेवढ्याच आत्मीयतेने त्या मानाने कमी लोकप्रिय असणाऱ्या मा. श्री. बाबासाहेब भोसले, मा. श्री. शिवाजीराव पाटील यांसारख्या नेत्यांच्या कामगिरीबद्दलही लिहिले आहे. छोट्या नेत्यांची विधायक कार्ये लेखकांच्या सूक्ष्म नजरेतून सुटलेली नाहीत हे या ग्रंथांचे एक वैशिष्ट्य म्हणता येईल.

मा. मुख्यमंत्र्यांच्या खाजगी जीवनाबद्दल लिहिणे लेखकांनी वर्ज्य मानलेले दिसते आणि ते एका दृष्टीने बरोबरच आहे. कारण या पुस्तकाचा हेतू हा मा. मुख्यमंत्र्यांच्या राजकीय व सामाजिक कार्याचा आढावा घेणे हा आहे, त्यांची चरित्रे रेखाटणे हा नव्हे.

मा. मुख्यमंत्र्यांचे दोष आणि त्यांच्यापैकी काहीजणांनी केलेल्या अप्रिय कृतींचा उल्लेख करण्याचे लेखकांनी टाळलेले नाही. जे वास्तव आहे ते प्रांजलपणे आपल्यासमोर मांडलेले आहे. तसेच मूल्यमापन करताना काही ठिकाणी लेखकांची भाषा परखडही झालेली दिसते. त्यामुळे हे पुस्तक म्हणजे 'गुडी गुडी'चा प्रकार नाही हे वाचताना जाणवत राहते आणि म्हणूनच त्याची वाचनीयता मनाला भावते.

'महाराष्ट्राचा स्वातंत्र्योत्तर राजकीय प्रवास शब्दांकित करणारा अत्यंत उपयुक्त असा संदर्भग्रंथ' असे मी या पुस्तकाचे थोडक्यात वर्णन करेन.

डॉ. रायरीकरांचे आणि माझे कामगार जगतापासूनचे फार जुने संबंध असल्यामुळे आणि त्यांच्या अभ्यासू व हाती घेतलेल्या प्रत्येक कार्यात संपूर्णपणे झोकून देण्याच्या वृत्तीमुळे मला नकार देणे अगदी जिवावर आले. म्हणूनच ही प्रस्तावना. ईश्वर ह्या लेखकद्वयीस उदंड आयुष्य देवो व अनेक लिखाणे, पुस्तके व ग्रंथ त्यांच्या हातून समाजासाठी लिहून होवोत ही प्रार्थना. लेखकद्वयीस माझ्या हार्दिक शुभेच्छा.

धन्यवाद !

३० एप्रिल २००७ - नरेंद्र तिडके

## लेखकांचे दोन शब्द

गेली दोन वर्षं 'महाराष्ट्राचे मुख्यमंत्री' ह्या विषयावर आम्ही लिखाण करीत आहोत. अर्थात त्याचा हेतू प्रत्येक मुख्यमंत्र्याच्या कारकिर्दीचे विश्लेषण करून त्याचा क्रमांक लावायचा हा नाही. परिचयात्मक चरित्रे लिहिण्याचा आम्ही प्रयत्न केलेला आहे व महाराष्ट्रातील सर्व मुख्यमंत्र्यांची चरित्रे एका ठिकाणी वाचावयास मिळावी हा प्रमुख व मर्यादित हेतू हे पुस्तक लिहिण्यात आहे. तसा ग्रंथ मराठीत व इतर कोणत्याही भाषेत असलाच तर आम्हाला माहीत नाही. अर्थात प्रत्येक मुख्यमंत्र्याची वेगळी चरित्रे उपलब्ध आहेत. त्याचबरोबर महाराष्ट्रातील तेरा मंत्र्यांच्या चरित्रांची तेरा पुस्तकांची एक मालिका प्रसिद्ध झालेली आहे. महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळानेही काही मुख्यमंत्र्यांची चरित्रे लिहून घेतली आहेत. ह्या सर्व ग्रंथांचा हे पुस्तक लिहिताना आम्हाला खूप उपयोग झाला. त्यांचे ऋण आम्ही त्या त्या प्रकरणाच्या शेवटी नोंद केले आहे. विशेषतः श्री. श्रीकांत चौगुले, श्री. सोपान गाडे, श्री. बोडदे अण्णा यांचे आम्ही ऋणी आहोत. त्याचप्रमाणे 'लोकराज्य', महाराष्ट्र शासनाचे मध्यवर्ती ग्रंथालय, शासनाचेच माहिती व जनसंपर्क महासंचालनालय ह्यांनीही संदर्भ पुरविण्यात आम्हाला मोठी मदत केली.

हे पुस्तक लिहिताना आम्हाला आमच्या मित्रमंडळींचीही खूप मदत झाली. सुदैवाने आम्हाला व्यासंगी समीक्षक डॉ. य. दि. फडके ह्यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा. अरविंद टिकेकर - माजी ग्रंथपाल मुंबई विद्यापीठ, श्री. शरदजी काळे - संचालक यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, श्री. गावडे - संचालक महाराष्ट्र श्रमविज्ञान संस्था, श्री. भिरुड, श्री. माने, श्री. कृष्णकांत देसाई (एशियाटिक ग्रंथालय), डॉ. अरुण टिकेकर - माजी संपादक लोकसत्ता, ह्या सर्वांनी संदर्भ ग्रंथ पुरवून आम्हाला मोठी मदत केली आहे. त्यांच्या सहकार्याशिवाय हे पुस्तक पूर्ण झाले नसते. त्या सर्वांनी ही मदत कर्तव्यबुद्धीने केलेली असल्यामुळे त्यांना धन्यवाद देऊन आम्ही त्यांच्या योगदानाचे अवमूल्यन करीत नाही. आमचे स्नेही श्री. भाऊसाहेब मुजुमदार, श्री. अच्युत धायगुडे ह्यांनी हस्तलिखित वाचून आम्हाला बहुमोल सूचना केल्या. पुस्तकाचे मुद्रण अतिशय सुबक रीतीने केल्याबद्दल श्री. विश्राम शिरवाडकर यांचेही आभार.

एक वेळ असा विचार आला होता की ह्या चरित्रांना पुरवणी म्हणून आम्ही सर्व

मुख्यमंत्र्यांच्या मुलाखती घ्याव्यात. त्यांच्या कार्याचे त्यांनी केलेले मूल्यमापन नोंदवावे व त्यांच्या पुढील कार्याची माहिती करून घ्यावी. परंतु हा विचार आम्हाला सोडून द्यावा लागला. पहिले कारण म्हणजे डॉ. सुरनीस ह्यांचा रोजच्या कामाचा व्याप व डॉ. रायरीकर ह्यांचे वय (८७). दुसरे त्यातील काहीजण निधन पावले आहेत. (धनजी कूपर, बाळासाहेब खेर, यशवंतराव चव्हाण, मोरारजी देसाई, कन्नमवार, वसंतराव नाईक, सुधाकरराव नाईक, शंकरराव चव्हाण आणि वसंतदादा पाटील) तर बाकीच्या आठजणांपैकी श्री. शरदजी पवार, श्री. अंतुले व श्री. सुशीलकुमार शिंदे केंद्रातील मंत्रिमंडळात आहेत. त्यातील दोघांची मुख्यमंत्री म्हणून कारकीर्द अल्प आहे. श्री. बाबासाहेब भोसले, श्री. शिवाजीराव निलंगेकर पाटील आणि श्री. नारायण राणे ह्यांची कारकीर्द अल्पकाळच झाली. श्री. मनोहर जोशी व श्री. शरद पवार ह्यांची कारकीर्द बरीच टिकली व श्री. विलासराव देशमुख सध्या मुख्यमंत्रिपदावर आरूढ आहेत. म्हणजे फार तर दोन वा तीन मुख्यमंत्र्यांच्या मुलाखती घेऊन त्यांचे कार्य त्यांच्याच शब्दांत लोकांच्या पुढे मांडता आले असते. त्याप्रमाणे मतप्रदर्शन करण्याऐवजी चरित्रे वाचून प्रत्येकाने आपल्या मुख्यमंत्र्यांचे मूल्यमापन केले तर ते योग्य ठरेल अशी आमची भूमिका आहे आणि म्हणूनच आम्ही मुलाखती घेण्याचा विचार सोडून दिला. आम्ही वस्तुस्थितीचे वर्णन कोणतेही भाष्य न करता केलेले आहे. या ठिकाणी आमची भूमिका क्रिकेटच्या खेळाचे धावते समालोचन करणाऱ्या समालोचकाची आहे. अर्थात सर्व लेखनाची जबाबदारी आमचीच आहे.

ना. नरेंद्र तिडके ह्यांनी आपुलकीच्या भावनेने प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल त्यांचेही आम्ही आभार मानतो.

आम्ही केलेला प्रयत्न वाचकांना आवडेल अशी अपेक्षा आहे.

**- डॉ. बा. रं. रायरीकर**

**- डॉ. श्रीनिवास सुरनीस**

## मुंबई आणि महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचा कार्यकाळ :

**त्रिभाषिक मुंबई राज्य :**

(श्री.धनजीभाई कूपर - प्रभारी पंतप्रधान)

| | |
|---|---|
| श्री. बाळासाहेब खेर | (१५-८-१९३७ ते ३१-१०-१९३९) |
| | (३१-३-१९४६ ते २३-४-१९५२) |
| श्री. मोरारजी देसाई | (२४-४-१९५२ ते ३१-१०-१९५६) |

**द्विभाषिक मुंबई राज्य :**

| | |
|---|---|
| श्री. यशवंतराव चव्हाण | (१-११-१९५६ ते १-५-१९६०) |

**महाराष्ट्र :**

| | |
|---|---|
| श्री. यशवंतराव चव्हाण | (१ मे १९६० ते नोव्हेंबर १९, १९६२) |
| | (२ वर्षे, ६ महिने, १९ दिवस) |
| श्री. मारोतराव कन्नमवार | (२० नोव्हें. १९६२ ते २४ नोव्हें. १९६३) |
| | (१ वर्ष, ० महिने, ४ दिवस) |
| श्री. वसंतराव नाईक | (५ डिसेंबर १९६३ ते २० फेब्रुवारी १९७५) |
| | (११ वर्षे, २ महिने, १८ दिवस) |
| श्री. शंकरराव चव्हाण | (२१ फेब्रुवारी १९७५ ते १७ मे १९७७) |
| | (१२ मार्च १९८६ ते २६ जून १९८८) |
| | (३ वर्षे, ९ महिने, ४ दिवस) |
| श्री. वसंतदादा पाटील | ( १७ मे १९७७ ते १८ जुलै १९७८) |
| | (५ मार्च १९७८ ते १८ जुलै १९७८) |
| | (२ फेब्रुवारी १९८३ ते ९ मार्च १९८५) |
| | (१० मार्च १९८५ ते १ जून १९८५) |
| | (३ वर्षे, ६ महिने, ३ दिवस) |
| श्री. शरदजी पवार | (१८ जुलै १९७८ ते १० फेब्रु.१९८०) |
| | (२६ जून १९८८ ते ४ मार्च १९९०) |
| | (४ मार्च १९९० ते २५ जून १९९१) |
| | (६ मार्च १९९३ ते १४ मार्च १९९५) |

| | |
|---|---|
| श्री. शरदजी पवार | (५ वर्षे, १० महिने, १ दिवस) |
| बॅ. ए. आर. अंतुले | (९ जून १९८० ते १२ जानेवारी १९८२)<br>(१ वर्ष, ७ महिने, ४ दिवस) |
| श्री. बाबासाहेब भोसले | (२१जानेवारी १९८२ ते १ फेब्रुवारी १९८३)<br>(१ वर्ष, १२ दिवस) |
| श्री. शिवाजीराव पाटील निलंगेकर | (३जून १९८५ ते ६ मार्च १९८६)<br>(९ महिने, ५ दिवस) |
| श्री. सुधाकरराव नाईक | (२५ जून १९९१ ते २२ फेब्रुवारी १९९३)<br>(१वर्ष, ७ महिने, २८ दिवस) |
| श्री. मनोहर जोशी | (१४ मार्च १९९५ ते ३१ जाने. १९९९)<br>(३ वर्ष, १० महिने, १८दिवस) |
| श्री. नारायणराव राणे | (१फेब्रुवारी १९९९ ते १७ ऑक्टोबर १९९९)<br>(९ महिने, १८ दिवस) |
| श्री. विलासराव देशमुख | (१८ ऑक्टोबर १९९९ ते १६ जाने. २००३)<br>(३वर्ष, ३ महिने, २ दिवस)<br>( १ नोव्हेंबर २००४ ते आजतागायत ...) |
| श्री. सुशीलकुमारजी शिंदे | (१८जानेवारी २००३ ते ३० ऑक्टो.२००४)<br>( १ वर्ष, ११ महिने, १२ दिवस) |

संदर्भ :

१) लोकसत्ता, लोकरंग -२९ ऑक्टोबर २००६, पान ५ व रविवार, ऑक्टोबर २००४, पान १.

## ४. मुख्यमंत्र्यांचे घटनात्मक स्थान

१९३५ पर्यंत मंत्रिमंडळाचे प्रमुख असे कोणतेच स्थान भारतीय घटनेत नव्हते. कारण त्यावेळी ब्रिटिशांचे राज्य होते व प्रांतांचे गव्हर्नर हे सर्वेसर्वा असत. १९३५ च्या कायद्यान्वये एक भाग प्रांतिक स्वायत्तता व एक भाग संघराज्य अशी घटनात्मक आखणी झाली. संघराज्याचा घटनेतील भाग संस्थानिकांच्या असहकारामुळे अस्तित्वात येऊ शकला नाही. परंतु प्रांतिक स्वायत्ततेचा भाग अमलात आणण्यात आला. बरीच बंधने असल्यामुळे राष्ट्रीय सभेने (कॉंग्रेस) प्रथम ह्या घटनेतील तरतुदीप्रमाणे अधिकार स्वीकार थोड्या वाटाघाटीनंतरच केला. त्यावेळी (१९३७) श्री. बाळासाहेब खेर हे पहिले मुख्यमंत्री. त्यांना 'मुख्यमंत्री' ह्या ऐवजी 'प्रधानमंत्री' अशी उपाधी होती. अर्थात् त्यावेळी मंत्रिमंडळाचे अधिकार मर्यादित होते.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी साली भारताला स्वातंत्र्य मिळाले. त्याआधी १९४६ साली प्रांतात मंत्रिमंडळे स्थापन झाली. श्री. बाळासाहेब खेर हेच मुख्यमंत्री झाले. घटनासमितीने १९५० साली भारताची घटना तयार केली व खऱ्या अर्थाने स्वतंत्र भारतात मुख्यमंत्री हे घटनात्मक स्थान निर्माण झाले. १९५० नंतर त्रिभाषिक (महाराष्ट्र - गुजरात - कर्नाटक) मुंबई राज्याचे मुख्यमंत्री काही दिवस श्री. बाळासाहेब खेर होते व त्यानंतर श्री. मोरारजी देसाई मुख्यमंत्री झाले. १९५६ साली कर्नाटक महाराष्ट्रापासून विलग झाला व १९५६ साली द्विभाषिक मुंबई राज्य निर्माण झाले. ह्या द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण होते. १९६० साली गुजरात महाराष्ट्रापासून अलग झाला व खऱ्या अर्थाने 'मुंबईसह' संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री श्री. यशवंतरावजी चव्हाणच होते.

खरे पाहिले असता संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाणच व महाराष्ट्रातील मुख्यमंत्र्यांविषयी लिहिताना श्री. यशवंतराव चव्हाणांपासूनच सुरुवात करतात. परंतु श्री. बाळासाहेब खेर १९३७ व १९४६ साली मुख्यमंत्री होते आणि मोरारजी देसाई १९५२ ते १९५६ सालात द्विभाषिक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. म्हणून ह्या लेखमालेत त्या दोघांचा समावेश केला आहे. त्याआधी श्री. धनजीशहा कूपर काही काळ मुखमंत्री होते.

**१९५०ची घटना व मुख्यमंत्री**

१९५० च्या कायद्याप्रमाणे राज्यपाल हा राज्याचा प्रमुख असतो. परंतु सर्व अधिकार हे मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाकडे असतात. पक्षाच्या नेत्याची निवड व पर्यायाने मुख्यमंत्र्याची

निवड पक्षश्रेष्ठींवर अवलंबून असते. घटनेच्या कलम १६३ व १६४ प्रमाणे राज्यपाल मुख्यमंत्री नेमतात व इतर मंत्र्यांची निवड राज्यपाल मुख्यमंत्र्याच्या सल्ल्याने करतात. घटनेच्या १५४(२) कलमान्वये मंत्रिमंडळ सामुदायिक रीतीने विधिमंडळाला जबाबदार असते. साधारणपणे ज्या पक्षाला बहुमत असेल किंवा जो पक्ष स्थिर सरकार स्थापू शकेल अशा पक्षाच्या नेत्याला राज्यपाल मंत्रिमंडळ स्थापण्यास पाचारण करतो.

१९५० सालच्या घटनेनुसार मुख्यमंत्र्याचे खालील अधिकार आहेत :-

१) मुख्यमंत्री इतर मंत्र्यांच्या नावांची शिफारस राज्यपालांना करतो.

२) त्याला राज्यपालांना मदत व सल्ला द्यावा लागतो.

३) राज्यपालाला मंत्रिमंडळाचे निर्णय कळवावे लागतात व त्याचबरोबर विधिमंडळात चर्चेकरता निश्चित केलेल्या विषयांची माहिती द्यावी लागते.

४) मंत्रिमंडळात विविध खात्यांचे वाटप करणे.

५) मंत्र्याच्या खात्यात बदल करणे वा जरूर असेल तर त्याला राजीनामा द्यावयास सांगणे.

६) मंत्रिमंडळ सभेचा अध्यक्ष असतो व त्या सभेचा कार्यक्रम मुख्यमंत्र्याच्या सल्ल्यानेच ठरविला जातो.

७) सर्व खात्यांच्या कारभारात समन्वय व सुसूत्रता आणणे.

८) राज्यातील महत्त्वाच्या पदांच्या नेमणुका मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्याने होतात. उदा., ॲडव्होकेट जनरल, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सदस्य इत्यादी.

९) मुख्यमंत्र्यास राज्यपालाला विधिमंडळाच्या बरखास्तीचा सल्ला देता येतो. परंतु तो राज्यपालावर बंधनकारक नसतो.

१०) त्याच्यावर राज्यात कायदा व सुव्यवस्था ठेवण्याची जबाबदारी असते. कायदा व सुव्यवस्थेकरता असलेल्या यंत्रणेत बिघाड निर्माण झाला व ती कुमकुवत झाली तर घटनेच्या ३५६ कलमाप्रमाणे राज्यात राष्ट्रपती शासन लागू होऊ शकते.

११) मुख्यमंत्र्यांना शासनाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयाबाबत राज्यपालांना माहिती द्यावी लागते.

जरी राज्यपाल विधिमंडळ बरखास्त करण्याबद्दल राष्ट्रपतींना घटनेच्या ३५६ कलमान्वये

शिफारस करू शकतात, परंतु त्याकरता सबळ कारण लागते. घटनेच्या ३५६ कलमाबद्दल अनेक वाद व प्रतिवाद आहेत. केंद्रात सत्तेवर आलेला पक्ष त्या कलमाचा दुरुपयोग करतो असा आक्षेप घेतला जातो. ह्याबद्दल आंध्र व बिहार ही ठळक उदाहरणे आहेत.

राज्यपाल, मुख्यमंत्री व मंत्रिमंडळ ह्यांचे परस्परांशी संबंध त्यांच्या वैय्यक्तिक समीकरणावर अवलंबून असतात.

स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक मान्यवर व्यक्ती मुख्यमंत्री होत्या. श्री. बाळासाहेब खेर (महाराष्ट्र), श्री. गोविंद वल्लभ पंत (उत्तर प्रदेश), खानसाहेब (सरहद्द प्रांत), डॉ. बी. सी. रॉय (पश्चिम बंगाल), श्री. राजगोपालाचारी (मद्रास), श्री. पटनाईक (ओरिसा) अशी नावे सांगता येतील. स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतलेल्या व त्याग केलेल्या आणि बंदिवास भोगलेल्या ह्या व्यक्ती होत्या. त्या सर्व मंडळींनी राजकारण व सत्तेचा उपयोग लोककल्याणाकरता केला. अधिकारग्रहण केल्यानंतरही त्यांची जीवनशैली साधी होती. साधी राहणी व उच्च विचारसरणी हा त्यांचा स्थायी भाव होता. राजकारणातील अनिष्ट प्रवृत्तींना त्यांचा धाक होता. त्यामुळे भ्रष्टाचार व सामाजिक जीवनाच्या अवमूल्यनाला एक प्रकारचा पायबंद बसला होता. काही राज्यपाल ब्रिटिश होते. मुंबईत लॉर्ड ब्रेबर्न, लम्ले हे दोघे काही काळ गव्हर्नर होते. ते दोघेही सभ्य राज्यपाल होते. इतर राज्यांतही स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतलेल्या नामवंत व्यक्ती राज्यपाल होत्या. आज मुख्यमंत्री हे श्रेष्ठींच्या पटावरील खेळणी झाली आहेत, तर नको असलेले राजकारणी हे राज्यपाल झाले आहेत. त्यांना स्वतःचाच उत्कर्ष करून घेण्याचा ध्यास लागलेला असतो. स्थानिक राजकारणावर दबाव आणण्याकरताच श्रेष्ठींनी त्यांची नेमणूक केलेली असते.

ooo

# ५. सत्तेचे रचनाशास्त्र

भारताचे पंतप्रधान वा राज्यांचे मुख्यमंत्री होण्याकरता त्या व्यक्तीच्या ठिकाणी काही विशेष गुण असावे लागतात. उदा., लोकांच्या प्रश्नांची जाण, लोकसंग्रह करण्याचे कसब इ. परंतु या सर्व गुणांनी संपन्न जरी एखादी व्यक्ती असली तरी त्या पदापर्यंत ती पोहोचेलच अशी खात्री नाही. उदाहरणार्थ, श्री. यशवंतरावजी चव्हाणाकडे पंतप्रधान होण्यासाठी लागणारे सर्व गुण होते. परंतु ते पंतप्रधान झाले नाहीत. श्री. विठ्ठलराव गाडगीळांकडे कॅबिनेट मंत्री होण्यास सर्व गुण होते, परंतु ते फक्त राज्यमंत्री झाले. ते अधिकारवर तसे म्हटले तर फारच थोडा काळ राहिले होते. श्री. शरदजी पवार ह्यांना संधी आली असताना सुद्धा पंतप्रधानाच्या पदापर्यंत ते पोहोचले नाहीत. श्री. सुशीलकुमार शिंदे ह्यांच्या हातून मुख्यमंत्रिपद तीनदा निसटले. श्री. मनोहरपंत जोशी व श्री. नारायणरावजी राणे मुख्यमंत्री झाले, परंतु त्यांनाही काटशह बसला. श्री. सुधीर जोशीजी मुख्यमंत्रिपदाला लायक व्यक्ती अशी प्रतिमा लोकमानसात होती. परंतु हे पद त्यांच्यापासून लांबच राहिले. ह्याचा अर्थ गुण असले तरी असे पद मिळविण्यास नशीब लागते हे त्रिवार सत्य आहे. याउलट अतिशय सामान्य व सुमार बुद्धीच्या व्यक्तींना हे पद मिळून जाते. अर्थात्, ते त्या पदावर फार काळ टिकत नाहीत ही गोष्ट वेगळी.

ह्याविषयी इंग्लंडच्या पंतप्रधानाच्या संदर्भात जेम्स मारगॉच* ह्यांनी 'दि अनेटॉमी ऑफ पॉवर' म्हणून एक मजेशीर पुस्तक लिहिले आहे. त्यात त्यांनी एकूण ब्रिटिश पंतप्रधानांबद्दल लिहिले आहे. तो म्हणतो की राजकारण हा सत्तेचा खेळ आहे. त्याकरता नशीब, महत्त्वाकांक्षा, धैर्य, दूरदृष्टी, ध्येयवाद, मुत्सद्दीपणा, व्यवस्थापनकौशल्य, कठोरता वगैरे अनेक गुण लागतात. त्या व्यक्तीचे राजकीय व व्यवस्थापनातील कौशल्य, कायदे वगैरेंचे ज्ञान, जाहीरनाम्यातील वचने ह्या गोष्टींचा संबंध दूरान्वयानेच असतो. त्यांचे अंतर्गत व्यक्तिमत्त्वाचे प्रमुख पैलू ह्यासंदर्भात जास्त महत्त्वाचे असतात. अर्थात् हे सर्व गुण त्या पदावर आरुढ झाल्यावरच उपयोगी येतात. ती व्यक्ती त्या अधिकारपदावर नशीब व अपघातानेच येत असते.

इंग्लंडमधील अशा तेरा पंतप्रधानांच्या कारकिर्दीचे मारगॉच ह्यांनी विश्लेषण केले आहे. जर्मनीशी झालेल्या युद्धामुळे चर्चिल ह्यांचे नशीब उजळले. नाहीतर त्यांच्याकडे दुर्लक्षच होत होते. जेम्स कॅलाहान हे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे सेक्रेटरी जनरल होण्याचा प्रयत्न करीत होते. परंतु हॅरॉल्ड विल्सन निवृत्त होण्याच्या वेळी कॅलाहानचे ग्रह उंचीचे होते. तसेच मार्गारेट

थॅचरबद्दल म्हणता येईल. त्यांनी योग्य वेळी एडवर्ड हीथविरुद्ध लढण्याचे ठरविले. सर हेन्री कॅंपबेल बनरमन व क्लेमंट ॲटलीच्या बाबतीत तेच म्हणता येईल. हॅरॉल्ड विल्सन सुदैवाने ह्यू गेटस्केल अने युविन बीव्हजच्या मृत्युमुळे पंतप्रधान झाले.

असाच हात नशिबाने इतर काही व्यक्तींना दिला. स्टॅलने बाल्डविन, हॅरॉल्ड मॅकमिलन, हॅरॉल्ड विल्सन डग्लस होम ही ती उदाहरणे होत. नशिबाने हात दिल्यानंतर ज्याला 'लेडी लक' असे म्हणतात त्याचा फायदा त्यांना झाला. पुढारीपणाच्या व्यक्तिमत्त्वाची खरी किंमत व कसोटीचे मूल्यमापन सत्ता मिळाल्यानंतरच करता येते. कारण सत्ता मिळाल्यानंतरच सत्तेचा उपयोग करता येतो. त्यावेळी धैर्य, महत्त्वाकांक्षा, सहनशीलता, दूरदृष्टी, निःस्पृहता व कुवत ह्या गुणांची कसोटी लागते.

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांची व्यक्तिचित्रे पाहताना वरील विधानाची सत्यता आपणास पटेल. कॉंग्रेसने अधिकार ग्रहण केले नाही म्हणून श्री. धनजी कूपर मुख्यमंत्री झाले. श्री. नरिमनच्या विरुद्ध असलेल्या आक्षेपामुळे श्री. बाळासाहेब खेर मुख्यमंत्री झाले. एकमताने निवड होत नसल्यामुळे श्री. मोरारजींनी द्विभाषिक महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद नाकारले व श्री. यशवंतराव चव्हाणांचे ग्रह उंचीचे ठरून ते मुख्यमंत्री झाले. त्यांना संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीस जावे लागले, म्हणून श्री. कन्नमवार मुख्यमंत्री झाले व ते सुद्धा विदर्भातले म्हणून. श्री. कन्नमवार अकस्मात वारल्यामुळे श्री. वसंतराव नाईक मुख्यमंत्री झाले, ते सुद्धा विदर्भातले म्हणून. श्री. वसंतरावांना श्रेष्ठींची गैरमर्जी व मराठा लॉबीचा विरोध म्हणून अर्धचंद्र मिळाला व त्यांच्या जागी मराठवाड्यातील व यशवंतराव चव्हाण यांच्या विरोधातील म्हणून श्री. शंकररावजी चव्हाण मुख्यमंत्री झाले. श्री. शंकररावजी केंद्रीय मंत्रिमंडळात गेल्यामुळे श्री. वसंतराव पाटील तात्पुरती व्यवस्था म्हणून मुख्यमंत्री झाले. त्यानंतर छोटीशी 'राज्यक्रांती' करून श्री. शरद पवार पुरोगामी लोकशाही आघाडीचे मुख्यमंत्री झाले. परंतु श्रीमती इंदिरा गांधींनी त्यांचे मंत्रिमंडळ बरखास्त केले. श्री. अंतुले ह्यांचा प्रभादेवी विश्वस्त निधीने बळी घेतला, तर श्री. शिवाजीराव पाटील निलंगेकरांना मुलीच्या परीक्षेतील भानगडीमुळे जावे लागले. 'दैव देते परंतु कर्म नेते' ही म्हण त्यांच्या बाबतीत खरी ठरली. श्री. बाबासाहेब भोसल्यांना मुख्यमंत्रिपद ही लॉटरी लागली. त्यांची नेमणूक ही तात्पुरती व्यवस्था होती. श्री. सुधाकररावांच्या मुख्यमंत्रिपदाचा बळी मुंबईतील बॉंबस्फोटाने घेतला. श्री. विलासराव देशमुख मराठवाड्यातील तिसरे मुख्यमंत्री झाले. राजकीय वनवासातून त्यांचे पुनर्वसन झाले होते. त्यामुळे ते श्रेष्ठींच्या तालावर नाचतील ह्या अपेक्षेने त्यांना त्या पदावर

चढविले होते. परंतु त्यांच्या कामगिरीबाबत असमाधान व पक्षांतर्गत विरोध ह्यांमुळे त्यांना मुख्यमंत्रिपद सोडावे लागले व आजपर्यंत प्रतिक्षाकक्षात असलेल्या सुशीलकुमार शिंद्यांच्या नशिबाने त्यांना हात दिला व त्यांची मुख्यमंत्री होण्याची महत्त्वाकांक्षा काही काळ तरी पूर्ण झाली. परंतु महाराष्ट्राच्या राजकारणावर असलेला मराठ्यांचा प्रभाव व दबावगट ह्यांमुळे ते अडगळ ठरले व त्यांना आंध्रचे राज्यपाल म्हणून जावे लागले. दुसरा पर्यायच नसल्यामुळे विलासरावांची मुख्यमंत्रिपदावर पुन्हा स्थापना करावी लागली.

युतीचे (शिवसेना-भाजप) दोन मुख्यमंत्री. एक श्री. मनोहर जोशी व दुसरे श्री. नारायणरावजी राणे. श्री. मनोहरपंत जोशी हे धोरणी, मुत्सद्दी व चाणक्य. त्यांनी चार वर्षे टिकाव धरला. परंतु बाळासाहेब ठाकरे ह्यांची गैरमर्जी, श्री. जोशी ह्यांच्या जावयाच्या पुण्यातील जागेविषयी वाद व शिवसेनेतील राजकारणाचा प्रभाव म्हणून श्री. जोशी ह्यांना जावे लागले व मराठा मुख्यमंत्री असावा ह्या दृष्टीने श्री. नारायणरावजी राणे ह्यांची नेमणूक झाली. पुढे युतीने विधिमंडळात बहुमत गमावल्यामुळे श्री. नारायण राणे अल्पकाळच मुख्यमंत्रिपदावर राहू शकले. असा हा महाराष्ट्रातील मुख्यमंत्र्यांचा थोडक्यात इतिहास असून त्यांची व्यक्तिचित्रे आपणास पाहावयाची आहेत.

ooo

---

*संदर्भ : James Margoch - 'The Anatomy of Power', W.H.Allen & Co. Ltd., London, 1981

## ६. मुख्यमंत्र्याचे पद -
## मुख्यमंत्री श्री. धनजी शा. कूपर

मुख्यमंत्री - प्रधानमंत्री ही नामाभिधाने तशी नवी नाहीत. छत्रपती व त्यांच्या आधीच्या काळात ही अभिधाने होती. परंतु त्या वेळी राजेशाही होती. मंत्र्याच्या हातात सत्ता नसे. जर राजाच कमकुवत असला तर मंत्र्याची सत्ता चालू शकत असे. ह्या संदर्भात चाणक्य ह्या मंत्र्याचे नाव घेता येईल.

भारत १९४७ पर्यंत पारतंत्र्यातच होता. बिटिशांची सत्ता अबाधित होती. १९०९, १९१९ ह्या सुधारणा कायद्याने भारतीयांच्या कडे थोडी सत्ता आली. ब्रिटिश साम्राज्याच्या अंतर्गत 'वसाहतीचे राज्य' ही भारताच्या राजकीय भाषेत त्याची अंतिम पायरी ठरली. १९०९ चा इंडियन कौन्सिल ॲक्ट व १९१९ चा मॉंटेग्यू चेम्सफर्ड सुधारणा कायद्यामुळे मध्यवर्ती सरकार व प्रांतिक सरकार ह्यांत भारतीयांना प्रतिनिधित्व मिळाले. त्याचे प्रतिनिधी मंत्री होऊ शकले.

१९२९ ते १९३१ ह्या दरम्यान तीन गोलमेज परिषदा झाल्या. त्यांतील एका परिषदेला महात्मा गांधी उपस्थित होते. त्यावेळी भारतीय प्रतिनिधी व ब्रिटिश सरकार ह्यांच्यात झालेल्या चर्चेमुळे गांधीजींचे समाधान झाले नाही. निराश होऊन ते भारतात परतले. त्यांना १९३१ साली अटक झाली व तुरुंगात जावे लागले. दरम्यान वरील तीन गोलमेज परिषदांतील चर्चेच्या अनुषंगाने ब्रिटिश पार्लमेंटने १९३५ सालचा कायदा पारित केला व त्या कायद्यानुसार भारतातील लोकप्रतिनिधींकडे सत्तांतर करण्याचे ठरले.

वरील कायद्याचे दोन भाग होते. एक संघराज्य (federation), परंतु त्या कायद्याचा हा भाग कार्यान्वित होऊ शकला नाही. ह्याचे कारण संस्थानिकांचा असहकार हे होय. दुसरा भाग प्रांतिक स्वायत्तता. ह्यानुसार प्रांतात लोकप्रतिनिधी असलेली कायदेमंडळे व मंत्रिमंडळे

अस्तित्वात येणार होती. कॉंग्रेसचा ह्या १९३५ च्या कायद्याला संपूर्ण विरोध होता.

१९३५ कायदा अस्तित्वात आल्यानंतर १४ प्रांतातील राज्यपालांनी बहुमत असलेल्या पक्षाच्या नेत्याला मंत्रिमंडळ स्थापन करण्यास निमंत्रण पाठविले. पंजाब व बंगाल सोडून इतर १२ प्रांतात कॉंग्रेसला बहुमत होते. परंतु प्रांतिक राज्यकारभारात मंत्रिमंडळाकडे भरीव सत्ता नसल्यामुळे कॉंग्रेसने अधिकार स्वीकार केला नाही. राज्यपालांना ह्या कायद्याखाली सर्वच सत्ता होती व मंत्र्याच्या कारभारात ढवळाढवळ करण्याचा पूर्ण अधिकार होता.

### श्री. धनजी शा. कूपर

मुंबई इलाख्यात कॉंग्रेसने सत्ताग्रहण करण्यास नकार दिल्यामुळे त्यावेळचे गव्हर्नर लॉर्ड ब्रेबर्न ह्यांनी श्री. धनजी शा. कूपर ह्यांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ नेमले. ह्या मंत्रिमंडळातील नेत्याला प्रिमिअर म्हणजे 'पंतप्रधान' ही संज्ञा होती. पुढे १९५० सालच्या घटना कायद्यामुळे त्याचे नामांतर 'मुख्यमंत्री' झाले. साहजिकच १९३५ कायद्यानुसार श्री. धनजी शा. कूपर हे पहिले मुख्यमंत्री. म्हणून 'महाराष्ट्राचे मुख्यमंत्री' ह्या लिखाणाची सुरुवात श्री. धनजी शा. कूपर ह्यांच्यापासून केली आहे.

अर्थात् कूपर मंत्रिमंडळ फक्त सहा महिने टिकले. ह्या मंत्रिमंडळाचे चरणसिंग मंत्रिमंडळाशी साम्य आहे. कारण ह्या मंत्रिमंडळाच्या कारकिर्दीत विधिमंडळाचे एकही अधिवेशन बोलावले नव्हते. ह्या मंत्रिमंडळाला जनादेश नव्हता. त्याचे कायदेमंडळात बहुमत नव्हते.

श्री. धनजी शा. कूपर हे पारशी गृहस्थ उद्योजक होते. किर्लोस्करांच्या प्रमाणे त्यांचा नांगरांचा कारखाना होता. सातार्‍यास ते एक बडे प्रस्थ होते. ते ब्राह्मणेतर पक्षाचे नेते होते आणि ब्रिटिश साम्राज्यधार्जिणे होते. त्यांचा कॉंग्रेस व तिची राष्ट्रीय चळवळ ह्यांना सातत्याने विरोध होता. काही काळ श्री. कूपर ह्यांनी सातार्‍यास स्थानिक स्वराज्य संस्थेत सत्ता गाजविली होती. अर्थात् ह्या सहा महिन्याच्या काळात श्री. कूपर ह्यांच्याकडून कोणत्याही कामगिरीची अपेक्षा करणे न्याय्य ठरणार नाही.

### स्वातंत्र्यवीर सावरकरांची सुटका

त्यांच्या कारकिर्दीत एकच सांगण्यासारखी गोष्ट झाली. ती म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकरांची नजरबंदीतून झालेली सुटका. अंदमानातून सुटल्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकरांना रत्नागिरीला स्थानबद्ध केले होते. अर्थात् त्यांच्यावर ह्या काळातही राजकीय चळवळीत भाग घेण्यास बंदी होती. परंतु ह्या स्थानबद्धतेच्या काळात त्यांनी समाजप्रबोधनाचे मोठे कार्य केले. किर्लोस्कर मासिकात त्यांनी अनेक विचार प्रवर्तक लेख लिहिले आणि जनजागृतीचे प्रभावी कार्य केले.

अर्थात् ही सुटका करण्यात बॅ. जमनादास मेहता ह्यांचा सिंहाचा वाटा होता. बॅ. जमनादास मेहता प्रथम कॉंग्रेसमध्ये होते व त्यानंतर त्यांनी हिंदु महासभेत प्रवेश घेतला. ते एक प्रभावी वक्ते होते. बॅ. सावरकरांच्या वरील निर्बंध उठल्यानंतर त्यांना प्रत्यक्ष राजकारणात भाग घेता येऊ लागला. ते हिंदु महासभेचे सक्रीय अध्यक्ष झाले. त्यांच्या रत्नागिरीतील वास्तव्यातच पतितपावन मंदिर बांधले गेले.

एक अर्थाने १९३५ नंतरच्या काळात श्री. कूपर ह्यांना आपले पहिले मुख्यमंत्री संबोधणे संयुक्तिक ठरेल. अर्थात् ते स्वातंत्र्यपूर्व व प्रांतिक स्वातत्ततेच्या काळात.

ooo



## ७. श्री. बाळासाहेब खेर

(१५-८-१९३७ ते ३१-१०-१९३९ /
३१-३-१९४६ ते २३-४-१९५२)

**त्रिभाषिक मुंबई इलाख्याचे प्रधानमंत्री**

काँग्रेसने अधिकार ग्रहण करावयाचे की नाही ह्याबाबत ब्रिटिश सरकारशी जवळजवळ ५-६ महिने वाटाघाटी केल्या व 'सभ्य गृहस्थाचे आश्वासन' ह्या सबबीवर सत्ताग्रहण केले. घटनेनुसार ब्रिटिश सरकारला कोणतेही अभिवचन लेखी स्वरुपात देता आले नसते. १५ ऑगस्ट १९३७ रोजी सहा प्रांतात काँग्रेसची राज्ये स्थापन झाली. घटना मोडायची ह्या शपथेवरच काँग्रेसने १९३७ साली सत्ताग्रहण केले.

पंतप्रधान/मुख्यमंत्री ठरविण्याबाबत महाराष्ट्रात खूपच राजकारण झाले. सर्वसाधारण लोकांचा असा समज होता की बॅ. वीर नरिमन ह्यांची काँग्रेस पक्षाचा नेता म्हणून निवड होईल. बॅ. वीर नरिमन हे काँग्रेसचे क्रियाशील कार्यकर्ते होते. त्यांचे मुंबई शहरात मोठे वजन होते. ते उत्तम वक्ते व संघटक होते. म्हणून श्री. बाळासाहेब खेरांची काँग्रेस पक्षाचा नेता व पर्यायाने मुख्यमंत्री म्हणून झालेली निवड अनपेक्षित होतीच. अर्थात् त्याचे कारण श्री. नरिमन काँग्रेस श्रेष्ठींच्या मनातून उतरले होते. १९३६ साली मध्यवर्ती कायदेमंडळाच्या निवडणुका झाल्या. ह्या निवडणुकांत श्री. वीर नरिमनांनी श्री. कावसजी जहांगिर ह्यांना मदत करून काँग्रेस उमेदवार श्री. कन्हय्यालाल मुन्शी ह्यांचा पराभव घडवून आणला असा त्यांच्यावर आरोप होता व श्रेष्ठींच्या पाठिंब्यावरच श्री. बाळासाहेब खेर काँग्रेस पक्षाचे नेते व प्रिमिअर-मुख्यमंत्री झाले.

श्री. बाळासाहेब खेरांच्या मंत्रिमंडळात कर्तबगार मंत्री होते. श्री. मोरारजी देसाई, कन्हय्यालाल मुन्शी वगैरे.

**जन्म - शिक्षण**

श्री. बाळासाहेब खेर ह्यांचा जन्म २४ ऑगस्ट १८८८ साली रत्नागिरीस झाला. त्यांना

माध्यमिक शिक्षणाकरता चार ठिकाणी यात्रा करावी लागली व अखेर अहमद नगर सिटी हायस्कूलमधून १९०२ साली ते उत्तम रीतीने मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांची शैक्षणिक कारकीर्द उत्तम होती. ते १९०८ साली विल्सन कॉलेजातून बी.ए. झाले. कॉलेजात त्यांना अनेक शिष्यवृत्या व बक्षिसे मिळाली होती. संस्कृतकरता असलेले भाऊदाजी पारितोषिकही त्यांना मिळाले होते. १९०८ साली त्यांना सिनियर दक्षिणा फेलोशिप मिळाली होती. त्यानंतर १९०८ साली ते कायद्याची परीक्षा उत्तीर्ण झाले व १९१२ साली त्यांनी वकिलीची प्रॅक्टिस सुरू केली. परंतु त्यांची वकिली बेताबातच होती. म्हणून त्यांनी मुंबई हायकोर्टाचे ज्युनिअर न्यायाधीश जस्टीस बीमन ह्यांच्याकडे 'रीडर कम सचिव' म्हणून नोकरी धरली. दोन प्रयत्नांनंतर तिसऱ्या प्रयत्नाअंती १९१८ साली ते सॉलिसिटरची परीक्षा उत्तीर्ण झाले. जून १९१८ मध्ये त्यांनी 'मणिलाल व खेर' म्हणून स्वतःची सॉलिसिटर फर्म सुरू केली.

**श्री. बाळासाहेब व राजकीय चळवळ**

श्री. बाळासाहेब खेर गांधीजींचे अनुयायी झाले. त्यांनी गांधीजींच्या मिठाच्या सत्याग्रहात भाग घेतला होता (१९३१). ते मुंबई कॉंग्रेसचे उपाध्यक्ष होते (१९३१). १९३१ साली तिसऱ्या गोलमेज परिषदेवरून परत आल्यानंतर गांधीजींना अटक झाली. त्यावेळी खेरांनाही अटक झाली. बार्डोलीच्या शेतकऱ्यांच्या प्रश्नाची चौकशी करण्याकरता नेमलेल्या समितीचे श्री. बाळासाहेब खेर सेक्रेटरी होते. श्री. बाळासाहेब खेर राजकीय चळवळीत जसे कृतिशील होते तसेच विधायक कार्यातही. त्यांचा खरा पिंड विधायक कार्यकर्त्याचा होता.

श्री. बाळासाहेब सोशल सर्व्हिस लीग, श्रद्धानंद महिलाश्रम, अस्पृश्यता निवारण, हरिजन सेवा संघ ह्या क्षेत्रातील कार्याशी निगडित होते. अस्पृश्यता निवारण्याच्या संदर्भात त्यांचे खेरवाडीतील कार्य स्मरणीय आहे. खेरवाडीस पूर्वी चामडेवाला की वाडी म्हणत असत. तेथे प्रामुख्याने चांभारांची वस्ती होती. आपल्या पंतप्रधान पदाच्या काळात (मुख्यमंत्री) त्यांनी बांद्रा स्टेशन ते टॅनर्स कॉलनीपर्यंत रस्ता करून घेतला. चांभारांना तांत्रिक शिक्षण देण्याकरता टॅनिंग व लेदर वर्क्स इन्सिट्यूट ही संस्था सुरू केली. चामडेवाला की वाडी हे नाव बदलून तिचे नाव लोकांनीच खेरवाडी असे केले. त्या ठिकाणी बाळासाहेबांचा पुतळा उभा केला आहे.

आधाररहित महिलांच्या विषयी त्यांना असलेल्या आत्यंतिक सहानुभूतीमुळे त्यांनी माटुंगा येथील श्रद्धानंद महिला आश्रमाला भरपूर मदत केली.

श्री. बाळासाहेब खेरांना कायदा ह्या विषयात रस होता. ते हिंदू लॉ जर्नलचे संपादक होते हिंदु कायद्यामध्ये सुधारणा करण्याकरता त्यांनी पुढाकार घेतला होता. त्यांनी न्यायालयातील द्विदल पद्धतीविरुद्ध (बॅरिस्टर-सॉलिसिटर) आवाज उठवला.

**कायदेमंडळात प्रवेश व मुख्यमंत्रिपद**

श्री. बाळासाहेब खेर हे अत्यंत सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व होते. त्यांना शिक्षण ह्या विषयाची आवड होती. त्यांच्या सौजन्यशील व नम्र स्वभावामुळे ते एका अर्थाने अजातशत्रू होते. त्यांची शैक्षणिक पार्श्वभूमी अत्यंत उच्च दर्जाची होती. त्याचबरोबर कायदा व समाजसेवा ह्या दोन्ही क्षेत्रांतील त्यांचे कार्य प्रशंसनीय होते. त्यामुळे श्री. नरिमनांना बाजूला सारून जरी श्री. बाळासाहेब ह्यांची मुख्यमंत्री म्हणून निवड झाली तरी सर्वांनी त्यांच्या नेमणुकीचे स्वागतच केले. श्री. बाळासाहेब खेर हे दोनदा मुख्यमंत्री (मुख्यप्रधान) झाले. स्वातंत्र्यपूर्व काळात १९३७ साली मुख्यमंत्री झाले व ते फक्त दोन वर्षे त्या पदावर होते. १९४६ साली ते पुन्हा मुख्यमंत्री झाले व १९५२ साली त्यांनी प्रकृतिअस्वास्थ्यामुळे संसदीय राजकारणातून निवृत्त होण्याचे ठरविले. अर्थात बाळासाहेब हे त्रिभाषिक मुंबई इलाख्याचे मुख्यमंत्री होते. मुंबई, गुजरात व कर्नाटक हे मुंबई इलाख्याचा भाग होते. काही काळ सिंधही मुंबईस संलग्न होता. श्री. बाळासाहेब खेरांच्या नंतर श्री. मनोहर जोशींशिवाय कोणीही ब्राह्मण मुख्यमंत्री झाला नाही व दोघे सोडून कोणीही मुंबईची व्यक्ती मुख्यमंत्री झालेली नाही. बाळासाहेबांसारखा उच्चशिक्षित विद्वान असा मुख्यमंत्री विरळाच.

**मुख्यमंत्री म्हणून बाळासाहेबांचे कार्य**

आपल्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकिर्दीत बाळासाहेबांनी बऱ्याच गोष्टी केल्या. सत्याग्रह व जमिनीबाबत चळवळीत ज्यांनी भाग घेतला होता त्यांच्या जप्त झालेल्या जमिनी परत देऊन त्यांना दिलासा दिला. राजकीय स्थानबद्ध कैद्यांची सुटका केली. वर्तमानपत्रांचे घेतलेले जामीन परत केले. खोती व इनामदारी पद्धतीचे उच्चाटन केले. दारुबंदी आणली व ग्रामीण भागातील शेतकऱ्याचे कर्ज कमी करण्याकरता सावकारीच्या विरुद्ध कायदे केले. अशा तऱ्हेने सावकारीपासून शेतकऱ्यांना संरक्षण दिले. शेतकऱ्याच्या जमिनीचा साराही कमी केला. गुरांना चारा उपलब्ध करून देण्याकरता चराऊ जमिनीवरील फी (शेतसारा) कमी केली. त्याचबरोबर रावसाहेब, रावबहादुर ह्या शोभेच्या पदव्या त्यांनी बंद केल्या.

शेतकऱ्याच्या हिताच्या योजनांबरोबर श्री. खेरांनी आदिवासींच्या प्रश्नांकडे लक्ष दिले. १९३९ साली ह्या विषयावर प्रसिद्ध झालेल्या सिमिंग्टन समितीच्या निष्कर्षाच्या आधारे

त्यांनी आदिवासींची परिस्थिती सुधारण्याकरता अनेक योजना आखल्या. श्री. खेरांनी आदिवासी मंडळाची स्थापना केली. त्यांच्याकरता धान्य बँका (Grain Banks) स्थापन केल्या. त्यांच्याकरता आश्रम स्थापन केले. अशा तऱ्हेने आदिवासी व त्यांच्या स्त्रियांची होणाऱ्या पिळवणुकीवर आळा घालण्याचा प्रयत्न केला. पावसाळ्यात त्यांना खाण्यास मिळावे म्हणून खावटीची सोय केली. पुढे काँग्रेसने सुरू केलेल्या 'चले जाव' चळवळीत काँग्रेस पुढारी तुरुंगात गेलेले असताना गोदावरी परुळेकरांचा उदय झाला. आदिवासी त्यांना 'गोदाराणी' म्हणत. आदिवासी चळवळीवर कम्युनिस्टांचे वर्चस्व आले.

श्री. बाळासाहेबांना राष्ट्रीय चळवळीत कारागृहवास झाला होता व त्यामुळे त्यांना तुरुंगातील प्रश्नांची पूर्ण कल्पना होती. म्हणून तुरुंग सुधारण्याकरता त्यांनी एक समिती नेमली. त्यांनी शिक्षणक्षेत्रातील काही मूलभूत प्रश्नांकडे लक्ष दिले. त्यात हिंदी भाषेला उत्तेजन, मूलभूत शिक्षणाचा प्रसार (Basic Education), शासकीय शिक्षण संस्थांची स्थापना (State Institute of Education), अनुदान पद्धतीवर शाळा चालविण्याची अनुमती, प्राथमिक शिक्षकांचे वेतन सुधारण्याकरता समिती ही प्रमुख कार्ये होत. अर्थात शिक्षकांच्या वेतन श्रेणीत १९४६ साली परांजपे-मूस समितीच्या शिफारशीनुसार सुधारणा झाली.

खाजगी संस्थांना शिक्षकांच्या शिक्षणाकरता (Teacher's Education) संस्था काढण्यास उत्तेजन दिले. शारीरिक शिक्षणाकरता स्वामी कुवलयानंद ह्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमून व कांदिवली येथे शारीरिक शिक्षणाची दुय्यम शाळा व महाविद्यालय स्थापन केले (१९३८). तसेच शारीरिक शिक्षणाकरता शासकीय बोर्ड स्थापन केले. (A State Board of Physical Education)

श्री. बाळासाहेबांना ग्रंथ व ग्रंथालय ह्या विषयात रस होता. त्यांनी 'ग्रंथालय' हा विषय गृहखात्यातून शिक्षणखात्यात अंतर्भूत केला. बॅ. फैझी ह्यांच्या अध्यक्षतेखाली 'ग्रंथालय विकास समिती' नेमली. त्याचबरोबर आकाशवाणीवर स्त्रीशिक्षणाविषयी व्याख्याने सुरू केली.

गरिबांना कायद्याचा सल्ला मिळावा म्हणून त्यांनी 'लीगल एड सोसायटी' स्थापन केली. त्यांच्याच मंत्रिमंडळाने श्री. मुन्शी गृहमंत्री असताना 'सार्जंट' ह्या नामाभिधानाऐवजी 'इन्स्पेक्टर' ही उपाधी आणली. श्री. बाळासाहेबांच्या मंत्रिपदाच्या कारकिर्दीत टेलिग्राफ ऑफिसकरता क्रॉस मैदानावर जागा मिळाली.

त्यांच्या पहिल्या मंत्रिमंडळाच्या कारकिर्दीत मुंबई गिरणी कामगारांचा ७ नोव्हेंबर १९३८ रोजी एका दिवसाचा संप झाला.

बाळासाहेब विद्यापीठ मतदार संघातून दोनदा निवडून आले (१९३७/१९४६). मंत्री असताना त्यांनी आपल्या फर्मला कोणतेही शासकीय काम दिले नाही. गव्हर्नर लॉर्ड ब्रेबर्न ह्यांच्याशी व त्यानंतर आलेले लम्ले ह्यांचेशीही त्यांचे संबंध स्नेहपूर्वक होते.

### चले जाव चळवळ

सप्टेंबर १९३९ साली दुसरे महायुद्ध सुरू झाले. इंग्रजांचा लढा हा लोकशाहीकरता आहे म्हणून त्यांनी भारताला लोकशाही दिली, तर युद्धकार्यात सहकार्य मिळेल अशी कॉंग्रेसने भूमिका घेतली आणि भारताची स्वतंत्र घटना तयार करण्याचा अधिकार मान्य करावा अशी मागणी केली. परंतु ह्या अटी ब्रिटिश सरकारने मान्य केल्या नाहीत. बारा प्रांतातील कॉंग्रेस मंत्रिमंडळांनी ३१ ऑक्टोबर १९३९ रोजी राजिनामे दिले.

त्यानंतर अनेक राजकीय घडामोडी झाल्या. गांधींनी वैय्यक्तिक सत्याग्रह व त्यानंतर 'चले जाव' चळवळ सुरू केली. राजकीय पुढाऱ्यांची धरपकड झाली. व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळातील भारतीयांनी राजिनामे दिले. वाटाघाटीकरता क्रिप्स आले. परंतु तडजोड झाली नाही. ऑगस्ट १९४२च्या 'चले जाव' चळवळीत बाळासाहेबांना अटक होऊन त्यांची १९४४ला सुटका झाली. तुरुंगातून सुटल्यानंतर बाळासाहेबांनी विधायक कार्याला वाहून घेतले. ह्याच काळात कोरा केंद्रांची स्थापना झाली.

### कॉंग्रेस पुन्हा सत्तेवर

१९४६ साली कॉंग्रेसने पुन्हा अधिकार ग्रहण केले व श्री. बाळासाहेब खेर ३१मार्च १९४६ रोजी पुन्हा मुख्यमंत्री (प्रधानमंत्री) झाले. त्यावेळच्या मंत्रिमंडळात श्री. मुरारजी देसाई, डॉ. गिल्डर, एल. एम. पाटील, दिनकरराव देसाई, वैकुंठलाल मेहता, गुलझारीलाल नंदा, जी.डी. वर्तक ही मंडळी होती. बाळासाहेबांनी स्वतःकडे शिक्षणखाते घेतले. बाळासाहेबांच्या पुनर्निवडीचे सर्वांकडून स्वागत झाले. कारण त्यांच्या पहिल्या मंत्रिमंडळाच्या वेळी त्यांनी सुरू केलेल्या कार्यक्रमाला चालना मिळेल हे लोकांना अपेक्षित होते. १९४६ ते १९५२ चा काळ बाळासाहेबांच्या कारकिर्दीतील अभिमानास्पद म्हणण्यास हरकत नाही. कारण समाजसेवा, कायदा, शिक्षण, गरिबांच्या प्रश्नांची जाण ह्याविषयी त्यांना भरीव कार्य करता आले. त्याच वेळी म्हणजे सप्टेंबर १९४६मध्ये कॉंग्रेसने तात्पुरते (Interim) सरकार स्थापन केले आणि

१५ ऑगस्ट १९४७ ला भारतास स्वातंत्र्य मिळाले.

ह्याच काळात कुळकायदा पारित झाला. शेतीवरील सारा कमी झाला, खावटी कर्जाची सोय झाली. अशा तऱ्हेने शेतकरी व आदिवासी ह्यांच्या प्रश्नांना प्राधान्य मिळाले. शेतकरी कर्ज निवारण कायदा (Agricultural Debt Relief Act), सावकारी कायदा (Money Lenders' Act), कर्ज तडजोड कायदा (The Debt Adjustment Act), असे शेतकऱ्यांच्या हिताचे कायदे कार्यवाही झाले. तालुकदारी व इनामदारी पद्धत नष्ट झाली (Abolition of Inamdari). त्याचप्रमाणे पिण्याचे पाणी व इरिगेशन ह्यांबाबत त्यांनी काही भरीव पावले टाकली.

शिक्षण तर बाळासाहेबांच्या आवडीचा विषय. 'टाकलेल्या मुलांचे शिक्षण' व तांत्रिक शिक्षण' ह्यांकरता त्यांनी संस्था स्थापण्यास उत्तेजन दिले. प्राथमिक शिक्षणाकरता माध्यमिक शिक्षण बोर्ड स्थापन केले. वांद्रेकरांच्या अध्यक्षतेखाली प्राथमिक शिक्षणाकरता एक समिती नेमली. दुय्यम माध्यमिक शिक्षणाकरता स्वतंत्र बोर्ड स्थापन करून विद्यापिठाऐवजी बोर्डाकडे मॅट्रिकची परीक्षा सुपूर्द केली.

त्यावेळी मुंबई विद्यापीठ हे एकमेव विद्यापीठ होते. म्हणून प्रांतातील इतर भागात उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून त्यांनी पुणे (१०-२-१९४८), धारवाड, अहमदाबाद, बडोदा ह्या ठिकाणी स्वतंत्र विद्यापीठांची स्थापना केली. (२६/३/१९२४ रोजी सर चिमणलाल सेटलवाड ह्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. त्या समितीने महाराष्ट्र, गुजराथ, कर्नाटक ह्या विभागाकरता स्वतंत्र विद्यापीठे स्थापन करण्याकरता सहमती दर्शविली होती.) पुणे विद्यापीठाला तर त्यांनी गणेशखिंड म्हणजे गव्हर्नरच्या वास्तूत जागा दिली व त्या ठिकाणी बाबासाहेब जयकरांसारख्या मान्यवर व्यक्तीला कुलगुरू होण्याकरता आमंत्रण दिले. ह्या ऋणांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याकरता पुणे विद्यापीठात बाळासाहेबांचा पुतळा उभा केला आहे. एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ सन १९१६ मध्ये स्थापन झाले तरी १९४८ पर्यंत त्या विद्यापीठाला शासकीय मान्यता नव्हती. बाळासाहेबांनी १९४९ साली शासकीय मान्यता देऊन सर्व ठिकाणी ह्या विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाला मान्यता मिळवून दिली. डेक्कन कॉलेज १९३४ पासून बंद होते. ते त्यांनी पदव्युत्तर संस्था म्हणून पुन्हा चालू केले. मुंबईच्या लॉ कॉलेजचे सरकारी महाविद्यालयात रुपांतर करून कायद्याचे शिक्षण पूर्ण वेळ केले व पूर्ण वेळ प्राध्यापक नेमण्याची प्रथा पाडली. सिडनहॅम महाविद्यालयाच्या सध्याच्या इमारतीचे

भूमीपूजन बाळासाहेबांच्या कारकिर्दीत झाले (१९५२). पुणे, अहमदाबाद, मुंबई, धारवाड ह्या ठिकाणी तंत्र शिक्षणाकरता संचालनालये स्थापन केली. संस्कृत पाठशाळांना उदार हस्ते मदत केली. त्याचप्रमाणे सामाजिक व शासकीय दृष्टीने मागासलेल्या मुलांच्या शिक्षणाची सोय केली. कान्हेरी नॅशनल पार्क स्थापून पशुपक्षांच्या अभ्यासाला उत्तेजन दिले. वरील गोष्टींशिवाय कला विद्यालयाची स्थापना, शारीरिक शिक्षणाची सोय, ग्रंथालय चळवळ, मुंबई मध्यवर्ती ग्रंथालयाची स्थापना व त्याची एशियाटीक ग्रंथालयाशी संलग्नता ह्या गोष्टीही बाळासाहेबांच्या कारकिर्दीत झाल्या.* राष्ट्रीय धोरणानुसार इंग्लिश हा विषय इयत्ता ८वी पासून निर्धारित केला. वैद्यकीय व्यवसाय व भारतीय शिक्षण पद्धतीला कायदा करून मान्यता दिली. (Regulated Medical Practices and Recognition of Indian System of Education) पुण्यास राष्ट्रीय संरक्षण संस्था (National Defence Academy) स्थापन करण्याकरता जागा दिली. राष्ट्रीय पुढाऱ्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याकरता त्यांच्या जयंतीनिमित्त सुटी देण्यास सुरुवात केली.

बाळासाहेबांना कामगारांविषयी सहानुभूती होती. म्हणून कामगारांच्या संघटनेला बळ व स्थैर्य देण्याकरता मुंबई औद्योगिक संबंध कायदा (Bombay Industrial Disputes Act) पारित केला. ह्याच वेळी मध्यवर्ती सरकारने कारखाना कायदा (Factory Act 1948) केला. त्या कायद्यान्वये ५० किंवा जास्त मजूर असतील तर त्या ठिकाणी कामगार कल्याण अधिकारी नेमण्याची सक्ती झाली. तेव्हा इच्छुकांना हे शिक्षण देण्याकरता त्यांनी श्री. नंदांच्या सल्ल्याने महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्थेची १९४८ साली स्थापना केली.**

बाळासाहेबांना स्थानिक स्वराज्य संस्थांना भरीव भूमिका द्यावयाची होती. म्हणून त्यांनी स्थानिक स्वराज्यविषयक एक विधेयक कायदेमंडळात मांडले होते.

त्यांनी गुन्हेगारी जातीचा काळीमा काढून टाकला. हरिजनांना मंदिर प्रवेश मुक्त केला. खावटीकरता स्टोअर्स काढली. १९४८-४९ मध्ये सर्वोदय केंद्रे सुरू केली. निर्वासितांकरता उल्हासनगर वसविले. जंगल मक्तेदारांवर नियंत्रण आणण्याकरता त्यांनी जंगल कामगारांची सहकारी संस्था स्थापन केली. द्विभार्याप्रतिबंधक कायदा (Prevention of Polygamy Act) बाळासाहेबांच्या कारकिर्दीतच मान्य झाला.

---

* एशियाटीक सोसायटीचा मी १९९९-२००२ पर्यंत माननीय अध्यक्ष होतो - डॉ. रायरीकर.

** ह्या संस्थेचा मी १९७०-७२ ह्या काळात संचालक होतो - डॉ. रायरीकर.

शेतकरी, कामगार, आदिवासी, स्त्रिया, शिक्षण ह्या विषयांसंबंधी त्यावेळी मान्य झालेल्या कायद्यांची संख्या पाहिली तर बाळासाहेबांची दूरदृष्टी व त्यांच्या प्रचंड कार्याची कल्पना येते.

**राजकारणातून निवृत्त**

१९४८-५२ हा काळ बाळासाहेबांच्या कर्तबगारीचा उच्चबिंदू असला तरी ह्याच काळात त्यांच्यापुढे अनेक समस्या उभ्या होत्या. ब्रिटनचे पंतप्रधान ॲटली ह्यांनी ३०-६-१९४६ रोजी ब्रिटनने भारत सोडण्याची घोषणा केली. मुस्लीम लीगने ह्याच वेळी प्रत्यक्ष कारवाईची घोषणा केली. ह्याच काळात भारतीय घटनेची जडणघडण होत होती. युद्ध, जातीय दंगली, निर्वासितांचा प्रश्न, काळा बाजार, अन्नधान्याचा प्रश्न, चलनवाढ, नव्या भागांचा मुंबई इलाख्यात समावेश व ब्रिटिश अधिकाऱ्यांची निवृत्ती हे जटील प्रश्न होतेच. ह्याच काळात (३०-१-१९४८) महात्मा गांधींची हत्या झाली. ब्राह्मणांच्या घरांची जाळपोळ झाली.

अशा वेळी १९५० साली बाळासाहेबांना पहिला हृदयविकाराचा झटका आला व त्यानंतर त्यांनी प्रधानमंत्री म्हणून निवृत्त होण्याचे ठरविले. जरी श्री. मोरारजी देसाईंचा १९५२च्या निवडणुकीत त्यांचेच पुतणे अमुल देसाई ह्यांनी सुरतेस पराभव केला, तरी श्री. नेहरूंनी त्यांनाच मुख्यमंत्री करण्याचे ठरविले व त्याकरता विधानमंडळ कॉंग्रेस पक्षाच्या घटनेत बदल केला.

मुख्यमंत्री म्हणून निवृत्त झाल्यानंतर बाळासाहेब (२३-३-१९५२) एक वर्ष लंडनमध्ये हायकमिशनर होते. तेथून परत आल्यानंतर त्यांची शासकीय भाषा निगमाचे (Official Language Commission) अध्यक्ष म्हणून नेमणूक झाली. पुढे त्यांना कार्डिआक अस्थमाचा विकार झाला व जहांगिर नर्सिंग होममध्ये ८-३-१९५३ रोजी त्यांचे निधन झाले. बाळासाहेबांना पद्मभूषण हा किताब मिळाला होता.

**मूल्यमापन**

बाळासाहेब खेर हे पहिल्या दर्जाची विद्वत्ता असलेले गृहस्थ होते. ते एक उत्तम वक्ते होते. प्रभावी सामाजिक कार्यकर्ते, कायदेपंडित होते. स्वच्छ चारित्र्य, नैतिक मूल्यांवर निष्ठा, भ्रष्टाचाराबद्दल घृणा हे त्यांचे गुण आजच्या काळात प्रामुख्याने उठावदार दिसतील. राजकारण त्यांनी कर्तव्यपूर्तीकरता स्वीकारले, स्वार्थाकरता नाही. त्यांनी अत्यंत निष्ठेने सर्व क्षेत्रांत कार्य केले. त्यांना मुंबई इलाख्याच्या विकासाची एक दृष्टी होती. म्हणून येथील विकासाच्या प्रमुख क्षेत्रांत त्यांनी जास्तीत जास्त कार्य केले. मग ते शिक्षण क्षेत्र असो, शेतकऱ्यांचे प्रश्न

असोत, आदिवासींचे प्रश्न असोत वा कामगारांचे प्रश्न असोत. अशा उंचीची व्यक्ती मुंबई इलाख्याला सुरुवातीच्या काळात मिळाली हे भाग्य. ती परंपरा, ती निष्ठा, तो प्रामाणिकपणा असलेली माणसे आता विरळ होत चालली आहेत ही महाराष्ट्राची शोकांतिका आहे. त्यांचे ध्येयवाक्य एकच होते.

नत्वेहम् कामये राज्यं (NA TWEHAM KAMAYE RAJYAM)
न स्वर्गम ना पुनर्भवम्। (NA SWARGAM NA PUNARBHAVAM)
कामये दुःखतप्तानाम् (KAMAYE DUKKHTAPTANAM)
प्राणिनाम आर्तिनाशनम्। (PRANINAM ARTINASHANAM)

*"I do not desire kingdom nor heaven nor freedom from born again.*
*I long for the eradication of all creatures who are afflicted with pains."*

ooo

संदर्भग्रंथ :
कामत एम. व्ही. - बी. जी. खेर १९८९
भारतीय विद्याभवन, मुंबई ४०० ००७.
- हूज हू.



# ८. श्री. मोरारजी देसाई

## त्रिभाषिक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री

(२४-०४-१९५२ ते ३१-१०-१९५६)

एक कर्तबगार कार्यक्षम व करारी व्यक्ती, परंतु त्यांच्या हट्टी स्वभावामुळे ते लोकप्रिय झाले नाहीत. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांच्या सांगण्यावरून केलेल्या गोळीबारात १०५ लोक मृत्युमुखी पडल्यामुळे ते महाराष्ट्रात मुळीच लोकप्रिय झाले नाहीत.

**जन्म व शिक्षण**

श्री. मोरारजी यांचा जन्म गुजरातमधील एका सामान्य कुटुंबात भांडेला ह्या खेडेगावी झाला. वयाच्या १५ व्या वर्षीच त्यांचे वडील वारले व अशा लहान वयात त्यांच्यावर सर्व प्रापंचिक जबाबदारी आली. श्री. मोरारजींनी त्यांचे सर्व शिक्षण स्वकष्टाने व मिळालेल्या शिष्यवृत्यांच्या साहाय्याने पूर्ण केले. १९१७ साली ते विल्सन महाविद्यालयातून बी.ए. प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. १९१८ साली त्यांची डेप्युटी कलेक्टर म्हणून निवड झाली. त्या जागी त्यांनी सहा वर्षे काम केले. त्यांना बढती देण्यात झालेला अन्याय व ब्रिटिश शासनाच्या न्यायबुद्धीवरील विश्वास उडाल्यामुळे स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होण्याकरता त्यांनी वरील पदाचा राजीनामा दिला. त्यांनी सेवानिवृत्ती-वेतन घेतले नाही.

**काँग्रेसचे कार्य**

श्री. मोरारजींची व गांधींची गाठ १९३१ साली पडली. त्यांची गाधीजींवर नितांत निष्ठा होती. ते गुजराथ प्रांतिक काँग्रेस कमेटीचे सभासद होते. गांधीजींचा १९३० सालचा मिठाचा सत्याग्रह, कायदेभंगाची चळवळ (१९३३), वैय्यक्तिक सत्याग्रह व गांधीजींची 'चले जाव'ची चळवळ ह्या सर्व वेळी त्यांना कारागृहवास झाला. त्यांनी एकूण सात वर्षे तुरुंगात काढली.

**सांसदीय राजकारणात सहभाग :**

श्री. मोरारजी बाळासाहेब खेरांच्या मंत्रिमंडळात महसूल मंत्री होते (१९३७). परंतु

काँग्रेसच्या युद्धाच्या प्रश्नावर राजीनामा देण्याच्या आदेशानुसार सर्व मंत्रिमंडळाने राजीनामा दिला (१९३९). श्री. बाळासाहेब खेरांच्या दुसऱ्या मंत्रिमंडळात (१९४६) श्री. मोरारजी हे गृहमंत्री म्हणून समाविष्ट झाले. त्यांचा कणखरपणा, प्रशासनावर त्यांची असलेली पकड, ह्यामुळे ते गृहमंत्री असताना त्यांची जरबही मोठी होती. ३१/१/१९४८ रोजी, म्हणजे ज्यावेळी महात्मा गांधींची हत्या झाली, त्यावेळी त्यांनी हिंसेला प्रभावी रीतीने आळा घातला.

त्यांनी भ्रष्टाचाराविरुद्ध मोठी मोहीम उघडली होती. बस ट्रान्सपोर्टचे राष्ट्रीयीकरण, न्यायालय व अंमलबजावणी खाते यांची फारकत, तुरुंग सुधारणा करण्याकरता आखलेला कार्यक्रम व गुन्हेगार जातींची सुधारणा करण्याकरता केलेले कार्य ही त्यांची त्यावेळची प्रमुख कामगिरी.

याशिवाय पोलिसांकरता कल्याण निधी, त्यांच्या गणवेशात बदल, मध्यरात्री हॉटेल बंदचा आदेश, सायकल रिक्षावर बंदी, थिएटरमध्ये धूम्रपानावर बंदी, फिल्म सेन्सॉरची स्थापना ह्या गोष्टी त्यांनी कार्यान्वित केल्या. सत्याग्रहात भाग घेतल्यामुळे ज्या कर्मचाऱ्यांना कमी केले होते त्यांची पुनश्च नेमणूक केली व इतरांना १९४६ पासून सेवानिवृत्त होण्याचे आदेश दिले. दारुबंदीची त्यांनी कठोरपणे अंमलबजावणी केली. त्यातून येणारा तोटा भरून काढण्याकरता त्यांनी विक्रीकर बसवला.

### मुख्यमंत्री

श्री. बाळासाहेब खेरांनी प्रकृतिअस्वास्थ्याच्या कारणाने निवृत्ती घेण्याचे ठरविल्यामुळे १९५२ साली श्री. मोरारजी मुख्यमंत्री झाले. जरी ते त्यावेळी झालेल्या निवडणुकीत हरले तरी त्यांनीच मुख्यमंत्री व्हावे असा पं. नेहरूंनी आदेश दिला व त्यांना मुख्यमंत्री होता यावे म्हणून विधानमंडळ काँग्रेस पक्षाची घटना दुरुस्त केली. कारण श्री. मोरारजी ज्यावेळी मुख्यमंत्री झाले त्यावेळी ते कोणत्याच सभागृहाचे सदस्य नव्हते. नंतर ते सहा महिन्यांच्या मुदतीत निवडून आले.

१९५२ ते १९५६ पर्यंत कर्नाटक, गुजराथ व महाराष्ट्र ह्या तीन विभागांचे मुंबई राज्य होते. परंतु ह्यावेळी भाषावार प्रांतिक रचनेकरता निवृत्त न्यायाधीश फझलअली यांच्या अध्यक्षतेखाली राज्य पुनर्रचना आयोग नेमण्यात आला. त्या समितीच्या शिफारशीनुसार कर्नाटक मुंबई इलाख्यातून वेगळा झाला. मुंबई हे द्विभाषिक राज्य झाले.

परंतु गुजरातच्या लोकांनी 'महागुजरात'करता हिंसक चळवळ केली. मुख्यमंत्री मोरारजींनी

उपवास केला. महाराष्ट्रात 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रा'करता चळवळ झाली. मोरारजींनी ह्या चळवळीविरुद्ध कठोर पावले उचलली व त्याचा परिपाक म्हणजे ज्यांनी आत्माहुती दिली त्यांचे स्मारक १९६० नंतर हुतात्मा चौकात उभारण्यात आले. श्री. सी. डी. देशमुख ह्यांनी संयुक्त महाराष्ट्राकरता आपल्या अर्थमंत्रिपदाचा राजीनामा दिला.

ह्याच वेळी गुजरात कॉंग्रेस कमेटीने द्विभाषिक राज्याला ठराव करून मान्यता दिली आणि द्विभाषिक मुंबई राज्य स्थापन झाले. मोरारजी देसाई हे द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री होण्यास तयार होते, परंतु त्यांना नेते म्हणून एकमताने बिनविरोध मान्यता हवी होती. तथापि श्री. भाऊसाहेब हिरे ह्यांच्या पर्यायी नेतृत्वाने श्री. मोरारजी यांना विरोध करण्याचे ठरविले व ह्यामुळे श्री. मोरारजींनी आपली उमेदवारी मागे घेऊन पर्यायी नेते म्हणून श्री. यशवंतराव चव्हाण यांचे नाव सुचविले. अशा तऱ्हेने श्री. यशवंतराव चव्हाण हे द्विभाषिक मुंबईचे पहिले मुख्यमंत्री झाले.

१९५६ ते १९६० पर्यंत श्री. यशवंतरावांनी द्विभाषिकाचा कारभार पाहिला. परंतु द्विभाषिकाविरुद्ध लोकक्षोभ होता. त्याला जनमान्यता नव्हती. आपला क्षोभ व्यक्त करण्याकरता त्यांनी पं. नेहरूंविरुद्धही मोर्चे काढले. अंततः जनादेश नसल्यामुळे द्विभाषिक राज्य चालविण्यास ते असमर्थ आहेत असे श्री. यशवंतरावजींनी कॉंग्रेस श्रेष्ठींना सांगितले. परिणामी १९६० साली मुंबईसह 'संयुक्त महाराष्ट्र' स्थापन होऊन महाराष्ट्राच्या स्वतंत्र राज्याच्या आकांक्षेला दाद मिळाली. श्री. यशवंतरावजी फक्त दोन वर्षे संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते व चीनने भारतावर केलेल्या हल्ल्याच्या वेळी पं. नेहरूंनी श्री. यशवंतरावांना संरक्षणमंत्रिपदासाठी पाचारण केले. अशा तऱ्हेने सह्याद्री हिमालयाच्या रक्षणाकरता धावला!

**श्री. मोरारजींचे मुख्यमंत्री म्हणून कार्य**

आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात श्री. मोरारजींनी अनेक पुरोगामी प्रकल्प मार्गी लावले. न्याय व अंमलबजावणी खात्याचे पूर्ण विभाजन, कामगार कल्याण बोर्डाची स्थापना, हिंदी शिक्षणास उत्तेजन ही त्यांची प्रमुख कार्ये. त्यांनी निजामाच्या राज्यात चाललेल्या रझाकार चळवळीवर बंदी घातली. त्याच बरोबर गोव्याच्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेणारांना प्रतिबंध केला.

**श्री. मोरारजींचे केंद्रमंत्री म्हणून कार्य**

महाराष्ट्राचे मंत्रिपद सोडून श्री. मोरारजी १९५६ साली दिल्लीस वाणिज्य मंत्री म्हणून

गेले. पुढे मुंदडा प्रकरणामुळे श्री. टी. टी. कृष्णमाचारी ह्यांना राजीनामा द्यावा लागल्यामुळे ते अर्थमंत्री झाले. मुंदडांची चौकशी जस्टीस छगलांनी केली व २३/५/१९५८ साली श्री. मोरारजी अर्थमंत्री झाले.

ज्यावेळी श्री. मोरारजी अर्थमंत्री झाले त्यावेळी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेची सुरुवात झाली होती. त्यावेळी वित्तीय तूट, परकीय चलनाची तूट, बेरोजगारी हे प्रमुख प्रश्न होते. आर्थिक स्थैर्य आणण्याकरता सुवर्ण नियंत्रण व सक्तीची बचत योजना ह्यांसारख्या योजना मोरारजींना कार्यान्वित केल्या.

परंतु पुढे ज्येष्ठ काँग्रेस नेत्यांनी पक्षाचे काम करावे ह्या सबबीवर 'कामराज योजना' आली व मोरारजींना अर्थमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. २७ मे १९६४ साली नेहरूंचे निधन झाले. पंतप्रधानपदाच्या रिंगणात मोरारजी होते, परंतु पक्षाने श्री. लालबहादुर शास्त्री ह्यांना पक्षनेते म्हणून निवडले. पसंतीचे खाते न मिळाल्यामुळे मोरारजी मंत्रिमंडळात सामील झाले नाहीत.

शास्त्रीजींनंतर श्रीमती इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या. मोरारजींना उपपंतप्रधान केले (मार्च १९६६). त्यांनी रुपयाचे अवमूल्यन केले व शासकीय सुधारणा मंडळ (Administrative Reforms Commission) नेमले. भारताचे राष्ट्रपती कोणी व्हावयाचे ह्याबाबत श्रीमती इंदिरा गांधी व श्री. मोरारजी ह्यांच्यात मतभेद झाले. श्री. मोरारजी हे रेड्डींच्या बाजूचे होते तर श्रीमती इंदिरा गांधींना श्री. गिरी हे राष्ट्रपती पाहिजे होते. श्री. मोरारजी व श्रीमती इंदिरा गांधी ह्यांचात बँकांचे राष्ट्रीयीकरण, संस्थानिकांचे तनखे बंद करणे ह्याबाबत मतभेद झाले. तेव्हा त्यांचे अर्थमंत्रिपद इंदिराजींनी काढून घेतले. राजीनामा देण्याशिवाय दुसरा पर्यायच श्री. मोरारजींपुढे नव्हता. नंतर काँग्रेस पक्षच इंदिरा काँग्रेस (आय) आणि काँग्रेस (ओ) असा दुभंगला.

**आणीबाणी**

१९७६ साली श्रीमती इंदिराजींनी आणीबाणी जाहीर केली. आणीबाणी उठवल्यानंतर १४/३/१९७७ रोजी निवडणुका होऊन मोरारजी बिगर काँग्रेसचे पंतप्रधान झाले व पंतप्रधान होण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा पूर्ण झाली. ते वयाच्या ८१व्या वर्षी पंतप्रधान झाले, परंतु त्यांची वागण्याची तऱ्हा, कार्यपद्धती, हट्टी स्वभाव ह्यांत कोणताच फरक झाला नाही. त्याचबरोबर त्यांच्या मुलाच्या उद्योगधंद्यांबद्दलही बरीच टीका झाली. परिणामी त्यांना १५/७/

१९७९ रोजी बहुमत नसल्यामुळे राजीनामा द्यावा लागला. १०/१/१९९५ रोजी त्यांचे निधन झाले.

**मोरारजींचे कार्यक्षेत्र - मूल्यमापन**

मोरारजींनी अनेक क्षेत्रांत काम केले. ते गुजराथ विद्यापीठाचे कुलगुरू होते. प्रशासन सुधारणा मंडळाचे अध्यक्ष होते. १९४६ - ५२ ह्या काळात ते विधिमंडळाचे सदस्य होते. १९५६ ते १९६७ आणि १९७१ ते १९७७ या काळात ते पार्लमेंटचे सदस्य होते. केंद्रात ते वाणिज्य व अर्थमंत्री होते. गांधी स्मारक निधी, गांधी पीस फौंडेशन, हिंदुस्थानी प्रचारसभा ह्या संस्थांचे अध्यक्ष होते. कर्नाटक विद्यापीठाने त्यांना डी. लिट. पदवी दिली होती, तर भारत सरकारने त्यांना भारतरत्न हा किताब दिला होता. पाकिस्तान सरकारने 'निशान ए पाकिस्तान' या किताबाने सन्मानित केले होते.

व्यक्ती म्हणून मोरारजींविषयी परस्परविरोधी मते आहेत. त्यामुळे कदाचित हट्टीपणा असेल. कारण अपेक्षा नसली तर मनधरणी करण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. शिवाय ते स्पष्टवक्ते होते. तत्वाबाबत कोणतीही तडजोड करण्यास ते कधीच तयार नसत व त्याकरता त्यांना मोठी किंमत द्यावी लागली आणि त्यांनी दिलीही. असे करताना त्यांनी अनेक विरोधकही निर्माण केले. परंतु थातुरमातुर बेरजेचे राजकारण करण्याची त्यांची तयारी नव्हती. लोकांच्या बरोबर मतभेद असताना जाणे हे कसब त्यांच्यात नव्हते. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व वादग्रस्त झाले. जनमानसात त्यांची प्रतिमा हट्टी व हेकेखोर अशी निर्माण झाली.

कम्युनिझम हे तत्त्वज्ञान प्रतिगामी आहे असे ते मानत. गांधी-तत्त्वावर त्यांची अढळ श्रद्धा होती. त्यांची लोकशाहीवर नितांत श्रद्धा होती. गरीब व श्रीमंतांमधील दरी त्यांना मान्य नव्हती. लोककल्याणाकरता राजकारण हे साधन आहे हे त्यांचे मार्गदर्शक तत्व होते. एकूण ते अत्यंत कर्तबगार, उत्तम, प्रामाणिक, चारित्र्यवान प्रशासक होते ह्याबद्दल दुमत होणार नाही. म्हणूनच त्यांच्या मृत्युनंतर कोणीही त्यांच्याबद्दल अपमानकारक उद्गार काढत नाही. ०००

---

संदर्भसूची :

कवडी नरेश - मोरारजी देसाई १९७८- कॉंटिनेंटल प्रकाशन, विजयनगर, पुणे ३०.

कराका डी. एफ. - मोरारजी १९६५ - टाईम्स ऑफ इंडिया प्रेस.

देसाई मोरारजी - स्टोरी ऑफ माय लाईफ- १- २.

मेहेंदळे विश्वास - पंडितजी ते अटलजी (पुणे).



# ९. श्री. यशवंतराव चव्हाण

**संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री**

(१-११-५६ ते १-५-६०)

(१-५-६० ते १९-११-६२)

## संयुक्त महाराष्ट्राची चळवळ

यशवंतराव १९५६ साली द्विभाषिक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. पण महाराष्ट्रात हा काळ चळवळीचा होता. १०५ लोकांनी संयुक्त महाराष्ट्राकरता बलिदान केले. लोकांचा क्षोभ वाढला होता. यशवंतरावांना महाराष्ट्रद्रोही म्हणून लोक संबोधू लागले. अशा परिस्थितीत यशवंतरावांनी संयुक्त महाराष्ट्राकरता प्रयत्न तर केलाच, पण त्याबरोबर महाराष्ट्राच्या विकासाचे सर्वांगीण चित्र जे त्यांच्या मनात होते, त्याला दृश्य स्वरूप देण्याचाही प्रयत्न केला ही एक गौरवास्पद बाब आहे. एका अर्थाने महाराष्ट्राच्या जडणघडणीचे ते एक शिल्पकार होते.

## जन्म व शिक्षण

यशवंतरावांचा जन्म १२/३/१९१३ रोजी त्यांच्या आजोळी खानापूर तालुक्यातील देवराष्ट्र ह्या गावी झाला. दुर्दैवाने त्यांच्या वडिलांचे अकस्मात निधन झाले.तेव्हा शिक्षणाचे महत्त्व जाणून त्यांच्या आईने कऱ्हाडास बिऱ्हाड केले व तेथूनच ते मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांनी १९३०-३२च्या चळवळीत कारावास सोसला होती, तरी त्यांनी आपले शिक्षण पुरे केले. ते १९३८ साली कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजातून बी.ए. झाले व १९/७/१९४१ रोजी पुण्यातून एल.एल.बी. झाले. अर्थात त्यांची शैक्षणिक कारकीर्द सामान्यच होती.

कऱ्हाडला आल्यामुळे यशवंतरावांचा अनेक दृष्टींनी फायदा झाला. त्यावेळी होणाऱ्या वैचारिक चळवळीची त्यांना माहिती झाली. मग ते स्त्रियांचे प्रश्न असोत, सत्यशोधक चळवळ असो वा इतर सामाजिक-राजकीय प्रश्न असोत.

वाचन व वक्तृत्त्व ह्याबाबत शिक्षण त्यांना कऱ्हाडच्या वातावरणात मिळाले. चव्हाणांची सामाजिक कार्यात भाग घेण्याची सुरुवात कऱ्हाडला झाली. युगपुरुषांचे उत्सव साजरे करताना त्यांनी लोकाभिसरणाला चालना दिली. त्यांनी केशवराव जेधे व विठ्ठलरामजी शिंदे ह्यांच्या तत्वावर आधारित ग्रामीण जागृती करण्याचा प्रयत्न केला. पुढे महात्मा गांधींच्या चळवळीमुळे सत्यशोधक चळवळीचा जोर कमी होऊन बहुजन समाज राष्ट्रीय चळवळीत सामील झाला ही गोष्ट वेगळी. परंतु लोकमान्यांचा 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' हा संदेश सामान्य लोकांपर्यंत पोहोचविला पाहिजे ही त्यांची धारणा होती.

**यशवंतराव व राजकीय चळवळ**

हा काळ (१९३२-४२) अतिशय महत्त्वाच्या राष्ट्रीय घडामोडींचा होता. महात्मा गांधींची सविनय कायदेभंगाची चळवळ, 'चले जाव' चळवळ ह्यांत यशवंतरावांनी सक्रिय भाग घेतला व त्यांना त्याकरता सक्तमजुरीची शिक्षाही झाली.

तुरुंग हा एका अर्थाने यशवंतरावांची ज्ञानगंगोत्रीच ठरली. तुरुंगात त्यांना जो ज्येष्ठ राजकीय पुढाऱ्यांचा सहवास मिळाला त्यामुळेच त्यांना विविध क्षेत्रांतील नवविचारांचा परिचय झाला व प्रगल्भताही वाढली. त्यांना मनात त्यामुळे एक वैचारिक वादळ, द्वंद्व सुरू झाले. गांधीवाद, मार्क्सवाद, समाजवाद, हिंदुत्ववाद ह्यांच्या स्वरुपात त्यांच्यापुढे वैचारिक आव्हाने उभी ठाकली व अखेर १९३९ साली त्यांनी इतर विचारांशी सहमत न झाल्यामुळे काँग्रेसला निष्ठा वाहिली.

**यशवंतराव व संसदीय राजकारण**

१९३७ साली प्रांतिक स्वायत्ततेखाली काँग्रेसने अधिकार स्वीकार केला व त्यावेळी ते सातारा मतदारसंघातून निवडून आले. श्री. बाळासाहेब खेरांनी त्यांची संसदीय सचिव (Parliamentary Secretary) म्हणून नेमणूक करून त्यांच्याकडे होमगार्ड व गृहखाते सोपविले. होमगार्ड ही संस्था आणीबाणीत बंदोबस्ताकरता माणसे उपलब्ध व्हावीत म्हणून बाळासाहेब खेर व मोरारजी देसाई ह्यांनी सुरू केली होती. १९४६ नंतर १९५२ साली बाळासाहेब खेरांचे दुसरे मंत्रिमंडळ स्थापन झाले. त्या मंत्रिमंडळात यशवंतराव चव्हाण कॅबिनेट दर्जाचे नागरी पुरवठा मंत्री होते. अर्थात त्यावेळी त्रैभाषिक मुंबई राज्य होते. महात्मा गांधींच्या आग्रहामुळे ह्यावेळी नियंत्रणे उठविली गेली. यशवंतराव स्थानिक स्वराज्य खात्याचेही मंत्री होते. अर्थात सत्ता विकेंद्रीकरणाचे चव्हाण पुरस्कर्ते होतेच. कारण ते एक विकासाचे व लोकशाही तंत्राचे शिक्षण देण्याचे साधन आहे अशी त्यांची भावना होती.

**यशवंतराव मुख्यमंत्री होतात**

राज्य पुनर्रचना आयोगाच्या शिफारशीनुसार कर्नाटक महाराष्ट्रापासून वेगळा झाला. येथे द्विभाषिक राज्य आले. महागुजरातकरता गुजरातमध्ये चळवळ झाली, तर संयुक्त महाराष्ट्राकरता मुंबई व महाराष्ट्रात चळवळीचा जोर वाढला. एकमताने व बिनविरोध निवड होणार असेल तर द्विभाषिकाचे मुख्यमंत्री होण्याची मोरारजींची तयारी होती. परंतु श्री. भाऊसाहेब हिरे हे त्यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार होते. ह्या वादात मुख्यमंत्रिपदाची माळ यशवंतरावांच्या गळ्यात पडली. परंतु जनादेशाविरुद्ध जाणे मला जमणार नाही असे यशवंतरावांनी श्रेष्ठींना सांगितले आणि द्विभाषिक राज्य चालविण्यास मी असमर्थ आहे असेही बजावले. परिणामी १९६० साली (मुंबईसह) संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाला. अशा तऱ्हेने यशवंतराव चव्हाण संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री झाले.

मुख्यमंत्री होण्याची यशवंतरावांची ही दुसरी खेप. १९५६-६० ह्या काळात द्विभाषिक असताना ते द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री होते, तर १९६०-६२ ह्या काळात ते संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. असा त्यांचा मुख्यमंत्रिपदाचा काळ सहा वर्षांचा आहे. १९६२ साली चीन युद्धाच्या वेळी ते केंद्रीय संरक्षण मंत्री म्हणून दिल्लीस गेले.

**यशवंतरावांचे मुख्यमंत्रिपदातील कार्य**

संयुक्त महाराष्ट्राविषयी यशवंतरावांची भूमिका स्पष्ट होती. त्यांना 'मराठ्यांचे' राज्य नको होते, तर 'मऱ्हाठ्यांचे' राज्य पाहिजे होते. त्यांना बेरजेचे राजकारण करावयाचे होते. श्री. विठ्ठलराव पाटलांनी त्यांच्या भूमिकेचे उत्तम वर्णन केलेले आहे. ते म्हणतात, ''यशवंतरावांची भूमिका ही शिल्पकाराची होती. द्रष्टा राजकारणी व विकासाच्या आशयाची पूर्ण कल्पना असलेले ते धुरंधर राजकारणी होते.'' त्यामुळे शिक्षण, शेती, उद्योग, स्त्रियांचा उद्धार, अस्पृश्यता निवारण, विज्ञाननिष्ठा व ज्ञानी समाजनिर्मिती, सांस्कृतिक विकास, दलितांचा उद्धार, ग्रामीण व नागरी भागांतील विकासाचा समतोल, सत्तेचे विकेंद्रीकरण हे त्यांचे ध्येय होते व ह्यांचा त्यांना ध्यास होता.

त्यांनी ग्रामीण भागाकरता अनेक योजना आखल्या. साखर-सूत-शेतीमालावर प्रक्रिया ह्यांना सहकारी तत्त्वाची बैठक, सहकारी तत्त्वावर कर्जपुरवठा, सहकारी मार्केटिंग ह्या प्रमुख गोष्टी सांगता येतील. यशवंतरावांच्या मते सहकार ही ग्रामीण भागातील लोकशाहीचे शिक्षण देणारी बालवाडीच होती. एका अर्थाने यशवंतरावांनी शेतीप्रधान उद्योगांच्या विकासाला दिशा व वेग दिला.

सत्तेचे विकेंद्रीकरण हा लोकशाहीचा गाभा आहे अशी यशवंतरावांची धारणा होती. त्यातून ग्रामीण विकासाची तळमळ असलेले नेतृत्त्व निर्माण होणार होते. ह्याकरता त्यांनी ग्रामपंचायत, तालुकापंचायत व जिल्हा परिषदा ह्या संस्था स्थापण्यास उत्तेजन दिले.

शिक्षणाच्या क्षेत्रात त्यांची प्रमुख कामगिरी म्हणजे मराठवाडा व शिवाजी विद्यापीठांची स्थापना. कमी उत्पन्न असलेल्या लोकांकरता मोफत शिक्षणाची सोय, नवीन शिक्षण संस्था स्थापण्यास उत्तेजन, ग्रामीण भागात शिक्षणाच्या सोयीकरता वसतीगृहांची सोय इत्यादी कामांचा उल्लेख करता येईल. सैनिकी शिक्षणाकरता त्यांनी साताऱ्यास सैनिकशाळा सुरू केली. कारण सातारा सैन्याच्या भरतीचे एक प्रमुख केंद्र होते. मातृभाषेत पाठ्यपुस्तके उपलब्ध व्हावीत म्हणून त्यांनी ते कार्य भाषा संचालनालयाकडे सोपविले. त्याबरोबर मराठीत पुस्तके तयार करण्याकरता एक समिती नेमली. भाषा संचालनालयाने वेगवेगळ्या भाषांतील पारिभाषिक शब्दांचे कोश तयार केले. वैचारिक चलनवलन वाढविण्याकरता त्यांनी साहित्य संस्कृती मंडळ स्थापन केले. त्याचबरोबर त्यांनी पंडित लक्ष्मणशास्त्री जोशी ह्यांच्या अध्यक्षतेखाली विश्वकोश मंडळाची स्थापना केली. हेतू एकच होता - वाढत्या ज्ञानाच्या कक्षांची माहिती व ओळख बहुजनसमाजाला व्हावी. आदिवासी मुलांना शिक्षण घेण्याकरता उत्तेजन द्यावे म्हणून त्यांनी अनेक सवलती आदिवासींना दिल्या.

सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने त्यांनी महार वतने खालसा करून अस्पृश्यांची दास्यातून सुटका केली (१९५८). अनेक अस्पृश्यांनी डॉ. आंबेडकरांच्या धुरिणत्वाखाली बौद्ध धर्माचा स्वीकार केला होता. त्यावेळी या नवबौध्दांना त्याच सवलती उपलब्ध झाल्या पाहिजेत अशी त्यांची भूमिका होती. ते जातिभेदाच्या विरुद्ध होते. कारण त्यामुळे उच्च-नीच ह्या भावनेला उत्तेजन मिळते व म्हणूनच त्यांनी शेतमजूर, हरिजन, गिरीजन, दीनदलित ह्या सर्वांना शैक्षणिक, राजकीय व सामाजिक संधी उपलब्ध करून देण्यास उत्तेजन दिले.

यशवंतराव हे पट्टीचे रसिक होते. त्यांना चांगली पुस्तके जमविण्याचा व वाचण्याचा छंद होता. त्याच बरोबर नाटके, कलावंत, कलाक्षेत्र ह्यात त्यांना रस होता. त्याकरता त्यांनी जास्तीत जास्त सवलती देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी नाटकांवरील कर रद्द केला. नाट्यकर्मींना आर्थिक मदत देण्याकरता योजना आखल्या. खुल्या नाट्यगृहाची कल्पना प्रसृत केली. त्याचपमाणे साहित्यिकांना पुरस्कार आणि संगीत, नृत्य व नाट्यशाळा ह्यांना अनुदान सुरू केले.

"थोडक्यात, त्यांचे प्रमुख ध्येय होते समाजाचे सर्वांगीण, बहुरंगी परिवर्तन करणे. एक विचारी, सुसंस्कृत, विज्ञाननिष्ठ समाज निर्माण करण्याकरता पोषक वातावरण निर्माण करणे व ते साध्य करण्याकरता सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक, शेती व सांस्कृतिक क्षेत्राचा विकास करण्यास चालना देणे हा त्यांचा ध्यास होता.

सुदैवाने यशवंतरावांच्या स्वरुपात महाराष्ट्राला एक प्रभावी व द्रष्टे नेतृत्व मिळाले. महाराष्ट्राच्या विकासाची गंगा कोणत्या दिशेने वाहिली पाहिजे ह्याचा आराखडा त्यांनी पुढच्या पिढीला आपले धोरण व कृती यांच्या द्वारे देऊन महाराष्ट्राच्या सर्वंकष व विविधांगी विकासाच्या दिशा दाखवून दिल्या." - विठ्ठलराव पाटील.

**यशवंतराव केंद्रीय मंत्री**

चीनची भारतावर स्वारी आल्यानंतर श्री. कृष्ण मेनन यांच्या जागी यशवंतरावजी संरक्षण मंत्री झाले (२१/११/१९६२). परंतु थोड्या काळातच चीनने माघार घेतली. १९६७ साली ते नाशिक मतदार संघातून निवडून आले व केंद्रीय गृहमंत्री झाले. १९७० साली ते अर्थमंत्री झाले. १९७४ साली ते परराष्ट्रमंत्री झाले. ताश्कंदला लालबहादुर शास्त्रीजी गेले होते. त्यांच्याबरोबर यशवंतरावही गेले होते. दुर्दैवाने ताश्कंदलाच शास्त्रीजींचे निधन झाले.

**यशवंतराव विरोधीपक्ष नेते व उपपंतप्रधान**

१९७७ साली काँग्रेसचा पराभव होऊन जनता पक्ष अधिकारारुढ झाला. काँग्रेसने यशवंतरावांना विरोधीपक्ष नेते म्हणून निवडले. पुढे जनता पक्ष फुटून श्री. चरणसिंग ह्यांचे मंत्रिमंडळ आले. त्यात यशवंतराव उपपंतप्रधान होते. परंतु चरणसिंगांचे मंत्रिमंडळ गेल्यावर यशवंतरावांना कोणतेच सत्तास्थान मिळाले नाही. एकूण त्यांची प्रतिमा 'संधिशोधू' किंवा 'कुंपणावर बसणारा माणूस' अशीच झाली.

**यशवंतराव व काँग्रेस**

काँग्रेस ही त्यांची जननी होती. १९८० नंतर इंदिरा गांधींनी त्यांना आठव्या वित्त-आयोगाचे अध्यक्ष नेमले. त्यामुळे जरी यशवंतरावांच्या नेतृत्वाला तात्पुरती उभारी आली तरी त्यांचे तेज मात्र गेले. त्यातच सौ. वेणुताईंचे १/६/८३ रोजी निधन झाले. ते पूर्णतः सामाजिक व कौटुंबिक दृष्टीने एकाकी झाले. ह्याचा त्यांच्या मनावर परिणाम झाला. ते आजारी पडले. १९८४ च्या निवडणुकीचा फॉर्म त्यांना भरायचा होता, परंतु २५/११/१९८४ रोजीच महाराष्ट्राच्या ह्या ज्येष्ठ नेत्याचे निधन झाले.

यशवंतरावांना अनेक सन्मान मिळाले होते. पुणे विद्यापीठाने त्यांना डी.लिट. पदवी दिली होती.

**यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व**

यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल एकाने लिहिले आहे - 'पहिल्या दर्जाचे सभ्य गृहस्थ, नम्र व सदभिरुचीयुक्त वागणे.' समंजस स्वभाव, तडजोडी व वैचारिक देवाणघेवाण ह्यांना प्राधान्य अशी त्यांची वैशिष्ट्ये सांगितली जातात. दिलदार सामाजिक कार्यकर्ता हे त्यांचे स्वभावाचे गौरवपूर्ण अंग होते. जातिभेदाचे ते निष्ठुर टीकाकार होते. त्यांच्या आजूबाजूला मराठेतर व्यक्ती व विचारवंतच जास्त होते.

चांगली पुस्तके खरेदी करणे, ती वाचणे, त्यांच्यावर चर्चा करणे हा त्यांचा छंद होता. त्यांना लेखक होण्याची इच्छा होती, परंतु राजकारणातील धावपळीमुळे त्यांना वेळ झाला नाही. त्यांच्या आत्मचरित्राचा एकच भाग प्रसिद्ध झाला. तरी त्यांच्या भाषणांचे चार संग्रह (ह्यांत वेणुताईंना लिहिलेल्या पत्रांचा समावेश होतो) व कृष्णाकाठ हे आत्मचरित्र एवढे लेखन त्यांनी केले.

राजकारणी म्हणून यशवंतरावांची अनेक वैशिष्ट्ये होती. ते ध्येय्यवादी होते. ते गुरू मानत नसत. त्यांनी सत्तेकरता राजकारण केले नाही. सत्यं, शिवं, सुदरम् हे त्यांचे ब्रीदवाक्य होते. त्यामुळे त्यांना सर्व शास्त्रांत, कलांत रस होता व त्या विषयातील तज्ज्ञांच्या बरोबर त्यांचा वावर होता.

ते संघटनाकुशल तर होतेच, पण त्याचबरोबर त्यांना सामान्य माणसाच्या प्रश्नांची जाण होती. त्यांची नेहरूंवर नितांत निष्ठा होती. चव्हाण ही व्यक्ती नसून एक विचार आहे असे म्हटले जात असे. म्हणूनच देशाचा विकास हा नेहरूंच्या आशीर्वादाशिवाय होणार नाही ह्या गाढ श्रद्धेतूनच त्यांनी महाराष्ट्राचे द्विभाषिक राज्य चालवले. त्यांचा पक्षभेद व फूट ह्यांवर विश्वास नव्हता. म्हणूनच त्यांनी 'आयाराम गयाराम' हा शब्दप्रयोग प्रचलित केला!

श्री. कुमार केतकरांनी यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाचे खालील शब्दांत विश्लेषण केले आहे. (श्री.साखळकर - डॉ. भेंडे - 'महाराष्ट्राची मानचिन्हे' पृष्ठ २६१). ते म्हणतात, की मानचिन्हे या शब्दानेच राष्ट्रीय जीवनातील त्यांची उंची स्पष्ट होते. त्यांच्या वास्तववादात आदर्शवाद होता. अर्थात त्यांचे टीकाकार त्या वास्तववादाला व्यवहारवाद वा संधिसाधूपणा समजतात. केतकर म्हणतात की त्यांच्या राजकारणात एक विलक्षण रसायन होते. त्यात सामाजिक चळवळीचा वारसा, अध्ययनाची जोड, नेहरूवाद, गांधी तत्वज्ञान, फुले-आंबेडकरांच्या

बंडखोरीची झाक, रॉयवाद ह्यांचे सुरेख मिश्रण होते आणि म्हणून वैचारिक देवाणघेवाण व सामाजिकपणा ह्यावर त्यांचा विश्वास होता.

त्यांनी मुख्यमंत्री असताना केलेल्या सर्वंकष विस्ताराचे वर्णन वर केलेलेच आहे. त्यांनी मुख्यमंत्रिपद, संरक्षण, अर्थमंत्री, परराष्ट्रीय मंत्रिपद ही सर्व पदे भूषविली. ते भारताचे उपपंतप्रधानही झाले. परंतु त्यांच्या द्विधावृत्तीमुळे प्रधानमंत्री होण्याची संधी असतानाही ते पद त्यांच्या हातून सुटले. श्री. पाटील ह्यांनी वर्णन केल्याप्रमाणे त्यांचे नेतृत्त्व संपूर्ण राज्याचा विचार करणारे होते.

श्री. विठ्ठलराव पाटील म्हणतात की ते महाराष्ट्राचे शिल्पकार होते. त्याबरोबर चतुर राजकारणी, कर्तव्यदक्ष प्रशासक, रसिक साहित्यिक, ज्ञानपिपासू व चारित्र्यसंपन्न नेता असे अत्यंत उच्च श्रेणीचे ते एक मानव होते.

अर्थात एक गोष्ट मान्य करावयास पाहिजेच की त्यांनी महाराष्ट्राच्या विकासाला एक दिशा दिली. त्या विकासाचा आशय ठरविला. परंतु त्यांनी त्यांच्या विचारांची ध्वजा पुढे तितक्याच जागृततेने नेणारे नेतृत्त्व निर्माण केले नाही. सत्तेवर दृढपणे टिकून राहणे हा सर्व पुढाऱ्यांचा स्थायीभाव होता. कदाचित त्यामुळे प्रभावी नेतृत्त्वाची पोकळी निर्माण झाली. हीच यशवंतरावांची व महाराष्ट्राची शोकांतिका. कारण ह्या संधिसाधू राजकारणातच महाराष्ट्रातील सध्याच्या भ्रष्ट राजकारणाची पाळेमुळे शोधली पाहिजेत.

महाराष्ट्राच्या विकासाबद्दल यशवंतरावांची भूमिका किती विशाल, पुरोगामी आणि न्याय्य होती याची साक्ष यशवंतरावांनी दिलेल्या एका भाषणात मिळते. या भाषणात ते म्हणतात, ''महाराष्ट्र राज्यामध्ये आम्ही जे करणार आहोत त्याची दिशा अगदी स्पष्ट आहे. राष्ट्रीय ऐक्यास पोषक होईल अशा तऱ्हेनेच आपल्याला महाराष्ट्र राज्यातील सर्व वर्गांचा विकास व उन्नती घडवून आणायची आहे. सामाजिक एकात्मतेच्या बाबतीत आपले काही खास प्रश्न असून ते सोडविण्यासाठी आपण योग्य ते उपाय शोधून काढले पाहिजेत. नव्या राज्यामधले काही प्रदेश आर्थिक दृष्ट्या अविकसित व मागासलेले आहेत. स्वाभाविकपणे त्यांचा विकास ही महाराष्ट्र सरकारच्या दृष्टीने खास विचाराची बाब आहे. ... समान संधी ही सामाजिक न्यायाच्या कल्पनेतील महत्वाची बाब आहे. म्हणून बुद्धी असूनही केवळ पैशांच्या अभावी तिला वाव मिळत नाही असे होता कामा नये. महाराष्ट्रात अशा प्रकारे सर्वांना सामाजिक व आर्थिक न्याय मिळेल अशी परिस्थिती निर्माण करण्याकरता आपण झटले पाहिजे.''

०००

संदर्भग्रंथ

१) भास्कर लक्ष्मण भोले 'यशवंतराव चव्हाण : राजकारण आणि साहित्य' - साकेत प्रकाशन.

२) कुमार केतकर 'पोकळीतील राजकारण' - लोकसत्ता, लोकरंग १९/३/२००६

३) कुमार केतकर 'महाराष्ट्राची मानचिन्हे - नामदार यशवंतराव चव्हाण' (संपादक प्रा. साखळकर व डॉ. भेंडे, पृ.२८१)

४) राजीव खांडेकर 'राजयोगाच्या प्रतिष्ठेत महाराष्ट्र' - लोकसत्ता, लोकरंग, १९/३/०६

५) श्रीकांत चौगुले 'यशवंतराव चव्हाण' - अविष्कार प्रकाशन, जानेवारी २००२

६) यशवंतराव चव्हाण 'कृष्णाकाठ भाग १' आत्मचरित्र, - प्रेस्टीज पब्लिकेशन (१९८४)

७) श्री. नागनाथ देगे 'जनता मनातील यशवंतराव' - पद्मगंधा प्रकाशन, एरंडवणे, पुणे

८) बी. बी. काळे 'मॅन ऑफ क्रायसिस', - सोमैय्या पब्लिकेशन प्रा. लि., १९७१

९) श्रीपाद नांदेडकर 'यशवंत पंचायत' - राज्य अभियान, पुण्यनगरी, रविवार १२/३/०६

१०) विठ्ठलराव पाटील 'महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण' - महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ

११) विठ्ठलराव पाटील 'यशवंतराव चव्हाण - विविधांगी व्यक्तिमत्त्व' - प्रकाशक दीपक पाटील, कऱ्हाड

१२) रमाकांत पारकर 'महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री - यशवंतराव चव्हाण' -'वार्ताहर दर्शन', पान २, रविवार ३/४/०६

१३) राम प्रधान 'शिल्पकार - महाराष्ट्राचे आणि शब्दांचेही' - लोकसत्ता, लोकरंग २०/११/२००५

१४) रामभाऊ जोशी 'विरंगुळा' - प्रकाशक यशोदा प्रकाशन, पुणे. पान क्र. १९९

१५) कृष्णन टी. व्ही. 'चव्हाण अँड द ट्रबल्ड डिकेड', १९७१, सोमय्या पब्लिकेशन प्रा. लि.

१६) यशवंतराव चव्हाण 'सह्याद्रीचे वारे', १९६२, प्रसिद्धी विभाग, महाराष्ट्र सरकार, मुंबई



# १०. श्री. मा. सा. कन्नमवार

## संयुक्त महाराष्ट्राचे दुसरे मुख्यमंत्री

(२०-११-६२ ते २४-११-६३)

यशवंतराव चव्हाण दिल्लीला गेल्यावर त्यांनी विदर्भातील कन्नमवार ह्यांची आपला वारस म्हणून निवड केली. कन्नमवारांना मुख्यमंत्रिपदावर चढविण्यात अर्थात राजकीय डाव होता. कन्नमवार हे विदर्भातले पहिले मुख्यमंत्री. शिवाय ते एका अर्थाने मागासलेल्या वर्गातील व सगळ्यात मुख्य कारण म्हणजे आपण दिल्लीला गेलो तरी महाराष्ट्र सरकारच्या राजकारणावर आपली पकड राहील अशी अटकळ. अधिकार स्वीकारल्यानंतर अर्थात कन्नमवारांनी आपण 'यशवंतरावांची दिंडी पुढे घेऊन जाणारा वारकरी' अशी घोषणा केली. परंतु दुर्दैवाने मुख्यमंत्रिपद त्यांना फार काळ लाभले नाही. कारण ते निधन पावले. ते २०/११/६२ ते २४/११/६३ ह्या एका वर्षाच्या ते काळात मुख्यमंत्री होते.

### जन्म व शिक्षण

कन्नमवारांचे घराणे खरे तर आंध्र प्रांतातले. ते विदर्भात केव्हा आले ह्याची विश्वसनीय माहिती उपलब्ध नाही. दादासाहेबांचा जन्म एका सामान्य घराण्यात १०/२/१९०० रोजी चंद्रपूर येथे झाला. दादासाहेबांचे शिक्षण फक्त दहावीपर्यंतच झाले होते. त्यांचे आयुष्य तसे खडतरच. तिकिट कलेक्टर, दुकानदार, लिपिक असे अनेक उद्योग करून त्यांना आपला निर्वाह करावा लागला.

### राष्ट्रीय चळवळीत भाग

त्यांनी १९२० च्या नागपूर काँग्रेसनंतर राष्ट्रीय चळवळीत सक्रिय भाग घेतला. १९२०ची असहकाराची चळवळ, मुळशी सत्याग्रह, १९२२ चा राष्ट्रीय सप्ताह ह्यांत ते सहभागी होते.

१९३० सालात ते चांदा तालुका कमिटीचे सेक्रेटरी होते. १९२९ साली त्यांनी गांधी

सेवा मंडळ स्थापन करून सार्वजनिक कार्यास सुरुवात केली. १९३० साली त्यांनी नोकरी सोडून काँग्रेसच्या कार्याला सर्वस्वी वाहून घेतले. १९३२ साली कायदेभंगात भाग घेतल्याबद्दल कारागृहवास भोगावा लागला.

१९३८ साली त्यांची नागपूर प्रदेशीय काँग्रेस कमिटीचे जनरल सेक्रेटरी म्हणून निवड झाली. त्यांनी १९४० चा वैय्यक्तिक सत्याग्रह व १९४२ च्या 'चले जाव' चळवळीत भाग घेतला होता व त्याकरता त्यांना कारावास भोगावा लागला. १९४७ साली त्यांनी नागपूरहून 'नवसंदेश' हे साप्ताहिक सुरू केले. १९४७ ला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते प्रांताध्यक्ष झाले. त्यावेळी ते राज्यसभेवर निवडून आले. ते घटना समितीचेही सदस्य होते.

ह्याच काळात त्यांनी अनेक प्रकारचे सार्वजनिक कार्य केले. १९३५ साली शिक्षण प्रसाराकरता 'लोकसेवक' मासिक काळ काही काळ चालविले.

### विधिमंडळात प्रवेश

त्यांचा विधिमंडळात प्रवेश जुन्या मध्यप्रदेशात झाला. ते १९५२ साली मूल सावली निर्वाचन क्षेत्रातून विधिमंडळात निवडून आले व मध्यप्रदेशात श्री. रवीशंकर शुक्लांच्या मंत्रिमंडळात स्वास्थ्यमंत्री म्हणून त्यांची निवड झाली (१९५२-५७). १९५६ साली कर्नाटक, महाराष्ट्रापासून अलग झाला व विदर्भातील मराठी भाषिक प्रदेश द्विभाषिक महाराष्ट्रात सामील करण्यात आला. १९५७ साली निवडणुका झाल्या. द्विभाषिक राज्याचे यशवंतराव मुख्यमंत्री झाले. त्या मंत्रिमंडळात त्यांना सार्वजनिक खाते देण्यात आले. साहजिकच मध्यप्रदेशातील मंत्रिमंडळ बरखास्त झाले. १९६० साली संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाला. त्यावेळी यशवंतराव मुख्यमंत्री झाले व दादासाहेब उपमुख्यमंत्री झाले. त्यावेळी दादासाहेबांकडे दळणवळण खाते होते.

### दादासाहेब मुख्यमंत्री

यशवंतराव दिल्लीस संरक्षणमंत्री म्हणून गेले आणि दादासाहेबांचा २० नोव्हेंबर १९६२ रोजी मुख्यमंत्री म्हणून शपथविधी झाला. लोकमान्यांच्या भाषेत एका अर्थाने ते तेल्यातांबोळ्यांचे मुख्यमंत्री होते. दादासाहेबांची मुख्यमंत्री म्हणून कारकीर्द जरी अल्पकाळ होती, तरी त्यांना जेवढे करता येण्याजोगे होते तेवढे त्यांनी केले. सहकार हा दादासाहेबांचा आवडता विषय. म्हणून त्याचवेळी यवतमाळ जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या मालकीची सहकारी सूत गिरणी झाली. त्यांनी दुष्काळी नगर जिल्ह्यात साखर कारखाने काढण्यास उत्तेजन दिले.

शेतकऱ्यांना कापसाचे योग्य भाव मिळावे म्हणून त्यांनी प्रयत्न केले. भूमिहिनांना जमिनी देण्याचे धोरण आखले. झोपडपट्ट्यांचे प्रश्न सोडविण्यात खूप रस घेतला. जंगल संपत्तीच्या विकासाला गती दिली. फौजी जवानांचे विस्थापन (displacement), सुवर्णनियंत्रणामुळे सोनारांची झालेली बेकारी, धरणग्रस्तांचे विस्थापन ह्यांमुळे बेकारीचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. पूरग्रस्तांना भरीव मदत देण्याचे धोरण दादासाहेबांनी आखले. वाशीच्या खाडीपुलाचे जनकत्व दादासाहेबांकडेच जाते. त्यांनी महाराष्ट्रात अनेक संरक्षण प्रकल्प स्थापन होण्यास उत्तेजन दिले. उदाहरणार्थ, ओझरचा मिग कारखाना व वरणगाव भंडारा व भद्रावती येथील संरक्षण साहित्य उत्पादन करणारे कारखाने.

दादासाहेबांना त्यांच्या कारकिर्दीत खूप मानसिक त्रास झाला. त्यांचा व आचार्य अत्रे यांचा वाद सुरू झाला. त्याच वेळी म्युनिसिपल कामगारांचा संप झाला. २० नोव्हेंबर १९६३ रोजी मंत्रिमंडळाचा पहिला वाढदिवस साजरा करून ते दौऱ्यावर गेले. २२ नोव्हेंबर रोजी (गुरुवारी) सकाळी दौऱ्यावरून परत आले. बरे वाटत नसल्यामुळे त्यांना हॉस्पिटलमध्ये हलविले गेले व २४/११/१९६३ रोजी त्यांचे निधन झाले.

### दादासाहेबांचे व्यक्तिमत्त्व

दादासाहेब हे गरीबीतून वर आलेले नेते. त्यांची राहणी साधी. अहंकाराचा अभाव. प्रत्येकाशी आस्थेवाईकपणे बोलण्याची शैली, निर्व्यसनी, मितभाषणी. एकूण ते एक सभ्य मुख्यमंत्री होते. त्यांचा लोकसंग्रह दांडगा होता. गरीबीतून वर आल्यामुळे गरीबांची कळकळ त्यांना होती. महात्मा गांधी यांच्या जीवनावर त्यांनी लिखाण केलेले आहे. तसेच ते कुशल पत्रकारही होते.

त्यांच्या मंत्रिमंडळाची कारकीर्द अल्प ठरली. त्यामुळे त्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळाला नाही. त्यांची यशवंतराव चव्हाणांवर दृढ निष्ठा होती व 'यशवंतरावांच्या आचारविचारांचे मी पालन करीन' असे ते सातत्याने म्हणत असत.

ooo

---

संदर्भग्रंथ


१) तु. नो. काटकर — 'कर्मवीर कन्नमवार', प्रकाशक श्रीमती गोपिकाबाई कन्नमवार, प्रथमावृत्ती फेब्रुवारी १९६४.

२) विजय तखडे — 'मा. सा. कन्नमवार' जा. २००२, अविष्कार प्रकाशन



# ११. श्री. वसंतराव नाईक

## संयुक्त महाराष्ट्राचे तिसरे मुख्यमंत्री

(५-१२-६३ ते २०-१-७५)

एका अर्थाने वसंतराव सुदैवी ठरले. ते महाराष्ट्राचे जवळजवळ अकरा वर्षे मुख्यमंत्री होते आणि ते सुद्धा त्यांनी स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेतलेला नसताना! ते काँग्रेसमध्ये आले तेच स्वातंत्र्योत्तर काळात. कन्नमवारांच्या नंतर नाईक हे विदर्भातले दुसरे मुख्यमंत्री.

### जन्म व शिक्षण

वसंतरावांचा जन्म एका सधन बंजारा कुटुंबात १ जुलै १९१३ रोजी बहुली ह्या गावी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण चार ठिकाणी झाले. ते नागपूरहून मॅट्रिक झाले. मॉरिस महाविद्यालयात त्यांनी बी.ए.ची पदवी मिळविली व १९४० साली ते एल.एल.बी. झाले. त्यानंतर त्यांनी १९४१ सालापासून वकिली करण्यास सुरुवात केली. समाज परिवर्तनाच्या दृष्टीने ह्यावेळी नाईकांनी टाकलेले पुरोगामी पाऊल म्हणजे श्रीमती वत्सला घाटे ह्या ब्राह्मण विदुषीशी प्रेमविवाह केला.

### सार्वजनिक कार्य

काँग्रेसच्या कार्यात प्रत्यक्ष पडण्याआधी वसंतरावांनी सार्वजनिक कार्यात हिरीरीने भाग घेतला होता. स्वतःच्या म्हणजे बंजारा समाजाला शिक्षण घेण्यास प्रवृत्त केले व दारुपासून परावृत्त करण्याचे प्रयत्न केले. शेतीच्या मक्त्यात होणारी फसवणूक थांबविण्याकरता त्यांनी 'खूट' मक्त्याच्या विरुद्ध चळवळ केली. ह्या सर्व कार्यामुळे वसंतराव बंजारा जातीचे श्रेष्ठ पुढारी मानले जाऊ लागले. त्यांनी बंजारा समाजाला काँग्रेसमध्ये आणण्याचा प्रयत्न केला. त्यातील लोकांना विज्ञाननिष्ठे विचाराकडे वळविले व त्याचबरोबर मतदानाबद्दल जागरूक केले.

वरील कार्यामुळे वसंतरावांच्या नेतृत्त्वगुणांना वाव मिळून अनेक संस्था त्यांच्याकडे मार्गदर्शनाकरता येऊ लागल्या.

त्यांनी बहुली गावात अनेक सुधारणा घडवून आणल्या. तेथे शिक्षणाची सोय केली. रस्तेबांधणीला चालना दिली. पुसद येथे महाविद्यालय सुरू केले. ते पुसद (१९४६) नगरपालिकेचे अध्यक्ष असताना त्यांनी त्या गावाचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न केला. ह्या सर्व कार्यामुळे लोक त्यांच्याकडे नेता म्हणून पाहू लागले.

**वसंतराव नाईक व कॉंग्रेस**

नाईकांनी १९४२ साली कॉंग्रेस सदस्यत्व स्वीकारले. १९५१ साली ते विदर्भ कॉंग्रेस कार्यकारिणीचे सदस्य झाले. विदर्भ महाराष्ट्रात विलीन झाल्यानंतर त्यांनी अखिल भारतीय कॉंग्रेस व महाराष्ट्र विभागीय कॉंग्रेस ह्यांत अनेक मानाची पदे भूषविली.

**वसंतरावांचा १९५२ साली राजकारणात प्रवेश**

वसंतराव जुन्या मध्यप्रदेशातील पुसद मतदार संघातून निवडून आले. जुन्या मध्यप्रदेशात श्री. रविशंकर शुक्ल ह्यांच्या मंत्रिमंडळात ते महसूल खात्याचे उपमंत्री झाले. १९५६ साली द्विभाषिक महाराष्ट्र झाला. नाईकांना मोरारजी देसाईंच्या मंत्रिमंडळात सहकार व कृषीमंत्री म्हणून स्थान मिळाले. त्यावेळी त्यांचा शेतीशी निगडित असलेल्या अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांशी संबंध आला. ह्याच काळात नद्यांना बांध घालून ओलिताच्या योजनेचा प्रसार त्यांनी केला. १९५७च्या द्विभाषिकात नाईक शेतकी मंत्री होते. त्यावेळी यशवंतरावजी मुख्यमंत्री होते.

शेती हा नाईक ह्यांचा जिव्हाळ्याचा विषय. शेतकऱ्याविषयी आस्था व ग्रामीण विकासाचा ध्यास ही नाईकांची वैशिष्ट्ये होती. महाराष्ट्रातील शेतकऱ्याकरता शेतीमंत्री म्हणून नाईक ह्यांनी अनेक योजना आखल्या.

१) विहीर खणण्याकरता तकावी कर्जात वाढ.

२) वीज असलेल्या ठिकाणी तकावी कर्जाची उपलब्धता.

३) तलावाच्या दुरुस्तीला उत्तेजन.

४) त्यामुळे जास्त जमीन ओलिताखाली आणण्याची योजना.

५) जमिनीची धूप कमी करण्याकरता बांध-बंदिस्त योजना.

६) शेतीत नव्या नव्या तंत्राचा वापर करण्यास उत्तेजन.

७) संकरित बी-बियाणे वापरण्याकरता उत्तेजन.

वरील योजना प्रमुख होत्या. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हे त्यांचे घोषवाक्य होते. शेती हा धंदा असून महाराष्ट्रातील शेतकरी कारखानदार झाला पाहिजे अशी त्यांची धारणा होती.

सहकारावर त्यांची दृढ श्रद्धा होती. म्हणून 'सहकारी शेती', सेवा सहकारी सोसायट्या, कृषि-औद्योगिक कारखाने, धान्य साठविण्यास गोदामे, सहकारी क्षेत्रात जिनिंग व प्रेसिंगचे कारखाने ह्यांचे ते पुरस्कर्ते होते. आरे कॉलनीचा विकास त्यांच्याच कारकिर्दीत झाला. त्यांचा भूदान चळवळीवर समाज-परिवर्तनाचे साधन व जमिनीची उत्पादनशक्ती वाढविण्याचा पाया म्हणून विश्वास होता. त्यांनी भूदान चळवळीत कृतिशील भाग घेतला होता.

नाईकांचा सत्तेच्या विकेंद्रीकरणावर भर होता. त्यामुळे ग्रामीण पुढारी निर्माण होतील व त्यांना राजकारणाचे शिक्षण मिळेल ह्या विचाराचे ते प्रवर्तक होते. १९६०-६१ साली नेमलेल्या लोकशाही विकेंद्रीकरण समितीचे ते अध्यक्ष होते. १९/८/६१रोजी महाराष्ट्रात पंचायत राज्याची स्थापना ही नाईकांच्या पुढाकारानेच झाली. वरील सर्व कार्याला आपल्या शेतकी मंत्रिपदाच्या कारकिर्दीतच त्यांनी चालना दिली.

**वसंतराव मुख्यमंत्री**

१९६२ साली वसंतराव नाईक पुसद मतदार संघातून निवडून आले. कन्नमवार मंत्रिमंडळात ते महसूलमंत्री होते. ५ डिसेंबर १९६३ रोजी कन्नमवार अकस्मात वारल्यामुळे वसंतराव मुख्यमंत्री झाले. अर्थात त्यांना शेतीत रस होता, म्हणून आपल्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात त्यांनी शेतीप्रधान उद्योगवाढीकरता प्रचार केला. पशुपालन, कुक्कुटपालन ह्या उद्योगांना त्यांनी उत्तेजन दिले. शेतकऱ्यांनी स्वसामर्थ्यावर अवलंबून राहावे म्हणून त्यांनी शेती विकास संघ स्थापण्यास प्रोत्साहन दिले. त्यांनी सहकारी शेतीचा प्रसार केला. कारण त्यामुळे शेतीच्या तुकडीकरणावर (विभाजनावर) आळा बसणार होता. सहकारी शेती, शेतीला लागणाऱ्या मालाचा पुरवठा करण्याकरता सेवा सहकारी सोसायट्या व इतर धंद्यांप्रमाणे शेती हा उद्योगधंदा झाला पाहिजे या विचाराचे ते प्रवर्तक होते.

मुख्यमंत्रिपदाच्या काळात त्यांनी दारुबंदीचा पुनर्विचार केला. लोकांना सैन्यात जाण्यास उत्तेजन दिले. मुख्यमंत्री झाल्यावर सामान्य प्रशासन, महसूल नियोजन व वनविभाग ही खाती त्यांनी आपल्याकडेच ठेवली. त्यांनी महाराष्ट्र राज्य अन्नधान्याच्या बाबतीत तुटीचे होते ते स्वयंपूर्ण करण्याचे आव्हान स्वीकारले. मोफत पाणी वाटपाचे नवीन धोरण, शेतीला जास्त

पाणी उपलब्ध होईल ह्या दृष्टीने आखले. शेतकऱ्यांना दिलासा देण्याकरता अन्नधान्याचे भाव आधी जाहीर करण्याचे धोरण आखले व भात, ज्वारी, गहू ह्या प्रमुख पिकांची खरेदीविक्री सहकारी पद्धतीने करण्याची योजना आखली. धान्याची उपलब्धता वाढविण्याकरता व त्याच्या किंमती नियंत्रित करण्याकरता व्यापाऱ्यांकडील साठे खुल्या बाजारात आणण्याकरता शासनाकडे अधिकार घेतले. ज्वारी खरेदीची मक्तेदारी १९६२ साली त्यांनी शासनाकडे घेतली व नव्या शासकीय खरेदीच्या धोरणाला सुरुवात झाली. त्यांच्या ह्या धोरणाची प्रमुख अंगे म्हणजे कृषिमालाच्या भावावर नियंत्रण, एकाधिकारी धान्यखरेदी, शेतीला निश्चित पाणीपुरवठा व शेतमालाला किफायतशीर किंमत ही होत. पाणीपुरवठ्याच्या अनेक योजनांचे त्यांनी उद्‌घाटन केले. दुबारी पीक, कृषि-उद्योगधंदे, नव्या प्रकारच्या भात व गहू बियाणांच्या योजना ह्यामुळे त्यानी महाराष्ट्रात शेतीच्या बाबतीत एका नव्या पर्वाला सुरुवात केली असे म्हणता येईल.

जमीन महसुलाच्या बाबतीत त्यांनी सर्वंकष एकसूत्रता आणली. भांडवलाचा अभाव ही शेतीमधील मुख्य अडचण हे लक्षात घेऊन बँकेकडून शेतकऱ्यांना पुरेसा व योग्य वेळी कर्जपुरवठा होईल ह्याकरता कार्य केले.

शिक्षणाबाबत वसंतरावांचे पाच सूत्री धोरण होते. गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्याकरता उत्तेजन देणे, त्यांच्याकरता इतर भागांत महाविद्यालये स्थापणे, उच्च शिक्षणाकरता शिष्यवृत्त्या देणे, त्यांच्याकरता वसतिगृहांत राखीव जागा ठेवणे आणि त्यांना पुस्तकांकरता अनुदान देणे हे त्यांच्या शैक्षणिक धोरणाचे पाच पैलू होते.

स्वातंत्र्यसैनिकांचा विचार करणारे नाईक हे पहिले मुख्यमंत्री म्हणण्यास हरकत नाही. त्यांना निवृत्तिवेतन, कसण्याकरता जमीन, मुलांच्या शिक्षणाकरता कर्ज व सवलती, त्यांच्या मुलांना नोकऱ्यांत प्राधान्य ह्या त्यांच्या हिताच्या योजना नाईकांनी आखल्या. सैनिकांकरताही ध्वजदिनाच्या दिवशी भरीव निधी गोळा करण्याचे प्रयत्न केले.

त्यांच्या कारकिर्दीत कृष्णा-गोदावरी नद्यांच्या पाण्याविषयी असलेला पाणीवाटपाचा तंटा आणि कर्नाटकाशी असलेला सीमावाद हे जटिल प्रश्न होते. ते प्रश्न सामोपचाराने सोडविले पाहिजेत अशी त्यांची भूमिका होती.

त्यांच्या कारकिर्दीतील भरीव कामगिरीची कल्पना त्यांच्या कार्यामुळे येईल. साखर कारखान्यांच्या वाढीला उत्तेजन, मराठी ही राज्यभाषा ही घोषणा, दारुबंदीचे नवे धोरण,

अन्नधान्याविषयी क्रियाशील धोरण, ज्वारी-कापूस बाजारात शेतकऱ्यांच्या हितसंरक्षणाकरता हॅरीस पद्धतीचा अवलंब, शेतीला उद्योगधंद्याचा दर्जा देण्याची कल्पना, शेतीप्रधान उद्योगांना चालना, नवी पिके व शेतीचे नवे तंत्र ह्यांना उत्तेजन व शेतीमालाची किंमत ठरविणे हे त्यांच्या शेतीविषयक धोरणाचे प्रमुख पैलू होत. जमिनीच्या सुधारणाही त्यांच्याच कारकिर्दीत झाल्या. तसेच त्यांनीच मेट्रिक सिस्टिम सुरू केली. पशुपालन, दुग्धव्यवसाय, वसंत बंधाऱ्याची कल्पना, फळबागांची वाढ ह्यांवर त्यांनी भर दिला.

भ्रष्टाचाराला आळा घालण्याकरता त्यांनी व्हिजिलन्स कमिशन नेमण्याचा निर्णय घेतला. निर्वासितांकरता नवीन गावाची स्थापना केली. अशा तऱ्हेने आपल्या ११ वर्षांच्या कारकिर्दीत वसंतराव नाईकांनी सर्व क्षेत्रांत सुधारणा करण्याकरता प्रयत्न केले. रोजगार हमी योजना ही त्यांच्याच कारकिर्दीत सुरू झाली.

नाईकांनी जवळजवळ ११ वर्षे मुख्यमंत्रिपद भूषविले. परंतु लोकमताबरोबरच काँग्रेसच्या चौकटीत अधिकार स्थानावरील दिवस श्रेष्ठींवर अवलंबून असतात. कारण १९७२ साली त्यांच्यावरील इंदिरा गांधींचे कृपाछत्र निघाले व मुख्यमंत्री म्हणून त्यांना राजीनामा द्यावा लागला. नंतर ते लोकसभेवर निवडून आले. परंतु प्रकृतिअस्वास्थ्यामुळे त्यांच्याकडून कोणतेच भरीव कार्य झाले नाही. १८ ऑगस्ट १९७९ रोजी वयाच्या ६६ व्या वर्षी त्यांचे हृदयविकाराने निधन झाले.

### वसंतराव नाईकांचे व्यक्तिमत्त्व

वसंतरावांच्या प्रदीर्घ कारकिर्दीचे रहस्य कशात आहे असा प्रश्न निर्माण होतो. नाईकांना छानछोकी पद्धतीने राहण्याचे बाळकडू होते. त्याचबरोबर ते उत्तम शिकारी होते. कोणाची मर्जी सांभाळून अधिकारपद मिळवता येईल व टिकवता येईल हे त्यांना शिकारी म्हणून पूर्ण माहिती होते, हे एक त्यांच्या दीर्घ कारकिर्दीचे रहस्य आहे. त्याचबरोबर श्री. धुळप यांनी म्हटल्याप्रमाणे ते प्रकांडपंडित नव्हते, संघटनेचे अध्वर्यू नव्हते, राजकारणधुरंधर नव्हते, पट्टीचे वक्तेही नव्हते. त्यांच्या यशाचे मर्म त्यांचे लोभस व्यक्तिमत्त्व, वागणुकीतील गोडवा, बोलण्यातली खानदानी ऋजुता ह्यांत आहे. शांतपणे काम करणे, मितभाषीपणा, विरोधकांबद्दल आदर, सभ्य व विनयशील व्यक्तिमत्त्व आणि सर्व प्रश्नांचा सखोल अभ्यास करण्याची सवय या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या महत्त्वाच्या पैलूंनी त्यांच्या यशात भर घातली. त्यांच्या यशाचे तिसरे कारण म्हणजे त्यांचा दांडगा लोकसंग्रह व तो टिकविण्याचे कौशल्य. कोणत्याही

परिस्थितीत राजकारणातील आदळाआपटीने विचलित न होता त्याला शांतपणे तोंड देण्याचे त्यांचे कसब कौतुक करण्यासारखेच होते. उमदे, सुशिक्षित, संपन्न, संयमी, कसदार, दर्जेदार व विलोभनीय व्यक्तिमत्त्व असलेले सभ्य गृहस्थ असे त्यांचे वर्णन केले जात असे. आशावादी, आनंदी, मानवतावादी दृष्टिकोन व मोकळा स्वभाव ही त्यांची वैशिष्ट्ये म्हटली जात असत. शेतीवर त्यांचे प्रेम होते. म्हणून त्यांच्या स्मृतिदर्शक मुंबई येथे वसंतराव नाईक कृषि संशोधन आणि विकास प्रतिष्ठान ही संस्था स्थापिली आहे. त्या संस्थेतर्फे दरवर्षी शेती शेतकरी व शेती उद्योग यांतील शेतकऱ्यांचा १ जुलैला सत्कार करतात.

०००

---


संदर्भग्रंथ :

- आवाहन - वसंतराव नाईक ह्यांच्या भाषणांचा संग्रह १९७१, प्रकाशक डी. एन. देसाई
- बैस रासबिहारी सिंग व देशपांडे दिनकर - महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव
- देसाई दिनेश - द प्लव अँड द पाईप १९९३, प्रकाशक डी. एन. देसाई, दादर ४०० ०२८. नित्सुरे म. गो. (संपादक)
- प्रकाशक डॉ. एन. एन. कैलास - श्री. व्ही. पी. नाईक गौरवग्रंथ
- पठाण यू. म. (संपादक) - वसंतराव नाईक षष्ट्यब्दीपूर्ती निमित्ताने - हिरवी क्षितिजे - १९७३
- माहिती व जनसंपर्क संचालनालय - महाराष्ट्र शासन - समृद्धीच्या वाटा - मुख्यमंत्री वसंतराव नाईक ह्यांच्या निवडक भाषणांचा संग्रह, जानेवारी १९७६
- रुद्रवार उत्तम - महाराष्ट्राचे शिल्पकार वसंतराव नाईक, जुलै २००४, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ



# १२. श्री. शंकरराव चव्हाण

## संयुक्त महाराष्ट्राचे चौथे मुख्यमंत्री

(२१-२-१९७६ ते १२-३-१९८६/
२०-६-१९८८)

मराठवाड्यातील श्री. शंकररावजी हे पहिले मुख्यमंत्री. त्यांच्या शिस्तशीर व्यक्तिमत्त्वामुळ त्यांना हेडमास्तर म्हणत असत. संतभूमीत - पैठणला जन्म झाल्यामुळे त्यांचे एक सात्विक व निष्कलंक चारित्र्य होते. संबंधित विषयाची त्यांची जाण अतिशय खोलवर असे.

### जन्म व शिक्षण

शंकररावांचा जन्म १४/७/१९२० रोजी पैठण येथे झाला. एका मध्यमवर्गीय सुशिक्षित शेतकऱ्याच्या घराण्यात झाला. घरातले वातावरण शिस्तशीर चारित्र्याची व सार्वजनिक कामांची हौस असलेले असे होते. ही परंपरा शंकररावांकडे आली.

शंकररावांचे सर्व शिक्षण हैद्राबाद येथे झाले. त्यांची शैक्षणिक कारकीर्द चांगली होती. १९४३ साली ते मद्रास विद्यापीठातून बी.ए. झाले. १९४५ साली ते उस्मानिया विद्यापीठातून पहिल्या श्रेणीत वकिलीची परीक्षा उत्तीर्ण झाले. अर्थात त्यांना शिक्षण स्वकष्टाने करावे लागले.

### राजकारणात भाग

शंकररावांनी निजामाच्या विरुद्ध लढ्यात भाग घेतला. सप्टेंबर १९४८ मध्ये निजामाने शरणागती पत्करली व हैद्राबाद निजामाच्या राजवटीतून मुक्त झाले. मुक्ती लढाईनंतर शंकररावजी नांदेडला स्थायिक होऊन तेथेच वकिली करू लागले. ते काँग्रेसच्या प्रवाहात सक्रिय कार्यकर्ते म्हणून सामील झाले. ते नांदेड काँग्रेसचे सरचिटणीस होते. नांदेडची मध्यवर्ती सहकारी बँक, नांदेड नगरपालिका ह्यांचे अध्यक्ष होते. त्यांनी नांदेडला धर्माबाद येथे महाविद्यालय स्थापन केले. पुण्यात पत्रकार नगरीशेजारी मुलींकरता होस्टेल बांधले. ते इंटकमध्येही कार्यशील होते.

**विधीमंडळातील कारकीर्द** (१९५६ साली)

कर्नाटक महाराष्ट्रातून वेगळे राज्य झाले. मराठवाडा व विदर्भ पश्चिम महाराष्ट्रात विलीन झाले. द्विभाषिक महाराष्ट्र राज्य स्थापन झाले.

१९५२ साली शंकरराव निवडणुकीत यशस्वी होऊ शकले नाहीत. परंतु ते कोणत्याही विधिमंडळाचे सदस्य नसताना यशवंतरावांनी त्यांना १९५६ साली महसूल खात्याचे उपमंत्री नेमले. अर्थात ही त्यांच्या कार्यक्षमतेला यशवंतरावांनी दिलेली पावती आहे. १९५७ साली विधिमंडळाची दुसरी सार्वत्रिक निवडणूक होऊन शंकरराव धर्माबाद मतदारसंघातून यशस्वी झाले. महसूल खात्याच्या कार्यात त्यांनी शिस्त आणली. त्याचबरोबर कुळकायद्याची सक्त अंमलबजावणी केली. अशा तऱ्हेने जमीनदारी व सरंजामदारी नष्ट करण्यास त्यांनी चालना दिली.

**संयुक्त महाराष्ट्र व कॅबिनेट मंत्री**

संयुक्त महाराष्ट्राच्या पहिल्या मंत्रिमंडळात ते १ मे १९६० पासून कॅबिनेट दर्जाचे पाटबंधारे व वीजमंत्री झाले. ह्या विषयातील त्यांच्या सखोल ज्ञानामुळे ते जवळजवळ १२ वर्षे हे खाते सांभाळत होते. ह्या खात्याबाबत त्यांचा चतु:सूत्री कार्यक्रम होता - सर्व महाराष्ट्रात सिंचनक्षमता वाढविणे, सर्व क्षेत्रांचा ह्याबाबत समतोल विकास करणे. पाण्याचे शास्त्रशुद्ध नियोजन करण्याकरता त्यांनी सिंचन आयोग स्थापन केला. भूमी व जल व्यवस्थापन संस्था स्थापन केली. अशा तऱ्हेने जलव्यवस्थापनाच्या कार्याला गती दिली. जुन्या तलावातील गाळ काढण्याचे धोरण आखले. पैठण धरण बांधण्याचे ठरविले.

यशवंतराव दिल्लीस संरक्षणमंत्री म्हणून गेल्यानंतर कन्नमवार मंत्रिमंडळात शंकरराव पाटबंधारे मंत्री होते. तसेच ते वसंतराव नाईकांच्या मंत्रिमंडळातही पाटबंधारे मंत्रीच होते. ह्याचवेळी म्हणजे ६ मार्च १९६४ रोजी त्यांनी महाराष्ट्र व मध्यप्रदेश ह्या दोन प्रांतात जलसिंचन व विद्युतनिर्मितीबाबत एक करार केला. हा करार 'वाज पेंचकर बदा तापी प्रकल्प करार' म्हणून ओळखला जातो. ह्यामुळे महाराष्ठ्र व मध्य प्रदेशातील शेतीच्या विकासाला गती मिळाली. ह्या करारामुळे बरीच जमीन पाटाखाली आली, विद्युतनिर्मिती वाढली व उद्योगधंद्यांच्या वाढील उत्तेजन मिळाले आणि कोरडवाहू शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना तर ह्याचा खूपच फायदा झाला.

त्यांनी कृषी विद्यापिठे स्थापण्यास चालना दिली. १९[illegible] साली दापोली येथे कृषी

विद्यापीठ स्थापन झाले. १९६९ साली त्यांनी अकोला येथे दुसरे कृषी विद्यापीठ स्थापले व त्यानंतर परभणी येथे कृषी विद्यापीठ स्थापन झाले. सावदा येथे केळी संशोधन केंद्र स्थापन केले. ह्याच काळात त्यांनी एस.टी.चे राष्ट्रीयीकरण केले आणि सर्व रस्त्यांचे सर्वेक्षण केले.

१९६७ साली शंकरराव पुन्हा नाईकांच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री झाले. त्यावेळीही त्यांच्याकडे पाटबंधारे खाते होते. ह्या काळात त्यांनी अनेक पाटबंधारे योजनांना गती दिली. शंकररावांनी अप्पर वर्धा धरणाचे कामही पूर्ण करविले. पैठणला त्यांनी बहुउद्देशीय असा महाराष्ट्रातील सर्वांत मोठ्या जायकवाडी प्रकल्पाचे काम पूर्ण करविले. ह्या प्रकल्पापाशी 'नाथसागर' हा मानवनिर्मित जलाशय आहे. ह्या धरणामुळे औरंगाबाद शहराचा पाण्याचा प्रश्न सुटला. येल दरी धरण आणि सिद्धेश्वर धरणाचे कामही शंकररावांच्याच कारकिर्दीत पूर्ण झाले.

पाणीवाटपाबाबत त्यांनी शास्त्रशुद्ध धोरण अवलंबले व उसाला बारामाही पाणी योजनेऐवजी आठ महिने पाणीवाटपाचे धोरण स्वीकारले.

ह्याच काळात एस.टी. कर्मचाऱ्यांकरता त्यांनी गृहनिर्माण वसाहती, वैद्यकीय सुविधा, भविष्य निर्वाह निधी, बोनस इ. योजना लागू केल्या. दापोडीशिवाय औरंगाबाद व नागपूर येथे कार्यशाळा स्थापल्या.

### शंकरराव मुख्यमंत्री

(२१-२१९७५ ते १८-५-१९७७ आणि १२-३-१९८६ ते २०-६-१९८८)

त्यांचा मुख्यमंत्रिपदाचा काळ दोन्हीही वेळा धरून चार वर्षांचा होता. ते मराठवाड्याचे पहिले मुख्यमंत्री. आपण मुख्यमंत्री होऊ अशी त्यांची अपेक्षा नव्हती. कारण त्यावेळी ते परदेश दौऱ्यावर होते. परंतु महाराष्ट्रातील गटबाजी व राजकारण आणि नाईकांवर श्रेष्ठींची खप्पा मर्जी झाल्यामुळे ते मुख्यमंत्री झाले. या पदावर असताना पाटबंधारे खाते त्यांना आपल्याकडेच ठेवले.

मुख्यमंत्री असताना जायकवाडी व विष्णुपुरी हे उपसा जलसिंचन प्रकल्प पूर्ण करविले. पूर्णा, पेनगंगा, अप्पर माजरा ह्या कालव्यांच्या कामांना ते मुख्यमंत्री असतानाच गती आली. गोदावरी नदीच्या पाणीवाटपाविषयी महाराष्ट्र, आंध्र, कर्नाटक व मध्यप्रदेश ह्यांच्यामधील वाद शंकरराव मुख्यमंत्री असतानाच मिटला (१९/१२/७५). महाराष्ट्राला शेतीकरता पाणीपुरवठा वाढला. ते ज्यावेळी दुसऱ्यांदा मुख्यमंत्री होते त्यावेळी विष्णुपुरी प्रकल्प पूर्ण होऊन नांदेड

शहराचा पाण्याचा प्रश्न सुटला.

त्यांनी विधिमंडळाच्या आमदारांच्या प्रशिक्षणाची सोय केली. मराठवाड्यातील शेतकऱ्यांना पत पुरवठा करण्याकरता त्यांनी ग्रामीण बँक सुरू केली. महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेतील दोष काढून टाकण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकिर्दीत त्यांनी केलेली कामगिरी पाहून त्यांच्या क्षमतेबद्दल आदर वाढतो -

१) त्यांच्या कारकिर्दीत कापूस एकाधिकार योजना सुरू झाली.

२) ग्रामीण भागातील बेघरांकरता घरबांधणी कार्यक्रम हाती घेतला.

३) शिक्षणात एकसूत्रता आणण्याकरता विदर्भ, मराठवाडा, कोकण ह्या भागांत ११वी व बारावीची कनिष्ठ महाविद्यालये सुरू केली.

४) शिक्षणसंस्थांचे नियंत्रण करण्याकरता १९७६ साली त्यांनी वटहुकूम काढला.

५) उर्दू अकॅडमी सुरू केली.

६) झोपडपट्टी निर्मूलन कार्यक्रम हाती घेतला.

७) इंदिरा आवास योजना कार्यान्वित केली.

८) कुटुंब-नियोजनाचे विधेयक पारित केले.

९) तीन गृहनिर्माण मंडळे निर्माण केली.

१०) अनावश्यक महामंडळांची संख्या कमी केली.

११) आदिवासी भागात आश्रमशाळा सुरू केल्या.

१२) सरकारी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्त्याकरता झालेला संप सामोपचाराने मिटवला.

१३) भिकारी हटाव मोहीम हाती घेऊन त्यांना धरणाच्या कामाला लावले व बाल-कामगारांच्या शिक्षणाची सोय स्टेट फार्मिंगच्या मळ्यावर करविली.

१४) भिकारी नियंत्रण कायदा पारित केला.

१५) जातीय सलोख्याची जबाबदारी त्यांनी अधिकाऱ्यांवर टाकली.

१६) कायद्याने आदिवासी लोकांच्या जमिनी परत केल्या.

१७) मराठवाडा रेल्वेचे रुंदीकरण केले.

१८) दुष्काळ व टंचाईग्रस्त लोकांना काम व अकुशल कामगारांना रोजगार द्याबाबत महाराष्ट्र हे पहिले राज्य.

१९) २३/२/१९७६ रोजी काळम्मावाडी धरणाच्या निर्मितीचा शुभारंभ शंकररावांच्या कारकिर्दीतच झाला.

रोजगार हमी योजनेला गती, दुष्काळ निवारणार्थ उपाययोजना, वीज निर्मितीमध्ये वाढ करण्याकरता प्रकल्प ही त्यांच्या कार्याच्या जमेची बाजू होय.

**केंद्रीय मंत्री**

१९/१०/१९८० रोजी ते नांदेड मतदार संघातून लोकसभेवर निवडून आले आणि इंदिरा गांधी यांच्या मंत्रिमंडळात शिक्षणमंत्री झाले. शिक्षण, संरक्षण, नियोजन, अर्थ, गृह अशी खाती त्यांनी केंद्रात हाताळली. २/३/१९८६ ते २६/६/१९८८ ह्या काळात ते पुन्हा मुख्यमंत्री होते. वसंतदादा पाटलांना राजीनामा द्यावा लागला व मुलीच्या मार्कांच्या गडबडीमुळे शिवाजीराव निलंगेकरांना राजीनामा द्यावा लागला होता. त्यामुळे शंकरराव मुख्यमंत्री झाले.

ह्या काळात त्यांनी शून्याधिष्ठित अर्थसंकल्पाची कल्पना प्रचलित केली. सरकारी खर्चात काटकसर करण्याचे आदेश दिले. मानखुर्द व बेलापूरच्या रेल्वेमार्गाला गती दिली. अंमली पदार्थांच्या सेवनावर बंदी घातली. नागपूर शहराचा विकास, गलिच्छ वस्त्यांचे स्वच्छीकरण, त्यांच्याकरता पाणीपुरवठा ह्याही गोष्टी त्याच्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकिर्दीतच झाल्या. त्यानी एम्प्रेस गिरणीचे राष्ट्रीयीकरण केले. राजीव गांधींच्या नव्या शिक्षण धोरणाची अंमलबजावणी करून नवोदय विद्यालयांची स्थापना केली. आठमाही पाणी वाटपाच्या धोरणाचीही अंमलबजावणी केली. तसेच लेंडी नदीवर महाराष्ट्र व आंध्र प्रदेश ह्यांचा संयुक्त प्रकल्प मार्गी लावला.

**पुन्हा गृहमंत्री**

ते १९८९ मध्ये केंद्रात पुन्हा गृहमंत्री झाले. केंद्रातील काँग्रेसची सत्ता गेल्यानंतर १९९७ पर्यंत ते राज्यसभेचे  सदस्य होते. सौ. कुसुमताईंच्या निधनानंतर (२७/२/२००३) त्यांना एकाकीपणा आला. त्यानंतर ते स्नानगृहात पडले व डॉक्टरांच्या प्रयत्नांना यश न आल्यामुळे दि. २६/२/२००४ रोजी त्यांचे निधन झाले. त्यावेळी सुशीलकुमारजी शिंदे मुख्यमंत्री होते. त्यांनी शंकररावांच्या स्मरणार्थ नांदेडच्या विष्णुपुरी प्रकल्पाला शंकरराव चव्हाण विष्णुपुरी प्रकल्प असे नाव देण्याची घोषणा केली.

**शंकररावांचे व्यक्तिमत्त्व**

शंकरराव हे एक कर्तृत्ववान आणि द्रष्टे मंत्री होते. त्यांना शिस्तशीर शासनाचा ध्यास होता. त्यांचा कामाचा उरक दांडगा होता. ते राज्यसभा, लोकसभा, विधान परिषद आणि

विधानसभा सदस्य होते. त्यांनी तीन पंतप्रधानांच्या (इंदिरा गांधी, राजीव गांधी आणि पी. व्ही. नरसिंहराव) मंत्रिमंडळात काम केले. केंद्रात अत्यंत महत्त्वाची खाती हाताळली. महाराष्ट्रात त्यांनी चार मुख्यमंत्र्यांच्या बरोबर काम केले (यशवंतराव चव्हाण, मारोतराव कन्नमवार, वसंतराव नाईक आणि शरद पवार). राज्यात पाटबंधारे खाते हे त्यांचे आवडते खाते. त्यांनी राज्य व केंद्र ह्या स्तरांवर विकासात्मक काम केले.

निजामाच्या विरुद्ध चळवळीत भाग घेतला. महाराष्ट्रातील अनेक जलप्रकल्प पूर्ण केले. मिझोराम, काश्मिर, पंजाब आणि बाबरी मशीद हे राष्ट्रीय स्तरावरील प्रश्न त्यांनी अतिशय कुशलतेने हाताळले. राज्यस्तरावरही त्यांनी विविध क्षेत्रांत कार्य केले. यशवंतराव चव्हाणांनंतर शंकररावच शासकीय यंत्रणेत जास्त काळ राहिले.

शंकरराव चव्हाण हे सात्त्विक व निष्कलंक चारित्र्याचे व्यक्तिमत्त्व. त्यांची राहणी व चारित्र्य इतके स्वच्छ होते की मुख्यमंत्रिपदाचा राजीनाम दिल्यानंतर त्यांना मुंबईत राहण्यास जागा नव्हती! त्यांनी स्वतःचा पंथ व पक्ष काढला नाही. त्यांनी लोककल्याणाकरता सत्ता वापरली. त्यांचा दृष्टिकोन निरपेक्ष होता. ते एक कार्यक्षम, कर्तृत्ववान, निःस्वार्थी व्यक्तिमत्त्व होते. ते मितभाषणी, मितआहारी होते. परंतु शंकररावांकडे सातत्याने माणसे जोडण्याचे कसब नव्हते. ते स्पष्टवक्ते होते व ध्येयवादी असल्यामुळे तत्त्वाबाबत तडजोड करीत नसत. एका दृष्टीने त्यांचे थोडेसे ह्याबाबतीत मोरारजींशी साम्य आहे. त्यामुळे त्यांना पक्षात व बाहेर अनेक शत्रू होते. परंतु ते महाराष्ट्रातील एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व होते व महाराष्ट्राला ते मंत्री म्हणून लाभले हा सुयोगच म्हणावा लागेल.

ooo


संदर्भग्रंथ :

१) सावंत सुरेश - 'महाराष्ट्राचे शिल्पकार शंकरराव चव्हाण', जुलै २००६, म.रा.सा.सं.मंडळ.

२) उत्तम सावंत - 'शंकररावांचे जीवनकार्य', २०००, निर्मल प्रकाशन, नांदेड.

३) वि. स. वाळिंबे - 'शंकरराव चव्हाण', १९७६, प्रकाशक इंडिया बुक कं., पुणे ३०.

४) चंद्रशेखर वाह - 'शंकरराव चव्हाण', प्रकाशक केशव भिकाजी ढवळे.
५) सौ. कुसुमताई शं. चव्हाण - 'कुसुमांजली, शब्दांकन सुरेश ठाकूर', १९९४, प्रकाशन जयंत हिरालाल शहा, पुणे ४११ ०३७.
६) श्री. गाडे - 'शंकरराव चव्हाण', जाने. २००२, अविष्कार प्रकाशन, पुणे
७) पंढरीनाथ पाटील - 'लोकानुवर्ती राज्यकर्ता शंकररावजी चव्हाण', प्रकाशक सौ. आशादेवी पंढरीनाथ पाटील, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
८) सुधीर भोंगळे - 'पाणीदार', २६/२/२००५, सुज्ञान प्रकाशन, पुणे ३८.
९) इंडिया टुडे - मार्च १९८६.

# १३. श्री. वसंतदादा पाटील



## संयुक्त महाराष्ट्राचे पाचवे मुख्यमंत्री

(१५-५-७७ ते ५-३-७८, ५-३-७८ ते १९-७-७८,
२-२-८३ ते ९-३-८५ आणि
१०-३-८५ ते १-६-८५)

श्री. वसंतदादा पाटील हे महाराष्ट्राचे पाचवे मुख्यमंत्री. परंतु चार वेळा मुख्यमंत्री होण्याचा विक्रम त्यांनी केला. १७/५/७७ ते ५/३/७८ (९ महिने), ५/३/७८ ते १९/७/७८ (४ महिने), २/२/८३ ते ९/३/८५ ( २ वर्षे) आणि १०/३/८५ ते १/६/८५ (२ महिने) असे ते २, ४, ९ महिने आणि २ वर्षे म्हणजे एकूण तीन वर्षे मुख्यमंत्रिपदावर होते. विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यांना प्रत्येकी दोन टर्म लागोपाठ होत्या. ह्याचाच अर्थ असा की त्यावेळच्या राजकीय परिस्थितीचा विचार करता दादा 'स्टँडबाय' मुख्यमंत्री होते.

अर्थात ही गोष्ट खरी की ते सर्वसामान्यांना जवळचे होते. त्यांना सर्व लोक दादा म्हणत असत. दादा हे आपल्यातून मुख्यमंत्री झाले आहेत अशी लोकांची भावना होती.

### जन्म व शिक्षण

गरीबीमुळे दादांचे शिक्षण फार झाले नव्हते. त्यांना इंग्रजीचे ज्ञान नव्हते. दादांचा जन्म १३/११/१९१७ रोजी पदमाळे येथे एका सामान्य शेतकऱ्याच्या कुटुंबात झाला. दादा लहानपणीच पोरके झाले, परंतु त्यांच्या आजीने त्यांचा समर्थपणे सांभाळ केला. दादांना शिक्षण अर्धवट अवस्थेत, म्हणजे सातव्या इयत्तेमध्येच सोडावे लागले. ह्याचे कारण त्यांची गरीबी हे होय.

### राजकीय चळवळीत भाग

वयाच्या १३ व्या वर्षापासून (१९३०) दादांना राजकीय चळवळीत स्वारस्य होते. सामाजिक कार्याची आवड होती. समाजजागृती व प्रबोधन करण्याची हौस होती. त्यांनी स्वतःच्या गावात ग्रामसुधारणा मंडळ स्थापले. सांगलीच्या बाजाराबाबत चळवळ केली. ह्याच

वेळी त्यांना 'दादा' हे नाव लोकांनी दिले.

१९३७ साली ते सांगली तालुका कॉंग्रेस कमिटीचे सरचिटणीस होते. त्यांनी गांधीजींच्या वैय्यक्तिक सत्याग्रहाच्या चळवळीत भाग घेतला होता (२३/३/१९४१). तसेच त्यांनी चले जाव चळवळीतही भाग घेतला होता (६/७/४२). ह्यावेळी पोलिसांच्या हातातून सुटण्याचा प्रयत्न करीत असताना त्यांच्या खांद्यावर गोळी लागली. २४ मार्च १९६६ मध्ये दादा महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष झाले.

**संसदीय राजकारणात प्रवेश**

स्वातंत्र्योत्तर काळात दादांनी होमगार्ड, सहकार, शिक्षण ह्या सामाजिक कार्याकडे लक्ष दिले. १९५२ साली ते सांगलीतून आमदार म्हणून निवडून आले. परंतु त्यांना मंत्रिमंडळात स्थान मिळाले नाही. ह्याच काळात त्यांनी श्री. धनंजयराव गाडगीळ ह्यांच्या मार्गदर्शनाखाली सहकारी कारखाना स्थापन केला.

दुसरी निवडणूक द्विभाषिक महाराष्ट्रात झाली (१९५७). दादा सांगली मतदार संघातून निवडून आले. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. दादा विधानसभेचे सदस्य म्हणून निवडून आले. ह्या काळात म्हणजे १९६२ ते १९६९मध्ये ते महाराष्ट्र कॉंग्रेस, राष्ट्रीय मिल मजदूर संघ आणि राज्य सहकारी बँक ह्यांचे अध्यक्ष होते. कन्नमवार ह्यांच्या निधनानंतर २४/३/६३ रोजी वसंतराव नाईक मुख्यमंत्री झाले. दादा त्यांच्या मंत्रिमंडळात पाटबंधारे मंत्री होते. परंतु शंकरराव चव्हाणांच्या मंत्रिमंडळात दादांना स्थान मिळाले नाही.

**दादा मुख्यमंत्री**

शंकरराव चव्हाणांना पक्षीय राजकारणामुळे जावे लागले. १९७७ साली दादांना मुख्यमंत्रिपद देण्यात आले. ते ९ महिने व नंतर ४ महिने टिकले. कारण पुरोगामी आघाडीने दादांचे मंत्रिमंडळ पाडले. श्री. अंतुले ह्यांच्या राजीनाम्यानंतर व बाबासाहेब भोसले ह्यांची मुख्यमंत्री म्हणून अल्पशा कारकिर्दीनंतर १९८३ साली दादा तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले. हे मंत्रिमंडळ दोन वर्षे टिकले. त्यावेळी दादा कोणत्याही सभागृहाचे सदस्य नव्हते. परंतु २३/७/१९८३ रोजी ते निवडून आले. १०/३/८५ ते १/६/८५ ह्या तीन महिन्यांच्या काळात ते मुख्यमंत्री झाले. ही मुख्यमंत्री होण्याची त्यांची चौथी खेप. नंतर श्रेष्ठींशी मतभेद झाल्यामुळे त्यांनी राजीनामा दिला. त्यानंतर शिवाजीराव पाटील निलंगेकर हे मुख्यमंत्री झाले

व २० नोव्हेंबर १९८५ रोजी दादांची राजस्थानचे राज्यपाल म्हणून नेमणूक झाली. परंतु त्या पदात त्यांना स्वारस्य नसल्यामुळे दि. १४/१०/८७ रोजी त्यांनी राजीनामा दिला. त्यांना सक्रिय राजकारणात भाग घेण्याची इच्छा होती, परंतु ती पूर्ण झाली नाही. कारण १/३/८९ रोजी दादांचे निधन झाले व महाराष्ट्र एक कर्तबगार व्यक्तिमत्त्वाला मुकला.

**दादांचे मुख्यमंत्रिपदाच्या काळातील कार्य**

आपल्या चार वेळ मुख्यमंत्रिपदाच्या काळात दादांनी अनेक क्षेत्रांत कार्य केले. शेतकऱ्यांकरता त्यांनी संघटना स्थापण्यास उत्तेजन दिले. धरणग्रस्त व शेतकरी ह्यांची कर्जे माफ केली. शेतकऱ्यांना कमी व्याजात कर्ज उपलब्ध होईल ह्या दृष्टीने प्रयत्न केला. फलोद्यान विकास मंडळाची स्थापना केली. कांद्यास आधारभूत किंमती ठरवल्या. जमीन सुधारणा क्षेत्रात अनेक योजना आखल्या. त्यापैकी अतिरिक्त जमिनीचे वाटप, प्रकल्पाकरता ताब्यात घेतलेल्या जमिनीकरता भरपाई, शेतीक्षेत्रातील ग्राहकांना विजेची सवलत ह्या प्रमुख होत. ग्रामीण भागाकरता रस्ते बांधणीचा कार्यक्रम हाती घेतला. कृषिपंढरी योजना सुरू केली. कृषिभूषण पुरस्कार सुरू केला. पिण्याच्या पाण्याची सोय केली. त्याकरता त्यांनी त्रिदल धोरण आखले. विहिरी व तलावय ताब्यात घेण्याचे अधिकार शासनाकडे घेतले. पाणी अडवा, पाणी जिरवा ह्या चळवळीचा सातत्याने पाठपुरावा केला. खेड्यांपाड्यात पिण्याच्या पाण्याची सोय केली.

रोजगाराकरता त्यांनी स्वयंरोजगाराला उत्तेजन दिले. स्वयंरोजगारासाठी बिनतारण आर्थिक साहाय्य देऊ केले. रोजगार हमी योजनेला सक्रिय साहाय्य व उत्तेजन दिले. सुशिक्षित बेकारांकरता भांडवलाची सोय करवून दिली.

दादांचा आवडता विषय म्हणजे सहकार चळवळ. ह्या चळवळीचे महाराष्ट्रातील अध्वर्यू दादाच. त्यांची विचारधारा अशी होती की सहकार ही संकल्पना फक्त शेती, कारखाने, कर्जपुरवठा इतपत मर्यादित न ठेवता तिचा विस्तार त्यांनी सर्व स्तरांवर केला. त्याकरता त्यांनी ग्राऊंडनट (शेंगदाणे) को. सोसायटी स्थापन केली. पेंड भुईमूग ह्या पिकावर प्रक्रियात्मक उद्योग उभे करणे हा अशा सोसायट्यांचा प्रमुख हेतू. त्याचप्रमाणे कोरडवाहू शेतकऱ्यांना सातत्याने उत्पन्न मिळवून देण्याकरता व त्यांना शेतीची अवजारे, यांत्रिक उपकरणे ह्या गोष्टी पुरविण्याकरता सहकारी तत्वावर कोऑपरेटिव्ह इंजिनियरींग सोसायटी स्थापन केली. शेतकरी सहकारी साखर कारखाना व सहकारी औद्योगिक वसाहत ही रोजगार निर्मितीच्या दृष्टीने दादांची मोठी कामगिरी आहे. दादांनी दुधाच्या सहकारी संस्था, कामगार

गृह सहकारी संस्था आणि त्यांच्या पतपेढ्या स्थापन करण्यास उत्तेजन दिले. खताकरता महाराष्ट्र कोऑपरेटिव्ह फर्टिलाइझर्स अँड केमिकल्स ही संस्था स्थापन केली. त्यांनी कोंबडी सहकारी संस्था व संकरित बियाणे केंद्र स्थापन करण्यात पुढाकार घेतला.

दादांनी सहकारी क्षेत्रात एक नवी कल्पना रुजविली ती म्हणजे 'भाग विकास निधी व शिक्षण निधी'. ह्याचा अर्थ साखर कारखान्याच्या भरभराटीचा वाटा सामान्य लोकांपर्यंत पोहोचला पाहिजे. ह्याकरता कारखान्यांचे ग्रामीण विकास केंद्र बनले पाहिजे. शिक्षणाकरता महाविद्यालये, औद्योगिक शिक्षणाकरता तांत्रिक शिक्षणसंस्था स्थापन केल्या पाहिजेत अशी दादांची विचारधारा होती. त्याचप्रमाणे शेती उत्पन्नावरील प्रक्रियेचे कारखाने, सूत गिरण्या, कागद निर्मिती ह्या संस्था सुरू करण्याकरता नेतृत्व दिले पाहिजे अशी त्यांची अपेक्षा होती. म्हणूनच त्यांनी २३/५/१९८३ रोजी विनाअनुदान तत्त्वावर अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतने सुरू केली.

शिक्षण क्षेत्रात त्यांचे कार्य म्हणजे अमरावती येथे विद्यापीठाची स्थापना व विनाअनुदान तत्त्वावर महाविद्यालये स्थापण्याची परवानगी देणे. या ऐतिहासिक निर्णयामुळे महाराष्ट्रात सर्व विषयांसाठी म्हणजे मेडिकल, इंजिनियरींग, व्यवस्थापन महाविद्यालये स्थापन होऊन अनेकांना उच्च शिक्षणाची संधी मिळाली. त्यामुळे शिक्षणमहर्षी असा एक नवा वर्ग शिक्षणक्षेत्रात निर्माण झाला. त्यामुळे अनेक अनिष्ट प्रकार प्रचारात आले ही गोष्ट वेगळी.

गरीबातील गरीबाला शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी दहावीपर्यंत मुलांना मोफत शिक्षणाची सोय केली. प्राथमिक शाळांतील मुलांना पौष्टिक आहार पुरविण्याचे धोरण आखले. तांत्रिक शिक्षण देण्याकरता सहकारी इंडस्ट्रियल स्कूल स्थापन केले. क्रीडा विकासाकरता कांदिवली येथे स्वतंत्र संस्थेची स्थापना केली. वाचनालयांना उत्तेजन देण्याकरता ग्रंथालयांना डॉ. आंबेडकर पुरस्कार देण्याची सोय केली. पुणे विद्यापीठात त्यांनी संत नामदेव अध्यासन स्थापन केले. कोल्हापूर येथे चित्रनगरी उभी केली. त्यांनी औद्योगिक शिक्षण संस्था स्थापण्यास उत्तेजन दिले. उद्योगकेंद्रे व आरोग्यकेंद्रांच्या स्थापनेला वेग आला तो दादांच्याच कारकिर्दीत. इंदिरा गांधी यांचा २० कलमी कार्यक्रम दादांनी प्रभावी रीतीने कार्यान्वित केला.

पुनर्वसन कार्यात दादांचे योगदान मोठे आहे. ह्यात पूरग्रस्त, दंगलग्रस्त, प्रकल्पग्रस्त ह्या सर्वांचा समावेश होतो. बेघरांना घराकरता अनुदान देण्याचे धोरण त्यांनी आखले.

झोपडपट्ट्यांच्या सुधारणेकडे लक्ष दिले. तसेच सेवानिवृत्ती वेतन व स्त्री-मजुरांच्या वेतनात वाढ केली. त्यांनी चतुर्थ व तृतीय श्रेणी कर्मचाऱ्यांचा संप (१४/१२/७७) शांततेने मिटवला. मागासवर्गीयांना कर्जवसुलीच्या सक्तीतून मुक्त केले.

आपल्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात त्यांनी स्वतंत्र पर्यावरण विभाग स्थापला. प्रत्येक जिल्ह्यात गोबर गॅस प्लँट उभारण्यास चालना दिली. मुलींच्याकरता प्रत्येक जिल्ह्यात वसतीगृहे स्थापिली. कृषी विद्यापीठात एका नाविन्यपूर्ण योजनेची सुरुवात केली, ती म्हणजे 'कमवा व शिका'.

दादांनी सहकारी क्षेत्रातील अनेक संस्थांचे अध्यक्षपद भूषविले. महाराष्ट्र स्टेट कोऑपरेटिव्ह बँका, जनरल इन्श्युरन्स सोसायटी, महाराष्ट्र सहकारी मार्केटिंग फेडरेशन (या संस्थेचे पुढे वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट असे नामांतर झाले), महाराष्ट्र रॉ मटेरियल ॲडव्हायजरी कमिटी (१९६०-६५) अशा अनेक संस्थांचे दादा प्रेरणास्थान होते. त्यांच्या नेतृत्त्वामुळे व कर्तबगारीमुळे ह्या संस्था वाढल्या व ग्रामीण भागात भरीव कार्यक्रम करू शकल्या. दुष्काळ व टंचाईग्रस्त परिस्थितीस तोंड देण्याकरता स्थापलेल्या सिंचन मंडळाचे दादा अध्यक्ष होते.

दादांचे इतर क्षेत्रांतील कार्य म्हणजे विवेकानंद शिक्षण संस्थेचे ते अध्यक्ष होते. मिरजेच्या मेडिकल कॉलेजचा विस्तार करण्यात दादांचे योगदान मोठे होते. दादांचे अनेक सन्मान झाले. २३/१/१९६७ रोजी त्यांना डॉ. राधाकृष्णन ह्यांच्या हस्ते पद्मभूषण हा किताब मिळाला. राहुरी कृषी विद्यापीठ व पुणे विद्यापीठ ह्यांनी त्यांना डॉक्टरेट ऑफ सायन्स अशी सन्मान्य पदवी दिली. ते काही काळ लोकसभेचे सदस्य होते व १९८० साली त्यांनी अखिल भारतीय काँग्रेस(आय)चे सरचिटणीसपदही भूषविले होते. ह्याच काळात त्यांनी किसान मेळावा भरविला होता.

**दादांचे व्यक्तिमत्त्व**

दादांसारख्या व्यक्तीला योग्य न्याय मिळाला नाही. ह्याचे कारण उच्च शिक्षणाचा अभाव हे असू शकेल. दादा हे सर्वसामान्यांचे पुढारी होते. ते त्यांचे दादा होते कारण सामान्यांना दादांपुढे आपली गाऱ्हाणी मोकळेपणाने मांडता येत होती. त्यांचा लोकसंग्रह दांडगा होता. लोकशाही व धर्मनिरपेक्षता ह्या त्यांच्या निष्ठा पक्क्या होत्या.

संघटना बांधणे आणि त्या टिकविणे ह्यात ते वाकबगार होते. त्यांचे शिक्षण जरी फार

झालेले नव्हते तरी शेतकऱ्यांच्या प्रश्नांची प्रगल्भ जाण त्यांना होती. त्यांचा व्यावहारिक अनुभव इतका प्रचंड होता की कोणतेही प्रश्न सोडविण्याची जाण त्यांना चटकन येत होती. शिक्षणाशिवाय बहुजन समाजाला भवितव्य नाही अशी त्यांची धारणा होती. सर्वसामान्य माणूस, शेतकरी, कामगार, भूमीहीन, दलितदुबळे हे विकास प्रक्रियेत केंद्रस्थानी असावेत असा त्यांचा अट्टाहास होता.

०००


संदर्भग्रंथ :

१) भालचंद्र धर्माधिकारी -'वसंतदादा', १९८६, विश्वकर्मा प्रकाशन, सातारा

२) सोपान गाडे -'वसंतदादा पाटील', जानेवारी २००२, अविष्कार प्रकाशन, पुणे

३) विश्वास मेहेंदळे -'गांधो ते पटेल', ३०/१२/२००२, सिगनेट प्रकाशन



# १४. श्री. शरद पवार

## संयुक्त महाराष्ट्राचे सहावे मुख्यमंत्री

(१८-७-७८ ते १७-२-८०, २६-६-८८ ते ४-३-९०,
४-३-९० ते २५-६-९१ आणि
६-३-९३ ते १४-३-९५)

श्री. शरदजी पवार हे महाराष्ट्राचे सहावे मुख्यमंत्री. त्यांचे वर्णन महाराष्ट्रातील 'स्ट्रॉंगमॅन' असे करतात. राष्ट्रीय पातळीवर मान्यता असलेले ते महाराष्ट्रातील एकमेव पुढारी आहेत असे मानले जाते. ते महाराष्ट्राचे चारदा मुख्यमंत्री होते.

### जन्म व शिक्षण

शरदजींचा जन्म बारामतीजवळील काटेवाडी ह्या गावात एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्यांना पाच कर्तबगार भाऊ. त्यातील श्री. आनंदराव आता हयात नाहीत. शिक्षणाशिवाय भवितव्य नाही हे सातत्याने त्यांच्या आईवडिलांनी त्यांच्यावर बिंबविले.

शरदजींचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण बारामतीस झाले. पुण्याच्या बृहन महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयातून ते बी. कॉम. झाले.

### युवकचळवळ व लग्न

विद्यार्थी दशेत त्यांनी युवकचळवळीत सक्रिय भाग घेतला. त्यांना यशवंतराव चव्हाणांचे आशीर्वाद व प्रोत्साहन होते. त्यांचे लग्न महाराष्ट्रातील प्रसिद्ध गोलंदाज श्री. सदू शिंदे यांच्या कन्येशी - प्रतिभाताईंशी झाले. एकच अपत्य असणार अशी शपथ त्याचवेळी त्यांनी घेतली होती.

### राजकारणात भाग

१९६७ सालापासून त्यांना कॉंग्रेस संघटनेत महत्त्वाचे स्थान मिळाले. ते महाराष्ट्र कॉंग्रेस कमिटीचे काही काळ अध्यक्ष होते. 'फोरम फॉर सोशालीस्ट ॲक्शन' ह्या संघटनेचे महाराष्ट्र शाखेचे ते अध्यक्ष होते.

**निवडणुकीत भाग**

१९६७ साली ते बारामती मतदार संघातून विधिमंडळात निवडून आले (१९६७-७२). पण मंत्रिमंडळात त्यांना १९७२ पर्यंत स्थान मिळाले नाही.

**१९७२ची निवडणूक व मंत्रिमंडळात स्थान**

१९७२ साली बारामती मतदार संघातून निवडून आल्यानंतर वसंतराव नाईकांच्या मंत्रिमंडळात त्यांना राज्यमंत्री म्हणून स्थान मिळाले. ह्यावेळी त्यांच्याकडे युवक क्रीडा, राज्यशिष्टाचार, प्रसिद्धी ही खाती होती. त्यांनी ह्यावेळी पैलवानांना शिष्यवृत्ती देण्यास सुरुवात केली व महाराष्ट्र गौरव ॲवार्ड देण्यास सुरुवात केली.

१९७४ साली ते शंकरराव चव्हाणांच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री झाले. शिक्षण, युवककल्याण व शेती ही खाती त्यांच्याकडे होती. शंकररावांच्या मंत्रिमंडळात पवारांच्याकडे शेती, पाणलोट, क्षेत्रविकास व खार जमिनीचा विकास ही खाती आली. त्यांनी शेतीचे उत्पादन वाढविण्याकरता उत्तेजन दिले. शेतीचे उत्पादन वाढविणाऱ्या शेतकऱ्यांना शेतकरी ॲवॉर्ड देण्याचा प्रघात पाडला.

**मुख्यमंत्री**

१९७८ साली ते पुरोगामी लोकशाही पक्षाचे मुख्यमंत्री झाले. एका अर्थाने हे पहिले बिगर काँग्रेसी मंत्रिमंडळ. कारण पवार त्यावेळी इंदिरा काँग्रेस ऐवजी रेड्डी काँग्रेसमध्ये होते. १९८० साली इंदिरा गांधींनी हे मंत्रिमंडळ बरखास्त केले. ह्यावेळी पवार १ वर्ष ६ महिने मुख्यमंत्री होते. ह्या काळात त्यांनी शेती कामगारांकरता किमान वेतनाचे धोरण आखले. लहान शेतकऱ्यांना कर्ज माफ करण्याचे ठरविले. शासकीय कर्मचाऱ्यांना केंद्र सरकारप्रमाणे महागाईभत्ता देण्यास सुरुवात केली.

**पवार विरोधी पक्ष नेते ते खासदार**

त्यांचे मंत्रिमंडळ बरखास्त झाल्यानंतर ते १९८१-८४ ह्या काळात विरोधी पक्ष नेते होते. ह्या काळात शेतमजुरांना किमान वेतन, शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव ह्याकरता त्यांनी 'शेतकरी दिंडी' काढली. १९८५-८६ ते खासदार म्हणून निवडून आले, परंतु त्या पदाचा त्यांनी राजीनामा दिला.

**पवारांचा काँग्रेस पक्षात दुसऱ्यांदा प्रवेश व ते दुसऱ्यांदा मुख्यमंत्री**

१९८५ साली पवार पुन्हा विधानसभेवर निवडून आले. १९८६ साली राजीव गांधी

यांनी त्यांना काँग्रेसमध्ये सामील करून घेतले आणि ते जून १९८८ ते फेब्रु-मार्च १९९० पर्यंत (ह्या १ वर्ष व ८ महिन्यांच्या काळात) ते दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले. ते ४/३/१९९० ते २५/६/१९९१ ह्या काळात तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले. ६ मार्च १९९३ ते १४ मार्च १९९५ ह्या काळात ते महाराष्ट्राचे चौथ्यांदा मुख्यमंत्री झाले. अर्थात मुख्यमंत्री म्हणून ते आपली कारकीर्द दोन वर्षही पुरी करू शकले नाहीत.

**संरक्षण मंत्री**

५ मार्च १९९३ पर्यंत ते पी. व्ही. नरसिंहरावांच्या मंत्रिमंडळात संरक्षणमंत्री होते. परंतु मुंबईच्या बॉंबस्फोटामुळे उद्‌भवलेली परिस्थिती हाताळण्याकरता त्यांना श्री. सुधाकर नाईक ह्यांच्या जागी मुख्यमंत्री म्हणून पाठवले. ते मुंबईत कायदा व सुव्यवस्था राखण्यात यशस्वी झाले.

**महाराष्ट्रात राजकीय बदल**

ह्याच काळात महाराष्ट्रात अनेक राजकीय बदल होऊन सेना-भाजपचे सरकार सत्तेवर आले. पवारांना केंद्रात वाजपेयी सरकारच्या काळात विरोधी पक्ष नेते म्हणून भूमिका स्वीकारावी लागली. पुढे सोनिया गांधी यांच्या परदेशी नागरिकत्वाच्या मुद्यावरून त्यांना काँग्रेसमधून निलंबित केले गेले व त्यानंतर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस स्थापन केली.

**पवारांचे मुख्यमंत्री म्हणून कार्य**

त्यांनी बहुविध क्षेत्रांत अनेक योजना आखल्या व यशस्वी केल्या.

शेती हा त्यांचा आवडता विषय. त्यांनी कमाल जमीन धारण कायद्यात शिथिलता आणली. ग्रामीण व कृषी विकासाकरता शेतकऱ्यांना वीजदरात सवलत दिली. विकासाला उत्तेजन देण्याकरता दुधाला जास्त किंमत दिली. दुधाकरता शीतकेंद्रे उघडली. सहकारी दुग्धसंस्था स्थापण्यास उत्तेजन देऊन धवलक्रांतीचा पाया घातला. दुभती जनावरे खरेदी करण्याकरता कर्ज व अनुदान ह्यांची सोय केली. दुधाच्या खपाकरता पहिली ते चौथी पर्यंत मुलांना मोफत दूध देण्याची व्यवस्था केली.

कृषिपूरक उद्योगांना त्यांनी उत्तेजन दिले. कुक्कुटपालन, फलोद्योग ह्यांनाही उत्तेजन दिले. फलोद्योगात काजू, चिकू, चिंच, सीताफळ, हापूस आंबे, विदर्भातील संत्री ह्यांचा अंतर्भाव होतो. कापूस व उसाकरता बेनार पॅटर्नचा प्रसार करून त्याकरता कर्ज, बियाणे, जंतुनाशके इ. सुविधा उपलब्ध करून दिल्या. ग्रामीण महाराष्ट्रातील बेकारी कमी करण्यासाठी

व फलोद्योगाकरता जवळजवळ दीड कोटी हेक्टर पडिक जमीन लागवडीखाली आणण्याची योजना आखली.

पाण्याकरता त्यांनी कृषिसिंचन आयोगाची स्थापना केली. कृष्णा खोऱ्यातील पाणी उचलण्याकरता भरीव तरतूद केली. पाटबंधारे विकासावर भर दिला. उदा., गोदावरी खोऱ्यातील मुकणेकाश्यपी पाटबंधाऱ्याचे काम. कृष्णा खोऱ्यात निरादेवघर, पिंपळगाव जागेश्वरी धरण व शिरसाई हा मोठा जलसिंचन प्रकल्पही शरद पवारांच्या पुढाकारामुळेच पूर्णत्वाला गेले. महाराष्ट्रातील ४० टक्के शेती पावसावर अवलंबून असल्यामुळे त्यांनी कोरडवाहू शेतीच्या विकासावर भर दिला.

कृषिविपणन क्षेत्रात शेतकऱ्यांना चांगला भाव मिळावा म्हणून जिल्हानिहाय सहकारी समित्या स्थापण्यास उत्तेजन दिले. एकाधिकारी गवत खरेदी योजना सुरू केली. धान्य शेतीवरील भार कमी करण्याकरता शेतकऱ्यांची रोजगार हमीशी सांगड बांधली. ठिबक सिंचन पद्धतीचा प्रसार केला. निसर्गाचा समतोल राखण्याकरता वनीकरणाचा प्रचार केला. पाणलोट क्षेत्र विकास योजनेद्वारे पाण्याचे नियोजन करण्याचे धोरण आखले. वृक्षसंगोपन व संरक्षण योजना आखल्या. महात्मा फुले विकास मंडळाची स्थापना केली.

कृषिनिष्ठ पुरस्कार सुरू करून कृषिउद्योगाला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. त्यांनी शेतकऱ्याकरता वीस कलमी कार्यक्रम आखला. त्यात शेतकऱ्यांना कर्जमाफी, अल्पभूधारकांना विहिरीसाठी अनुदान, शेतमजुरांच्या किमान वेतनात वाढ, शेती-पंपांना वीजपुरवठा इत्यादींचा अंतर्भाव होता. आय.आय.टी. बरोबर बायो टेक्नोलॉजीचे उद्योग कसे वाढतील ह्यावर त्यांनी भर दिला.

### औद्योगिक दृष्टिकोन व कार्य

उद्योगांना उत्तेजन देण्याकरता त्यांनी औद्योगिक वसाहतींची वाढ केली. वीज व विक्रीकरात सवलत दिली. आजारी उद्योग व अडचणीत असलेले परदेशी उद्योग ह्यांना त्यांनी मदत केली. उदा., कमानी. तसेच बंद गिरण्यांची विक्री करून त्या पैशातून गिरण्यांच्या आधुनिकीकरणाच्या योजना हाती घेतल्या. मागास भागांचा विकास करण्याकरता वैधानिक विकास महामंडळे स्थापन केली. साखर उद्योगाला वळण लावण्याचा प्रयत्न केला. पर्यटन विकास व मत्स्योद्योग विकासाला वाव देण्याकरता बंदराच्या विकासकार्यावर लक्ष दिले. कृषी-आधारित पूरक व्यवसायाला प्रोत्साहन दिले. त्यांनी आखलेल्या औद्योगिकरणाची वैशिष्ट्ये

पुढीलप्रमाणे होती -

१) निर्याती अभिमुखी

२) विकासावर भर

३) अनिवासी भारतीय व विदेशी उद्योजकांना गुंतवणूक करण्यास उत्तेजन

४) सहकारी उद्योगांना उत्तेजन

५) कृषिउद्योगाला उत्तेजन

६) रोजगार निर्मितीला प्राधान्य

७) उद्योजकतेचा पाया विस्तृत करणे

८) औद्योगिक विकास पर्यावरणाशी सुसंबद्ध करणे

त्यांनी 'गाव तेथे रस्ता' हे धोरण आखले. कारण त्यामुळे उद्योगांना विक्रीकेंद्रे उपलब्ध होतात. वीजटंचाई दूर करण्याकरता त्यांनी एन्रॉन, दाभोळ प्रकल्पाची चर्चा सुरू केली.

शिक्षणक्षेत्रालाही पवारांच्या कार्यक्रमात अग्रक्रम होता. राष्ट्रीय योजनेद्वारे निरक्षरतेचे पूर्ण उच्चाटन करणे, ग्रामीण भागात उच्च शिक्षण उपलब्ध व्हावे म्हणून महाविद्यालये, वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालये स्थापण्यास उत्तेजन दिले. शिक्षण, गृहनिर्माण संस्था स्थापण्यास उत्तेजन दिले. मुलींना मोफत शिक्षणाची व्यवस्था केली व त्यांच्याकरता पुण्यात एक वसतिगृह बांधले. आदिवासी मुलींना गणवेश व पुस्तके मोफत देण्याची व्यवस्था केली.

विद्यापीठाच्या क्षेत्रात त्यांनी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाला निधी उपलब्ध करून दिला. १९८० साली ते मुख्यमंत्री असताना मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्याचा निर्णय घेतला. स्वामी रामानंद तीर्थ ह्यांच्या स्मरणार्थ रामानंद तीर्थ विद्यापीठ स्थापन केले.

मराठी भाषेच्या विकासाकरता त्यांनी मराठी भाषा विकास उच्चाधिकार समिती स्थापन केली. डॉ. आंबेडकरांच्या साहित्याच्या प्रकाशनाचे कार्य हाती घेतले. नेहरू सेंटर उभारण्यात त्यांचे योगदान मोठे आहे. मराठी उद्योजकांना उत्तेजन देण्याकरता त्यांनी १९८९ साली जागतिक मराठी चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीची स्थापना करण्यास मदत केली.

**महिलाविषयक धोरण**

त्यांनी महिलांकरता शासकीय व निमशासकीय सेवेत ३० टक्के जागा राखीव राखण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला. राज्य महिला आयोगाची स्थापना केली. स्त्रियांना

संजय निराधार योजनेचा फायदा दिला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत आरक्षण देण्याचे धोरण ठरविले. छोटे उद्योगधंदे सुरू करण्याकरता महिलांना त्यांच्या स्वतंत्र वेगळ्या संस्था स्थापण्यास उत्तेजन दिले. हुंड्याच्या समस्येला आळा घालण्याकरता त्यांनी कायद्यात दुरुस्ती करून स्त्रियांना मालमत्तेत बरोबरीचे हक्क दिले.

पवारांना चित्रपट, नाटक, संगीत ह्यांत रस आहे व त्यामुळे ह्या क्षेत्राला त्यांनी सवलती दिल्या. त्यांनी मराठी चित्रपटांवरील कर कमी केला. शाहिरांना मानधन व रंगमंदिराला अनुदान जाहीर केले. नाटकाच्या तिकिटांचे दर कमी केले. निवृत्त कलाकारांना सेवानिवृत्ती वेतन देण्याचे धोरण आखले. 'घाशीराम कोतवाल' नाटकाला संरक्षण दिले.

कामगारांकरता त्यांनी ८.२५ % बोनस जाहीर केला. माथाडी कामगारांकरता पंधरा हजार घरे बांधण्यासाठी वाशीला १०७ एकर जमीन मंजूर केली.

याशिवाय त्यांच्या पूरक कार्यात पोलिसांचा गणवेष बदलणे (१९७२), त्यांना पोलिस इन्स्पेक्टपर्यंत बढती देण्याची पद्धत यांचा अंतर्भाव होतो. पुरोगामी (पुलोद) सरकारच्या काळात केंद्रीय दराने महागाई भत्ता देण्यास मान्यता दिली. त्यांनीच महाराष्ट्रांत मंडल आयोग आणला. लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यांतील भूकंपग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात पुढाकार घेतला.

काँग्रेसमधून निलंबित केल्यानंतर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस हा नवा पक्ष स्थापन केला. त्या पक्षाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत -

१) धर्मनिरपेक्षता

२) विधिमंडळात काँग्रेसशी युती

३) संसदीय व सहभागात्मक लोकशाहीवर आधारित घटनात्मक व्यवस्थापन

४) कायद्याचे राज्य

५) दुर्बल घटकांच्या सामर्थ्यात वाढ

६) विज्ञान व तंत्रज्ञान ह्यांना प्रोत्साहन

७) जागतिक स्तरावर भारताचे महत्त्व वाढविणे

८) आंतरराष्ट्रीय तंट्यांमध्ये राष्ट्रसंघाची मध्यस्थी.

**मध्यवर्ती सरकारात कृषिमंत्री**

भाजपचा २००४च्या निवडणुकीत पराभव झाला. काँग्रेसने सर्व विरोधी पक्षांना एकत्र

आणण्याचा प्रयत्न केला. त्यात राष्ट्रवादी काँग्रस होती व राष्ट्रवादीचे प्रतिनिधी म्हणून पवारांना डॉ. मनमोहनसिंगांच्या मंत्रिमंडळात कृषिमंत्री म्हणून स्थान मिळाले (UPA Government).

**इतर क्षेत्रातील पदे**

त्यांनी इतर क्षेत्रांतही महत्त्वाची पदे भूषविली. ते भारतीय क्रिकेट मंडळाचे अध्यक्ष आहेत. रयत शिक्षण संस्था, महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशन, महाराष्ट्र कुस्तीगिरांची परिषद, यशवंतराव प्रतिष्ठान ह्या संस्थांचे ते अध्यक्ष आहेत.

**शरदजींचे व्यक्तिमत्त्व**

शरद पवार ही महाराष्ट्रातील एकमेव व्यक्ती राष्ट्रीय मंचावर आहे हे निर्विवाद. त्यांचे कर्तृत्व पुरोगामी व गतिमान आहे. सामान्य जनांचे प्रश्न, शेती आणि राष्ट्रीय समस्यांची त्यांना जाण आहे. ते उत्तम, अभ्यासू प्रशासक तर आहेतच, परंतु ते मुत्सद्दी असून त्यांची राजकारणातील रंगपटात नेहमीच प्रमुख भूमिका असते. त्यांचा लोकसंग्रह मोठा असून त्यांची जनमानसावर पकड आहे. त्यांना माणसाची उत्तम पारख असून कोणाचा केव्हा उपयोग करायचा ह्याचीही त्यांना चांगली जाण आहे. सामाजिक न्यायावर त्यांची श्रद्धा आहे. बदलत्या आर्थिक, सामाजिक प्रवाहांची त्यांना सखोल जाण आहे व त्याबाबत त्यांचा अभ्यासही आहे.

त्यांचे व्यक्तिमत्त्व बहुरंगी आहे. ते उपमंत्री, कॅबिनेट मंत्री, मुख्यमंत्री, विरोधी पक्ष नेते आणि केंद्रीय मंत्रीही होते - आहेत. काँग्रेसच्या आत होते व आता बाहेर आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अवमूल्यन कधीच झालेले नाही. दुर्दैवाने त्यांच्या तोलाचा महाराष्ट्रात एकही पुढारी आज नाही. मारक्वीस (Marquis) च्या Whose who in the world ह्या ग्रंथात त्यांच्या चरित्राचा उल्लेख आहे.

ooo

संदर्भग्रंथ :

१) सोपान गाडे - 'शरद पवार', जानेवारी २००२, अविष्कार प्रकाशन.
२) देसाई दिनेश -'शरद पवार - द मॅन फॉर ऑल क्रायसेस', पारुट प्रकाशन, मुंबई.
३) अशोकराजा शिंदे -'राष्ट्रवादाचा मेरुपर्वत', १२/१२/९९, दामिनी पब्लिकेशन.
४) रविकिरण साने -'शरद पवार', स्वामी प्रकाशन, पुणे. प्रकाशक: मदन पाटील.
५) ह. मो. मराठे -'एक माणूस - एक दिवस १९९६, शरद पवार-नेता-राज्यकर्ता', पृष्ठे १५५-१७५

६) पुण्यनगरी - रविवार, २५/६/२००६ व ५/२/२००६

७) महाराष्ट्र टाईम्स - १२/१२/२००५

८) टाईम्स ऑफ इंडिया - १२/१०/२००५

९) लोकमत - १२/१२/२००५

१०) वार्ताहर - रविवार, ५/१२/२००६

११) रविंद्रनाथन पी.के. - 'द मेकिंग ऑफ मॉडर्न मराठा', १९९२, यु.बी.एस.पी.डी.



# १५. बॅ. ए. आर. अंतुले

## संयुक्त महाराष्ट्राचे सातवे मुख्यमंत्री

(९-६-१९८० ते १२-१-१९८२)

बॅ. अंतुले हे महाराष्ट्राचे सातवे मुख्यमंत्री. ते एक लढाऊ व बुद्धिमान व्यक्तिमत्त्व. परंतु भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे ते फार काळ मुख्यमंत्री म्हणून टिकले नाहीत. सध्या पंतप्रधान मनमोहन सिंग ह्यांनी जी मंत्रिमंडळाची रचना केली त्यात अंतुल्यांना अल्पसंख्यांक खात्याचे मंत्री म्हणून सामावून घेतले.

### जन्म व शिक्षण

अंतुले ह्यांचा जन्म रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यातील आंबोली खेडेगावात ९/२/१९२९ रोजी एका गरीब कुटुंबात झाला. ते १९४८ साली इस्माईल युसुफ महाविद्यालयातून अरेबिक हा विषय घेऊन पहिल्या वर्गात बी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाले. महाविद्यालयातील विद्यार्थीदशेपासून एक प्रभावी वक्ता म्हणून त्यांची प्रसिद्धी होती.

### राजकारणात प्रवेश

विद्यार्थीदशेपासून ते काँग्रेसचे धडाडीचे व क्रियाशील कार्यकर्ते होते. युवक चळवळीच्या सुरुवातीच्या काळात ते प्रभावी आणि क्रियाशील कार्यकर्ते होते. युवक चळवळीचा अभ्यास करण्याकरता इंग्लंडला गेलेल्या शिष्टमंडळात त्यांचा समावेश होता. राष्ट्रीय सभेचे एक मान्यवर नेते म्हणून कुलाबा जिल्ह्यात ते ओळखू जाऊ लागले व त्यांची क्रियाशीलता पाहून त्यांना कुलाबा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष केले. ते १९६३ साली महाराष्ट्र काँग्रेसचे सरचिटणीस झाले.

### विधिमंडळात प्रवेश व मंत्री

१९६२ ते १९६७ या काळात ते विधिमंडळाचे सदस्य म्हणून निवडून आले. वसंतराव नाईकांच्या मंत्रिमंडळात (१९६९) ते विधी, न्याय, शिक्षण, मत्स्य व्यवसाय, छोटी बंदरे ह्या

खात्यांचे मंत्री झाले. त्यावेळी त्यांनी छोट्या बंदरांच्या विकासाकरता खूप प्रयत्न केले. अत्यंत हुशार, कष्टाळू, अभ्यासू व कार्यक्षम मंत्री म्हणून त्यांनी कीर्ती मिळविली. १९७२ साली ते पुन्हा निवडून आले व नाईकांच्या मंत्रिमंडळात त्यांचा समावेश झाला. त्यावेळी ते विधी, न्याय, इमारती, दळणवळण, मत्स्यव्यवसाय ह्या खात्यांचे मंत्री होते. ह्या काळात त्यांनी सॉलिसिटरच्या पद्धतीला नवे वळण देऊन त्यांनाही न्यायालयात काम करण्याची मुभा दिली. त्याबाबत त्यांचे व बॅ. सिरवाई ह्यांचे मतभेद झाले.

**राज्यसभेचे सदस्य व काँग्रेसचे सरचिटणीस**

१९७६ साली बॅ. अंतुले राज्यसभेचे सदस्य म्हणून दिल्लीस गेले. त्यांचे संघटना कौशल्य व धाडसी कार्य लक्षात घेऊन काँग्रेसच्या पडत्या काळात इंदिरा गांधी यांनी त्यांना अखिल भारतीय काँग्रेसचे सरचिटणीस केले. त्यावेळी संजय गांधी युग सुरू झाले होते.

**मुख्यमंत्री**

शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील पुरोगामी आघाडीचे सरकार १७/२/१९८० रोजी कोसळले. त्यानंतर निवडणुका होऊन काँग्रेस पक्षाने अंतुल्यांची नेता म्हणून निवड केली. अर्थात फेब्रुवारी ते जून १९८० पर्यंत राष्ट्रपतींची राजवट होती. राज्यपाल श्री. सादिक अली ह्यांनी त्यांना मुख्यमंत्रिपदाची शपथ दिली. विधिमंडळाचे सदस्य ते नंतर झाले. कोकणातील पहिले मुख्यमंत्री म्हणून कोकणवासियांनी त्यांचे कौतुक केले. अंतुले मुख्यमंत्री होतील अशी कोणालाच अपेक्षा नव्हती, परंतु संजय गांधींची मर्जी व त्या पदाकरता लागणारी सर्वगुणसंपन्नता ह्यामुळे ते मुख्यमंत्रिपदापर्यंत पोहोचू शकले. परंतु हे मंत्रिपद त्यांना फार काळ लाभले नाही. त्यांची मुख्यमंत्रिपदाची कारकीर्द फक्त एका वर्षापुरतीच झाली. त्यावेळी श्री. अलियावर जंग राज्यपाल होते.

प्रतिभा प्रतिष्ठानवरील भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे त्यांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला (१२/१/१९८२). १९७२ साली अंतुल्यांना हृदयविकाराचा झटका आला होता. त्यामुळे त्यांच्या धडाडीच्या कार्यशैलीवर थोडेसे बंधन आले. त्याच बरोबर त्यांच्या विरोधकांनी सिद्धिविनायक मंदिराच्या देणग्या, सिमेंट भ्रष्टाचार, साखर कारखान्यांनी दिलेल्या देणग्या, त्यांनी केलेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्या, वडखळ प्रकरण, न्यायाधिशांना दिलेली घरे, प्रतिभा प्रतिष्ठानला मिळालेल्या देणग्या ही प्रकरणे बाहेर काढली व ती वादग्रस्त ठरली. ह्या आरोपांच्या खाली न्यायमूर्ती लेंटिन ह्यांनी अंतुल्यांना दोषी ठरविले व त्यांना

मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. अशा रीतीने एका कर्तबगार व आश्वासक भविष्य असलेल्या व्यक्तीच्या राजकीय कारकिर्दीचा तात्पुरता अस्त झाला. तात्पुरता म्हणायचे कारण असे की पुढे (२००६) साली ते केंद्रीय मंत्री झाले.

अधिकारपदावर असताना त्यांनी अनेक आश्वासने दिली होती. उदा., भवानी तलवार परत आणण्याचे. परंतु ही आश्वासने ते पुरी करू शकले नाहीत. कारण त्यांची राजकीय कारकीर्द लौकरच संपली. तरी सुद्धा अत्यंत थोड्या काळात त्यांनी बऱ्याच गोष्टी केल्या. उदा., थळ-वायशेत प्रकल्प महाराष्ट्रात ठेवला. शेतकऱ्यांचे कर्ज रद्द केले. रत्नागिरी व औरंगाबाद जिल्ह्यांचे विभाजन केले. कुलाबा जिल्ह्याचे नाव बदलून त्यांनी ते रायगड केले. अमरावती व नाशिक या दोन डिव्हिजनची निर्मिती केली. मानखुर्द-नवी मुंबई रेल्वे मार्गास मंजुरी दिली. दाभोळसह कोकणातील चार लघुबंदरांच्या विकासला मंजुरी दिली. त्यांनी काही शासकीय कार्यालये कोकणभुवनात हलविली व प्रिमिअर ऑटोमोबाईल संपात मध्यस्थी केली.

**अल्पसंख्यांकांचे मंत्री**

डॉ. मनमोहन सिंगांच्या मंत्रिमंडळात बॅ. अंतुल्यांचा समावेश होऊन खास अल्पसंख्यांक व्यवहार खाते निर्माण केले गेले आहे. वास्तविक विविध खात्यांतून व मंत्रालयाकडून अल्पंसंख्यांकांचे प्रश्न हाताळले जात असताना व अल्पसंख्यांक समाजासाठी 'राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग' ही घटनात्मक संस्था कार्यरत असताना हे नवे खाते निर्माण करण्याचे कारण समजत नाही. कदाचित त्याचे कारण अल्पसंख्यांकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे हे असू शकेल. पंतप्रधानांच्या आशीर्वादाने त्यांनी अल्पसंख्यांकांच्या कल्याणाकरता एक १५ कलमी कार्यक्रम जाहीर केला आहे. त्याची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत -

१) अल्पसंख्यांकांना शिक्षणाकरता अधिक संधी उपलब्ध करून देणे.

२) त्यांना आर्थिक कार्यक्रम आणि रोजगार ह्या समान संधी देणे.

३) अल्पसंख्यांकांचे राहणीमान सुधारणे.

४) जातीय दंगे व हिंसा यांचा प्रतिबंध करणे.

खाजगी क्षेत्रांतील उद्योग शासनाकडून अनेक सवलती घेतात. म्हणून त्या क्षेत्राने अल्पसंख्यांकांना नोकरी देण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे व त्याकरता आपल्या पैशातून तजवीज केली पाहिजे अशी घोषणा त्यांनी केली आहे. त्याचबरोबर अल्पसंख्यांकांची व्याख्या शास्त्रशुद्ध रीतीने केली पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे.

**व्यक्तित्त्व**

अंतुले ह्यांच्या विषयी अनेक मते आहेत. काहींच्या मते त्यांची शैली विचित्र आणि धसमुसळी होती. त्यांच्याविषयी माधव गडकरी ह्यांनी 'भ्रष्टाचार्य अंतुले' म्हणून एक पुस्तिका लिहिली आहे. काहींच्या मते ते एक अत्यंत धडाडीचे, भविष्याचे भान असलेले कार्यक्षम मंत्री होते. गडकऱ्यांनी देखील त्यांची ही धडाडी आणि चटकन् निर्णय घेण्याची क्षमता ह्याबद्दल त्यांची स्तुती केली आहे. ते महत्त्वाकांक्षी आहेत, परंतु तोंडाने फटकळ आहेत. त्यांच्या स्पष्टवक्तेपणामुळे त्यांनी अनेक शत्रू निर्माण केले आहेत.

अंतुले गरिबीतून वर आलेले आहेत. गरिबांच्या प्रश्नांची त्यांना जाण आहे. त्यांच्यात काही विशेष गुण आहेत. त्यांची निर्णयक्षमता, निधमी दृष्टिकोन, कामाचा उरक, प्रखर बुद्धिमत्ता, उत्तम वक्तृत्त्व, व्यासंग, विद्वत्ता व हुशारी ह्या त्यांच्या जमेच्या बाजू आहेत. त्यांची विद्वत्तापूर्ण ग्रंथसंपदा आहे, उदा., Appointment of Chief Justice, Parliamentary Privileges, Mahajan Report ही विद्वतमान्य आहेत. त्यांना स्वास्थ्य मिळाले असते तर त्यांच्याकडून अजूनही उत्तम ग्रंथसंपदा निर्माण झाली असती. एक कर्तबगार व्यक्ती असेच त्यांचे वर्णन करावे लागेल.

ooo

---

टीप : १९४८ साली बॅ. अंतुले इस्माईल युसुफ महाविद्यालयात विद्यार्थी होते. त्यावेळी मी तेथे अर्थशास्त्राचा प्राध्यापक होतो - रायरीकर.

संदर्भग्रंथ :


१) सोपान गाडे -'अंतुले', २००२, अविष्कार प्रकाशन, पुणे.

२) माधव गडकरी -'भ्रष्टाचार्य अंतुले', प्रकाशिक सौ. कुलकर्णी-गडकरी, कोहिनूर प्रकाशन, विलेपार्ले, मुंबई ५७.

३) विश्वास मेहेंदळे -'मला भेटलेली माणसे', १९९५, सिग्नेट पब्लिकेशन.

४) पुण्यनगरी रविवार, ५/२/२००५.

५) लोकराज्य माहिती व जनसंपर्क महासंचालनालय.



# १६. श्री. बाबासाहेब भोसले

## संयुक्त महाराष्ट्राचे आठवे मुख्यमंत्री

( २१-१-१९८२ ते १-२-१९८३ )

### जन्म व शिक्षण

श्री. बाबासाहेबांचा जन्म १५/१/१९२१ रोजी सातारा जिल्ह्यातील तारळे ह्या गावी झाला. त्यांचे वडील असिस्टंट एज्युकेशनल इन्स्पेक्टर होते. त्यांचे शिक्षण विटे व सातारा ह्या ठिकाणच्या शाळांत झाले. महाविद्यालयीन शिक्षण राजाराम महाविद्यालयात झाले. इंटरनंतर त्यांनी एल.एल.बी. केले व १९५१ ला त्यांनी बार लॉ ॲक्टला पूर्ण केले. त्यानंतर जवळजवळ दहा वर्षे साताऱ्यास वकिली केली. नंतर ते महाराष्ट्र महसूल न्यायमंडळाचे सदस्य झाले. सातारा मतदार संघातून लोकसभेचे तिकिट मागू नये म्हणून त्यांना महसूल न्यायमंडळाचे सदस्य नेमले होते असे म्हणतात. त्यांना महसूल न्यायमंडळाचे अध्यक्ष नेमले नाही म्हणून त्यांनी महसूल न्यायमंडळाचा राजीनामा दिला व हायकोर्टाच्या अपेलिएट साईडला प्रॅक्टीस करण्यास सुरुवात केली. महसूल न्यायमंडळाचा सदस्य असताना कुळ वहिवाटीच्या कायद्याखाली विविध कायद्यांखाली त्यांनी शेकडो प्रकरणे निकालात काढली व शेतीसुधार कायद्यांची अंमलबजावणी करण्यास मोठी चालना दिली.

### राजकारणात प्रवेश

विद्यार्थी दशेत असतानाच १९३९ साली वैय्यक्तिक सत्याग्रहात त्यांनी भाग घेतला होता. ते

---

टीप : लाला लजपतराय महाविद्यालयाचे प्राचार्य असताना मी बाबासाहेबांना भेटलो होतो. परंतु त्यांचा-माझा परिचय नाही. रेव्हेन्यू ट्रायब्युनल सदस्य असताना ते महाविद्यालयाजवळील शासकीय इमारतीत राहत होते. ते हाजीअलीजवळील पानपट्टीवाल्याकडून पान खरेदी करत असत. त्यांचा विनोदी स्वभाव आणि त्यांचे विनोद ह्याबाबत मी हाजीअलीला असताना अनेक गोष्टी ऐकल्या होत्या.

- डॉ. रायरीकर

कोल्हापूर विद्यार्थी काँग्रेसचे अध्यक्ष होते. खटाव तालुका काँग्रेसचे अध्यक्ष होते. सातारा जिल्हा काँग्रेस कमिटीचे खजिनदार होते आणि महाराष्ट्र इंदिरा काँग्रेसचे चिटणीस होते.

### विधिमंडळात प्रवेश

१९८० साली नेहरूनगर मतदारसंघातून ते विधानसभेत निवडून आले. त्यावेळी त्यांच्याकडे विधी, न्याय, कामगार व वाहतूक ही खाती होती. काही काळ ते कायदामंत्री होते. कायदेमंत्री असताना त्यांना अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागले. त्यांनी पंढरपूर विठोबाचे दर्शन वारकऱ्यांना सुलभ केले व बडवेगिरी बंद केली. श्री सिद्धीविनायक हा एक वादग्रस्त विषय होता. बाबासाहेबांनी त्याचा ट्रस्ट केला. अर्थात विश्वस्तांची निवड वादग्रस्तच होती.

ह्या काळात त्यांना प्रिमिअर ऑटोमोबाईल आणि एस.टी. कामगारांच्या संपाला तोंड द्यावे लागले. त्यांनी ते संप मिटविले. कोर्टातील 'मायलॉर्ड' म्हणण्याच्या प्रथेऐवजी 'सर'म्हणण्याची प्रथा पाडली. ज्युडिशियल ऑफिसरांकरता त्यांनी ट्रेनिंग इन्स्टिट्यूट स्थापन केली. त्याबरोबर महाराष्ट्र ॲडव्होकेट वेल्फेअर फंड ॲक्ट (१९८१) केला.

### मुख्यमंत्री

श्री. बाबासाहेब हे संयुक्त महाराष्ट्राचे ८ वे मुख्यमंत्री. ते ह्या पदावर फक्त एकच वर्ष होते (२२-१-१९८२ ते १-२-१९८३).अंतुल्यांना राजीनामा द्यावा लागला व कोणातीही अपेक्षा नसताना ते धूमकेतूसारखे ह्या पदावर येऊन पोहोचले. अर्थात सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला.

मुख्यमंत्री असताना त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या बंगल्याचे नाव 'वर्षा' ऐवजी रायगड ठेवले. विशेष म्हणजे नाटक व संगीत ह्यांची आवड असल्यामुळे त्यांनी सांस्कृतिक खाते आपल्याकडेच ठेवले. ह्याच वेळी ज्या हाजीअली शासकीय वसतिस्थानात ते राहत होते, त्या ठिकाणी एक हॉल बांधून दिला व त्या ठिकाणी कल्याण समितीची स्थापना केली.

एस.टी.बोर्डाची पुनर्रचना करून त्यात त्यांनी महिलेला स्थान दिले. अल्पसंख्यांकांच्या समाजातील लोकांच्या महामंडळावर नेमणुका करण्यात पुढाकार घेतला. दहावीपर्यंत मुलींना मोफत शिक्षण योजना सुरू केली. त्यांच्या काळात नव्या विधानभवनाच्या उत्तरेस महात्मा फुले यांचा पुतळा उभारला गेला. त्यांनी सावरकर स्मारकाला भरपूर निधी उपलब्ध करून दिला. अमरावती विद्यापीठाची मागणी मान्य केली. कोल्हापूर येथे मराठी चित्रसृष्टी निर्मिती, औरंगाबाद येथे न्यायालयाच्या खंडपीठाची सुरुवात व त्याच्या इमारतीची पायाभरणी ही त्यांची इतर कार्ये होत. गडचिरोली जिल्ह्याची स्थापना करून पहिल्या आदिवासी जिल्ह्याची

निर्मिती केली. त्यांनी कल्याण शिवजयंतीची मिरवणूक पुन्हा सुरू केली. स्वातंत्र्यसैनिकांना निवृत्तीवेतनाची सोय केली. विशेष कौतुकाची गोष्ट म्हणजे त्यांनी मंत्र्यांचे पगार कमी करून घेतले! लोकसेवा आयोगाची नेमणूक करताना गुण व लायकी ह्याला प्राधान्य दिले साहित्यिक कै. नरहर कुरुंदकरांच्या कुटुंबास आर्थिक सहाय्य दिले.

ट्रायब्युनलचे सदस्य असताना ते ज्या ठिकाणी राहत होते त्या ठिकाणी जसा त्यांनी हॉल बांधून दिला, त्याचप्रमाणे नेहरूनगर मतदार संघातून ते निवडून आले. त्या विभागाकरता भुयारी रस्ता करविला. त्यामुळे नेहरूनगर व चुनाभट्टी जोडले गेले. कुर्ल्यास एस.टी. डेपो आणला. त्या ठिकाणी स्वतंत्र रेशनिंग ऑफिसची सोय केली. स्वतंत्र पोलिस स्टेशन उभे केले. ट्रॅफिक सिग्नल बांधून घेतला.

मुख्यमंत्रिपदाच्या काळात बाबासाहेबांना अनेक प्रसंगांना तोंड द्यावे लागले. त्यांच्या कारकिर्दीत संपांची लाटच आली होती. पोलिसांचा संप, कापड गिरण्यांचा संप, गट सचिवांचा संप, विद्युत मंडळाच्या कनिष्ठ अभियंत्रकांची संपाची धमकी इ. पोलिस खात्याच्या

संपाची पार्श्वभूमी अशी होती - शरद पवारांनी पोलिसांचा युनियन स्थापण्याचा अधिकार आधीच मान्य केलेला होता. अंतुल्यांचेही पोलिसांना पाठबळ होते व ह्याचा परिपाक म्हणजे १५/८/८२ रोजी पोलिसांची बंडाळी व संप झाला. बाबासाहेबांनी पोलिसांची कामगार संघटना बरखास्त करण्याचा धाडसी निर्णय घेतला. त्यांना संप यशस्वी रीतीने हाताळता येणार नाही अशी लोकांची अटकळ होती. परंतु त्यांनी वरील गोष्टी निकालात काढल्या. त्याचबरोबर पोलिस शासनास त्यांनी स्वतःची सुंदर वास्तु उपलब्ध करून दिली. त्यांनी पोलिस खात्याच्या कारभारात कधीच हस्तक्षेप केला नाही.

हा काळ दुष्काळाचा होता. त्याला तोंड देण्याकरता त्यांनी एक कार्यक्रम तयार केला. त्यांनी पिण्याच्या पाण्याचे व्यवस्थापन केले. जनावरांच्या शिबिरांची व्यवस्था केली. मच्छीमार लोकांकरता विमायोजना लागू केली. असंघटित व असंरक्षित कामगारांकरता स्वयंरोजगाराला उत्तेजन दिले. त्याशिवाय 'श्रमजीवी कुटुंबाश्रय योजना' नावाची अपघातानंतर आर्थिक संरक्षण व मदत देण्याची योजना तयार केली. त्यांनी निवृत्तीवेतन रु. ५० वरून रु. १५० पर्यंत वाढविले. किमान कुटुंबवेतन १४० रुपये केले. सरकारी नोकर परलोकवासी झाला तर त्याच्या कुटुंबाला हे वेतन दिले जात असे.

बालमोहन शाळेत बाबासाहेब गेले असताना त्यांच्यावर गोळी झाडली गेली. कदाचित

त्यांनी जुगार, वेश्याव्यवसाय, दारु व अंडरवर्ल्ड ह्यांवर नियंत्रण आणण्याचे जे प्रयत्न केले त्यांना हे प्रत्युत्तर असेल!

**लिहिण्याची हौस**

बाबासाहेबांना लिहिण्याची हौस होती. त्यांनी काँग्रेसचा इतिहास लिहिला. 'दैनिक नेता' ह्या नावाने वर्तमानपत्र चालविले. 'कोर्टाची पायरी' ह्या नावाचे पुस्तकही लिहिले (१९६०).

**बाबासाहेबांचे व्यक्तिमत्त्व**

बाबासाहेब हे विनोदी व्यक्तिमत्त्व होते. शब्दभांडारावर त्यांचे वर्चस्व होते. त्यामुळे कोट्या करण्यात त्यांचा हातखंडा होता. त्यांचे चारित्र्य व कारभार स्वच्छ होता. जरी त्यांच्यावर एक किटाळ आले तरी त्यातून ते निर्दोष सुटले. त्यांच्यावर घाण आरोप-प्रत्यारोप झाले नाहीत. त्यांनी हलक्या दर्जाचे राजकारण कधीच केले नाही. परंतु यशवंतराव चव्हाणांशी त्यांची नाळ कधीच जुळली नाही. ते कुत्सितपणे म्हणत असत की यशवंतरावांची राजकारणात पिछेहाट झाली व माझी भरभराट झाली ! कारण ते मुख्यमंत्री झाले.

लोक म्हणतात की त्यांना पैसे मिळवून देता आले नाही म्हणून त्यांची गच्छंती झाली. त्यांना पंजाब व काश्मिरचे राज्यपालपद देऊ केले असे ऐकिवात होते. परंतु ते त्यांनी नाकारले.

ooo

---

संदर्भग्रंथ :

१) श्री. सोपान गाडे -'श्री. बाबासाहेब भोसले',२००२, अविष्कार प्रकाशन, पुणे

२) बाबासाहेब भोसले अमृत महोत्सव सत्कार समिती, महर्षी कर्वे रोड, मुंबई २९.
-'बॅ. बाबासाहेब भोसले - एक नायगारा'

३) डॉ. विश्वास मेहेंदळे -'मला भेटलेली माणसे', १९९५, सिग्नेट पब्लिकेशन.



# १७. श्री. शिवाजीराव पाटील निलंगेकर

## संयुक्त महाराष्ट्राचे नववे मुख्यमंत्री

(३-६-१९८५ ते ९-३-१९८६)

श्री. शिवाजीराव पाटील निलंगेकर अल्पकाळच मुख्यमंत्री होते.

### जन्म व शिक्षण

शिवाजीरावांचा जन्म ९/२/१९३१ रोजी झाला. त्यांचे शिक्षण एम.ए., एल.एल.बी. पर्यंत झालेले आहे. त्यांनी १९८६ साली पी.एच.डी. पदवी मिळविली आणि त्यांच्या प्रबंधाचा विषय होता 'मराठवाड्यातील राजकीय जागृती, चळवळ आणि बदल'. हा प्रबंध त्यांनी मुख्यमंत्री झाल्यांनंतर पूर्ण केला व पी.एच.डी. मिळविली.

### स्वातंत्र्यचळवळीतील सहभाग

त्यांनी हैद्राबाद मुक्तिसंग्राम व त्याचबरोबर स्वातंत्र्य चळवळीतही भाग घेतला होता. १७/९/१९४८ ह्या दिवशी हैद्राबाद संस्थान भारतात विलीन झाले व हैद्राबाद येथील मराठी भाषिक भाग संयुक्त महाराष्ट्रात विलीन झाला. १९९०-९१ मध्ये ते महाराष्ट्र कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष होते. त्याचप्रमाणे १९६२-६८ अशा सहा वर्षांच्या काळात ते उस्मानाबाद जिल्हा कॉंग्रेस कमिटीचेही अध्यक्ष होते.

### निवडणुकीत भाग

त्यांनी १९५७ पासून विधिमंडळाच्या निवडणुकीत भाग घेतला, परंतु त्यावेळी ते पराभूत झाले. त्याच वेळी ते उस्मानाबाद जिल्ह्याच्या लोकबोर्डात क्रियाशील होते. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर (१-५-१९६०) ते निलंगा मतदार संघातून आमदार म्हणून निवडून आले. त्यानंतर ते पुन्हा निवडून आले. १९७४-७५ ह्या काळात ते वसंतराव नाईकांच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री होते. त्यांच्याकडे पुनर्वसन व विधानकार्य ही खाती होती.

ते १७/५/१९७७ रोजी कॅबिनेट मंत्री झाले. त्यावेळी त्यांच्याकडे पाटबंधारे खाते होते. वसंतदादा पाटलांच्या १९७८ च्या मंत्रिमंडळात आरोग्य, कुटुंबकल्याण व विपणन ही खाती त्यांच्याकडे होती. बॅ. अंतुले ह्यांच्या मंत्रिमंडळात त्यांच्याकडे सार्वजनिक बांधकाम, तांत्रिक शिक्षण, दुग्धविकास, पशुसंवर्धन, मत्स्यविकास व रोजगार ह्या खात्यांचा कारभार होता.

## मुख्यमंत्री

सिमेंट प्रकरणामुळे अंतुल्यांना राजीनाम द्यावा लागला व बाबासाहेब भोसले मुख्यमंत्री झाले. त्यावेळी शिवाजीराव कॅबिनेट मंत्री होते. त्यांच्याकडे पाटबंधारे, तांत्रिक शिक्षण, दुग्धविकास, पशुसंवर्धन, मत्स्यविकास, कायदा व न्याय ही खाती होती. १९८३ साली बाबासाहेबांना राजीनामा द्यावा लागला व वसंतदादा पुन्हा मुख्यमंत्री झाले. त्यांच्या मंत्रिमंडळात निलंगेकर-पाटलांना स्थान मिळाले होते व त्यांच्याकडे पाटबंधारे, विधी, न्याय, सहकार, सांस्कृतिक कार्य व युवक कल्याण ही खाती होती. दादांना १/६/१९८५ रोजी मुख्यमंत्रिपदाचा राजीनाम द्यावा लागला व शिवाजीराव मुख्यमंत्री झाले. त्यावेळी ते कोणत्याही सभागृहाचे सदस्य नव्हते. मराठवाड्यातून मुख्यमंत्री होणारे निलंगेकर हे दुसरे नेते. त्याआधी शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री होते.

## शिवाजीरावांचे कार्य

आमदार असताना मराठवाड्याकरता शिवाजीरावांनी बरेच काम केले. त्यांना शेतकरी व ग्रामीण भाग ह्यांच्या प्रश्नांची जाण आहे. सहकारी बँका, पाझर तलाव ह्यांच्या कामांना त्यांनी चालना दिली. शाळा व महाविद्यालये, सुताच्या गिरण्या, सहकार, तेलगिरण्या ह्यांची स्थापना करण्यात त्यांचा मोठा हातभार होता. मोरणा प्रकल्पातून जालना जिल्ह्याची निर्मिती ही त्यांची इतर प्रमुख कार्ये.

मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी मराठवाडा विकासाचा एक कार्यक्रम जाहीर केला. शेतकऱ्यांकरता पीक-विमा चालू केला. सवलतीच्या दराने त्यांनी शेतकऱ्यांना बँकांतून कर्ज उपलब्ध करून देण्याकरता प्रयत्न केला. उद्योगांचे विकेंद्रीकरण करण्याकरता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे औद्योगिक वसाहती स्थापन करण्यास चालना दिली.

स्वातंत्र्यसैनिकांचे हाल लक्षात घेऊन त्यांच्या सेवानिवृत्तिवेतनात वाढ केली. लोक न्यायालये व प्रशासकीय न्यायाधिकरणाची स्थापना केली. मुलींना मोफत शिक्षण देण्याची घोषणा केली. पर्यावरण विभाग सुरू केला.

दुर्दैवाने निलंगेकरांना मुख्यमंत्रिपद फार काळ लाभले नाही. ते फक्त नऊ महिने मुख्यमंत्री होते. त्यांची मुलगी एम.डी. परीक्षेला बसली होती. तिला उत्तीर्ण करण्याकरता त्यांनी परिक्षकावर दडपण आणले असा त्यांच्यावर आरोप होता. न्यायालयांनीही मुख्यमंत्र्यांवर ताशेरे ओढले आणि निलंगेकरांना ५/२/८६ रोजी पायउतार व्हावे लागले. त्याचवेळी त्यावेळचे राज्यपाल प्रभाकर राव ह्यांनाही राजीनामा द्यावा लागला. त्याचे कारण उपरिनिर्दिष्ट वैद्यकीय परीक्षेतील घोटाळा !*

अशा तऱ्हेने एका सभ्य व्यक्तित्त्वाच्या नेत्याच्या कारकिर्दीचा अस्त झाला. सर्वोच्च न्यायालयात ते निर्दोष सुटले असे म्हणतात. दुर्दैवाने त्यावेळच्या कुलगुरूंनी कार्यकारिणीवर निष्कारण ताशेरे झाडण्याचा प्रयत्न करून आपण पूर्ण निर्दोष आहोत असे सोंग केले होते. अर्थात तो भाग अलग.

ज्यावेळी विद्यापीठात श्री. पाटील ह्यांच्या मुलीच्या परीक्षेच्या निकालाबद्दल चर्चा होत होती त्यावेळी त्यांच्या पी.एच.डी.ची पदवी वादात होती. ह्याबाबत श्री. प्रवीण बंदापूरकर ह्यांनी लोकसत्तेत नुकताच एक लेख लिहिला आहे (बुधवार, मार्च २००७, पृष्ठ ६). त्यात त्यांनी पी.एच.डी.ची पदवी मिळविण्याकरता किती खटपट, श्रम केले ह्याचे वर्णन केलेले आहे. त्यांचा संशोधन प्रबंध नागपूर विद्यापीठाने १९८६ साली स्वीकारला व ते सर्व लेखन गोलमाल काहीतरी आहे ह्या टीकेला उत्तर दिले. त्यांच्या संशोधनाला सेतू माधवराव पगडी हे एक परीक्षक होते. त्याच लेखात त्यांच्यावर आलेली सर्व राजकीय किटाळेही दूर झाली असे श्री. बर्दापूरकर यांनी म्हटले आहे.

सध्या श्री. पाटील ह्यांचा मराठवाड्यात काही प्रभाव नाही. त्यांना राजकीय डावपेच खेळण्याचे जुळत नाही व त्यांची तशी वृत्तीही नाही. त्यांना पक्षांतर्गत किमान प्रबळगट निर्माण करता आला नाही असे बर्दापूरकर म्हणतात. त्याचबरोबर त्यांच्या उमद्या स्वभावाचेही उदाहरण ह्या लेखात दिलेले आहे. श्री. शिवाजीराव निलंगेकर पाटील मागे पडले ह्याची कारणे तीन आहेत. त्यांना श्रेष्ठींशी जवळीक साधता आलेली नाही, पक्षात डावपेच खेळता आलेले नाहीत, आणि ह्या ना त्या मार्गाने आपल्या पाठीशी असणारा असा मराठवाड्यात एक प्रभावगट निर्माण करता आलेला नाही. प्रलोभने फेकून हा गट कसा

* हा विषय ज्यावेळी विद्यापीठात चर्चिला जात होता त्यावेळी मी मुंबई विद्यापीठाच्या कार्यकारिणीचा सभासद होतो. त्या कार्यकारिणीनेच परिक्षेत अयोग्य मार्गांचा अवलंब केल्याबद्दल त्यांच्या मुलीला परीक्षेतून अर्धचंद्र दिला होता. - डॉ. रायरीकर

निर्माण करायचा ह्याचे शास्त्र पाटलांना माहीत नसावे!

### निलंगेकरांचे पुनर्वसन

शिवाजीराव निलंगेकर-पाटलांचे पुनर्वसन आता होईल का हे पहावयाचे आहे. शेतकरी व गरिबांविषयी तळमळ असलेला, ग्रामीण लोकांच्या प्रश्नांची जाण असलेला एक व्यासंगी व तळमळीचा कार्यकर्ता म्हणून लोक शिवाजीरावांना ओळखतात. त्यांची अभ्यासू वृत्ती, खोलवर विचार करण्याची पद्धत ह्यांमुळे त्यांचे मंत्रिमंडळातील स्थान शासनाला उपयुक्तच ठरेल असे म्हणतात.

ooo

---

संदर्भ :


१) अण्णा बोडदे -'श्री. शिवाजीराव पाटील निलंगेकर (३–६-८५ ते ९-३-८६)'

२) लोकप्रभा -'भ्रष्टाचाराच्या भोवऱ्यात मुख्यमंत्री', ३० मार्च १९८६

३) लोकराज्य

४) इंडिया टुडे ३१ मार्च १९८६

५) हूज हू



# १८. श्री. सुधाकरराव नाईक

## संयुक्त महाराष्ट्राचे दहावे मुख्यमंत्री

(२५-६-१९९१ ते २२-२-१९९३)

सुधाकरराव हे श्री. वसंतराव नाईक ह्यांचे पुतणे. त्यामुळे त्यांना राजकारण व अधिकारपद ह्या गोष्टी काही नव्या नव्हत्या. ते मुख्यमंत्री झाले आणि त्यांनी घराण्याची परंपरा काही काळ पुढे चालविली.

**जन्म व शिक्षण**

श्री. सुधाकरराव नाईक ह्यांचा जन्म २१/७/३४ रोजी पुसदपासून जवळ असलेल्या गहुली या गावी झाला. त्यांचे घराणे एका अर्थाने श्रीमंत होते. त्यांचे शिक्षण बी.ए., एल.एल.बी. पर्यंत झाले. पुसद येथे वकिली करण्याकरिता त्यांनी सनद घेतली.

**सामाजिक व राजकीय कार्य**

त्यांनी विनोबा भावे ह्यांच्या भूदान चळवळीत भाग घेतला होता. तसेच पंचायत, जिल्हापरिषद, कॉंग्रेस समिती ह्या संस्थांत अधिकाराची पदे भूषविली होती. त्यांचे मुख्य लक्ष शेतीचे स्वरूप बदलण्याकडे होते. कारण त्यांच्या चुलत्यांच्या विचारांचा वारसा त्यांच्याकडे आला होता. त्यांच्या मताप्रमाणे शेती हा भारतीचा अर्थव्यवस्थेचा कणा आहे.

**विधिमंडळात प्रवेश**

त्यांनी विधिमंडळात १९७७ साली प्रवेश केला. त्यावेळी वसंतदादा पाटील मुख्यमंत्री होते. दादांच्या मंत्रिमंडळात सुधाकररावांना राज्यमंत्र्याचे स्थान मिळाले. त्यांच्याकडे कृषिसिंचन क्षेत्रविकास प्राधिकरण व दुग्धव्यवसाय ही खाती होती. ते स्थानिक स्वराज्य मतदार संघातून विधान परिषदेत निवडून आले होते.

१९७८ साली ते पुसद मतदारसंघतून पुन्हा विधानसभेत निवडून आले. त्यावेळी ते

वसंतदादांच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री झाले. त्यांच्याकडे गृहनिर्माण, पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय ही खाती होती. १९८०च्या मध्यावधी निवडणुकीत निवडून आले तरी त्यांना अंतुले ह्यांच्या मंत्रिमंडळात स्थान मिळाले नाही.

१९८५ साली ते पुसद मतदार संघातून पुन्हा निवडून आले व वसंतदादांच्या मंत्रिमंडळात त्यांना स्थान मिळाले (मार्च १९८५ ते जून १९८५). सुधाकररावांकडे उद्योग, महसूल, पुनर्वसन व समाजकल्याण ही खाती होती. वसंतदादांनंतर शिवाजीराव पाटील निलंगेकर मुख्यमंत्री झाले. त्यावेळी सुधाकररावांकडे उद्योग, महसूल आणि समाजकल्याण ही खाती होती. सुधाकरराव नाईक हे पुरोगामी आघाडीच्या मंत्रिमंडळातही मंत्रिपदावर होते (१९८८). त्यावेळी श्री. शरद पवार हे मुख्यमंत्री होते.

फेब्रुवारी १९९० च्या विधानसभेच्या निवडणुकीत ते पुसद मतदारसंघातून विधिमंडळात निवडून आले. त्यावेळी शरद पवार मुख्यमंत्री होते. सुधाकररावांकडे महसूल, सांस्कृतिक व शिक्षण खात्यांची जबाबदारी होती. शिक्षणमंत्री असताना त्यांच्या कारकिर्दीत अमरावती विद्यापीठाची स्थापना झाली. त्यांनी अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्रनिकेतने स्थापण्यास उत्तेजन दिले. त्याच काळात त्यांनी सावित्रीबाई पालक योजना, प्रियदर्शिनी वसतिगृह आणि मुलींना बारावीपर्यंत शिक्षण मोफत ह्या योजना कार्यान्वित केल्या. सुधाकररावांना विधिमंडळ कामाचा जवळजवळ चौदा वर्षांचा अनुभव होता. त्यांनी ह्या काळात अनेक महत्त्वाची खाती हाताळली. त्यांचा अभ्यासू स्वभाव, सहकाऱ्यांशी स्नेहपूर्ण संबंध ह्यांमुळे मुख्यमंत्रिपदाकरता त्यांचे नाव पुढे येऊ लागले व ती संधी २५/६/१९९१ रोजी आली.

**मुख्यमंत्री**

१९९१ साली लोकसभा निवडणुका झाल्या. श्री. नरसिंहराव पंतप्रधान झाले. त्यांनी शरद पवार ह्यांना आपल्या मंत्रिमंडळात सरंक्षणमंत्री म्हणून सामावून घेतले. त्याचवेळी सुधाकरराव महाराष्ट्राच्या विधिमंडळाचे नेते म्हणून निवडले गेले व २५/६/१९९१ रोजी ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. ते एकाच कुटुंबातील दुसरे व विदर्भातील तिसरे मुख्यमंत्री. त्यावेळी महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. सी. सुब्रमण्यम होते. नरसिंहरावांच्या विरुद्ध काही उद्‌गार काढल्यामुळे त्यांना राज्यपालपदाचा राजीनामा द्यावा लागला.

सुधाकररावांना मुख्यमंत्रिपद फार काळ लाभले नाही. अंतर्गत शत्रू व बाहुले बनावे अशी हितशत्रूंची अपेक्षा ह्यामुळे बाबरी मशिदीप्रकरणामुळे मुंबईत झालेल्या दंग्याच्या वेळी त्यांना

राजीनामा द्यावा लागला. त्यावेळी मुंबईत दंगे झाले. श्रेष्ठींच्या मते सुधाकरराव ती परिस्थिती हाताळण्यात कमी पडले आणि २२/२/१९९३ रोजी त्यांना राजीनामा द्यावा लागला आणि शरद पवार मुख्यमंत्री झाले. सुधाकरराव फक्त एक वर्ष आठ महिने मुख्यमंत्री होते ( २५/६/९१ ते २२/२/१९९३).

**हिमाचल प्रदेशचे राज्यपाल**

त्यानंतर त्यांची हिमाचलप्रदेशचे राज्यपाल म्हणून नेमणूक झाली. परंतु राजकारणातील क्रियाशील आयुष्यात रमलेल्या सुधाकररावांना राज्यपालपदात फारसे स्वारस्य नव्हते व त्यांनी १०/९/९५ रोजी त्या पदाचा राजीनामा दिला. दुर्दैवाने मुख्यमंत्रिपदाच्या अल्पकाळात त्यांना काहीच भरीव कार्य करता आले नाही. उलट ते अकार्यक्षम मुख्यमंत्री ठरले!

**लोकसभेचे सदस्य**

१९९८ साली त्यांनी वाशिम मतदारसंघातून लोकसभेत प्रवेश केला. त्यावेळी ते अखिल भारतीय कॉंग्रेस सभेचे सदस्य होते. परंतु शरद पवार ह्यांना सोनिया गांधींच्या परदेशी नागरिकत्वाच्या प्रश्नावरून कॉंग्रेसमधून अर्धचंद्र दिला गेला. त्यांनी 'राष्ट्रवादी कॉंग्रेस' हा नवा पक्ष स्थापन केला. श्री. सुधाकरराव राष्ट्रवादी कॉंग्रेसला मिळाले व अशा तऱ्हेने कॉंग्रेस पक्षाची विभागणी झाली. त्यानंतर सुधाकरराव १९९९ साली राष्ट्रवादीच्या तिकिटावर पुसद मतदार संघातून विधिमंडळात निवडून आले. त्यावेळी विलासराव देशमुख ह्यांच्या नेतृत्त्वाखाली कॉंग्रेस व राष्ट्रवादी ह्यांचे संयुक्त सरकार स्थापन झाले. सुधाकररावांना जलसंधारण परिषदेचे अध्यक्ष केले. हे खाते महाराष्ट्रात नित्य पडणाऱ्या दुष्काळाला तोंड देण्याकरता सुधाकररावामुळेच निर्माण झाले होते. परंतु सुधाकररावांचे दुर्दैवाने १२/५/२००१ रोजी निधन झाले.

**मुख्यमंत्री सुधाकरराव नाईकांचे कार्य**

त्यांना ग्रामीण भागातील लोकांच्या प्रश्नांची चांगली जाण होती. त्यांना स्त्रियांच्या प्रश्नांचे महत्त्व पटल्यामुळे त्यांनी स्वतंत्र महिला व बालकल्याण विभागाची स्थापना केली. त्यांना अल्पसंख्यांकांच्या प्रश्नांचीही जाण होती. त्याकरता त्यांनी अल्पसंख्यांक आयोग स्थापन केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विषयी असलेल्या आदरामुळे त्यांनी चैत्यभूमीच्या नूतनीकरणाचे काम हाती घेतले. त्यांचे सामाजिक संस्थांना भरीव मदत करण्याचे धोरण होते. सर्वोदय आश्रम, साने गुरुजी कथामाला ह्यांना त्यांच्याकडून आर्थिक

मदत मिळाली. म. गांधींच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्याकरता त्यांनी गांधीं-चरित्राच्या स्वस्त प्रती उपलब्ध करून देण्याची योजना आखली. संत तुकडोजी महाराजांचे वांङमय छापण्यात त्यांनी पुढाकार घेतला. त्यांनी काही काळ पत्रकारिता केली असल्यामुळे (उदा., 'ग्रामराज्य' साप्ताहिक) पत्रकारांच्या शिक्षणाकरता त्यांनी यवतमाळ ट्रस्ट स्थापन केला. त्या ट्रस्टचे ते अध्यक्ष होते. त्यांनी सहकारी सुताच्या गिरण्या स्थापन करण्यास उत्तेजन दिले.

### सुधाकरराव नाईकांचे व्यक्तिमत्त्व

सुधाकरराव हे थोडा काळच मुख्यमंत्री होते. पण दलित व शोषित वर्गाविषयी त्यांना असलेल्या आस्थेमुळे लोकमानसात त्यांच्याविषयी आदर होता. शेतीच्या प्रश्नांची त्यांना उत्तम जाण होती. ते अभ्यासू आणि व्यासंगी होते. वसंतराव नाईकांप्रमाणे ते सुसंस्कृत, सौजन्यशील आणि शालीन होते. उत्तम प्रशासक, राजकारणी आणि कसलेले संसदपटू होते.

ooo


संदर्भ :

१) सोपान गाडे -'सुधाकरराव नाईक', जानेवारी २००२, अविष्कार प्रकाशन, पुणे.

२) हूज हू -

३) लोकराज्य - माहिती व जनसंपर्क संचालनालय.



# १९. श्री. मनोहर जोशी

## संयुक्त महाराष्ट्राचे अकरावे मुख्यमंत्री

(१४-३-१९९५ ते २५-१-१९९९)

### जन्म व शिक्षण

श्री. मनोहरपंतांचा जन्म २ डिसेंबर १९३७ साली रायगड जिल्ह्यातील नांदवी या ठिकाणी झाला. त्यांचे बालपण अत्यंत कठीण परिस्थितीत गेले. त्यांचे शिक्षण नांदवी, महाड, पनवेल येथे वार लावूनच झाले. मनोहरपंत मॅट्रिकला असताना त्यांचे वडील वारले. कॉलेजच्या शिक्षणाकरता ते मुंबईस आले. त्यांनी सर्व शिक्षण नोकरी करूनच पार पाडले. ह्या काळात त्यांना त्यांच्या बहिणीची खूप मदत झाली. ते १९५९ साली रुईया महाविद्यालयातून बी.ए. झाले. १९६१ साली एम. ए. झाले. हे शिक्षण त्यांनी खाजगी वर्गात व महानगरपालिकेत कारकून म्हणून काम करून पूर्ण केले.

### व्यावसायिक कारकीर्द

त्यांची व्यावसायिक कारकीर्द १९६१ साली सुरू झाली ती कोहिनूर टेक्निकल इन्स्टिट्यूटच्या स्थापनेपासून. ही संस्था आता खूप वाढली आहे (शिवसेनेत आजही त्यांना 'जोशी सर' असे संबोधले जाते). त्यांच्या उद्योगांचे विस्तारीकरणही खूप झाले आहे. त्यांनी ह्या इन्स्टिट्यूटबरोबर हॉटेल बांधकाम ह्या क्षेत्रांतही प्रवेश केला. त्यांच्या मुलाने नुकतीच कोहिनूर मिलची जागा खरेदी केली आहे.

---

श्री. मनोहर जोशी यांचेशी माझा प्रत्यक्ष परिचय नाही. ते ज्यावेळी विद्यापीठाच्या कार्यकारिणीचे सभासद होते त्यावेळी मी त्या कार्यकारिणीचा सदस्य नव्हतो. दादर मतदार संघातून लोकसभा व विधानसभा ह्यांच्या निवडणुकांत त्यांना अपयश आले. श्री. गायकवाड व त्यांची मुलगी ह्यांच्याकडून पराभव पत्करावा लागला. अर्थात तरीही त्यांची विधानसभा व लोकसभा ह्यांतील कारकीर्द संपुष्टात आली असे म्हणता येणार नाही. कारण ते राज्यसभेत शिवसेनेतर्फे सदस्य आहेत. - डॉ. रायरीकर

मनोहरपंतांची बाळासाहेब ठाकरे यांच्याशी जून १९, १९६६ रोजी श्रीकांत ठाकरे ह्यांच्या मध्यस्थीने ओळख झाली. आज ते बाळासाहेबांचे उजवे हात समजले जातात.

**चळवळीत सहभाग**

बेळगाव, निपाणी सत्याग्रहात त्यांना जवळजवळ अडीच महिन्यांचा कारावास घडला.

**महानगरपालिकेतील कारकीर्द**

ज्यावेळी मनोहरपंतांनी शिवसेनेत प्रवेश केला त्यावेळी (१९६६) ते परळला अहमद सेलर चाळीत राहत होते. तेव्हा कॉंग्रेस हा एकमेव प्रभावी पक्ष होता. पण मनोहरपंतांनी बाळासाहेबांच्या नेतृत्त्वाखाली शिवसेनेची वाढ करण्याचे कार्य हाती घेतले. १९६८ साली त्यांनी बहुभाषिक बहुप्रांतीय अशा दादर मतदार संघातून श्रीमती प्रमिला दंडवते यांचा पराभव करून महापालिकेची निवडणूक जिंकली. ते शिवसेना गटाचे महाराष्ट्रातील नेते झाले. ते स्थायी व शिक्षण समितीचे सभासद होते. महापौर झाल्यानंतरही ते आपल्या जुन्या घरातच राहत होते. महानगरपालिकेत मराठीत उत्तरे देण्याची प्रथा त्यांनीच पाडली. महापौर असताना 'स्वच्छ मुंबई, हरित मुंबई' ही घोषणा त्यांनीच दिली. गणेश विसर्जनाच्या वेळी महापौरांनी गणपतीवर पुष्पवृष्टी करण्याची प्रथा त्यांनीच सुरू केली. झुणका भाकर केंद्रे स्थापण्यात त्यांनीच पुढाकार घेतला होता. त्यामुळे उद्योगनिर्मिती होणार होती. पहिले झुणका भाकर केंद्र सी.एस.टी. स्टेशनसमोर आहे.

**विधानसभेतील कारकीर्द**

१९७२ साली त्यांची विधानसभेतील कारकीर्द सुरू झाली. त्यावेळी ते महानगरपालिकेचे प्रतिनिधी म्हणून विधानसभेवर निवडून आले. ह्याच वेळी शिवसेनेचे पहिले राज्यव्यापी संमेलन सुरू झाले. १९९० साली ते दादर मतदार संघातून विधानसभेवर निवडून आले. त्यावेळी शरद पवार मुख्यमंत्री होते व मनोहरपंत विरोधी पक्षनेते होते. पाणी, दुष्काळ, कापूस उत्पादकांच्या समस्या ह्यांबाबत त्यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केले.

१९९१ साली शरद पवार संरक्षणमंत्री झाले. सुधाकरराव नाईक मुख्यमंत्री झाले. मुंडे विरोधी पक्ष नेते होते. ह्यावेळी जोशी ह्यांना कै. भाऊराव पाटील ह्यांनी केलेल्या फिर्यादीमुळे सदस्यत्त्वाचा राजीनामा द्यावा लागला. जाती व धर्माच्या नावावर मते मिळविली असा जोशांच्या विरुद्ध आरोप होता.

**मुख्यमंत्री**

यानंतर युती सरकार आले. अयोध्येतील तापलेले वातावरण, मंत्र्यांचे जे. जे. रुग्णालयातील कथित आरोपींशी असलेले संबंध ह्यांमुळे काँग्रेसविरुद्ध वातावरण कलुषित झालेले होते. मनोहरपंत युती सरकारचे मुख्यमंत्री झाले. काँग्रेसला फक्त ८८ जागा मिळाल्या. परंतु ह्यावेळीही जोशी ह्यांना निवडणुकीबाबत कोर्टकचेऱ्यांना तोंड द्यावे लागले. कारण त्यांनी निवडणुकीत भ्रष्टाचार केला, जातिधर्माच्या नावाखाली मते मिळविली अशी त्यांच्या विरुद्ध सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाली होती. या याचिकेचा निकाल ११/१२/९६ रोजी लागला. परंतु काही काळ जोशी यांचे वर्णन 'टेंपररी मुख्यमंत्री' किंवा 'नाईट वॉचमन' असे केले जात असे.

मुख्यमंत्रिपदाच्या कारकिर्दीत त्यांनी कृष्णा खोरे विकास मंडळ, उड्डाणपूल, मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, झोपडपट्टीवासियांना मोफत घर योजना, धारावी स्लमचे स्वच्छीकरण, टँकरमुक्त चळवळ, एका रुपयात झुणकाभाकर, सुलभ स्वच्छतागृहे, जागोजागी क्रीडाप्रबोधिनींची स्थापना, ज्येष्ठ नागरिकांना प्रवासभाड्यात सवलती, मातोश्री वृद्धाश्रम, महाराष्ट्र कला अकादमी, सांस्कृतिक संवर्धन अशी अनेक लोकोपयोगी कामे केली. त्यांनी जागतिक मराठी परिषदेची स्थापना करून जगातील सर्व मराठी लोकांच्या औद्योगिक व सांस्कृतिक विकासाचे ध्येय मराठी समाजापुढे ठेवले. मराठी उद्योजकांना प्रेरणा देण्याकरता त्यांनी जागतिक मराठी चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजची स्थापना केली. जागतिक मराठी सभेचे अधिवेशन (८९, ९१ व ९४ साली) तीन वेळा भरविले. सिद्धी प्रेरणा शिबिराचे आयोजन केले. मराठी व्यापार उद्योग मेळावा भरविला. मराठी ग्रंथसंग्रहालयाला ५० लाख रुपयांची देणगी दिली. अर्थात देणगी दिल्यानंतर ती प्रत्यक्ष संस्थेपर्यंत पोहोचण्यास बराच काळ लागला ही गोष्ट वेगळी.

सन २००० पर्यंत सर्व महाराष्ट्र साक्षर झाला पाहिजे अशी त्यांची इच्छा होती. शारीरिक शिक्षणाला उत्तेजन देण्याकरता त्यांनी स्मार्ट स्पोर्टस्‌ची योजना सुरू केली. त्यांना खेळाची, विशेषतः क्रिकेटची आवड आहे. काही काळ ते मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष होते. ३० जानेवारी १९९९ साली बाळासाहेब ठाकरे ह्यांच्या आज्ञेमुळे त्यांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला.

### लोकसभेचे सदस्यत्त्व व मध्यवर्ती सरकारात मंत्री

१९९९साली मनोहरपंत दादर मतदार संघातून लोकसभेवर निवडून आले. ते अटलबिहारी वाजपेयींच्या मंत्रिमंडळात अवजड उद्योग खात्याचे मंत्री झाले (३०/१०/९९). नव्या उद्योगांना उत्तेजन देणे व आजारी उद्योगांना मदत करणे हे त्यांचे प्रामुख्याने धोरण होते. १४/९/९५ ते जानेवारी १९९९ ह्या काळात ते मुख्यमंत्री होते. पुढे ते कॅबिनेट मंत्री झाले व नंतर ते लोकसभेचे अध्यक्ष झाले.

### मनोहरपंतांचे व्यक्तिमत्त्व

मनोहर जोशी ह्यांचे भवितव्य लोकाभिमुख कार्यावरच अवलंबून आहे. ते प्रत्येकाविषयी आपुलकी दाखवतात. त्यांची दृष्टी सकारात्मक असते, परंतु परिणाम अनिश्चित. ते सगळ्यांना होय म्हणतात. 'करून टाकू' हा त्यांचा परवलीचा शब्द. बोलण्यास गोड व्यक्तिमत्त्व. प्रसन्न, हसरे, ध्येयवादी, कष्टाळू, बाहेरून नम्रता, शालीनता, सुसंस्कृतपणा, मुत्सद्दीपणा आणि माणसाची उत्तम पारख हे त्यांचे गुण आहेत.

ooo

---

संदर्भसूची :


१) चौगुले श्रीकांत -'मनोहर जोशी', २००२, अविष्कार प्रकाशन

२) मेहेंदळे विश्वास -'गांधी ते पटेल', सिग्नेट पब्लिकेशन, पा. २७.

३) टेणी नंदकुमार -'नांदवी त वर्षा', १९९७, प्रभात प्रकाशन घाटकोपर



# २०. श्री. नारायणराव राणे

**संयुक्त महाराष्ट्राचे बारावे मुख्यमंत्री**

(१-२-१९९९ ते १८-१२-१९९९)

आज श्री. राणे हे काँग्रेसचे महत्त्वाचे नेते आहेत. एकेकाळी ते शिवसेनेचे प्रथम श्रेणीचे पुढारी होते. कोकण हा राण्यांचा बालेकिल्ला मानला जातो. त्यांच्यामुळेच शिवसेनेला कोकणात प्रतिष्ठेचे स्थान मिळाले होते.

## जन्म व शिक्षण

नारायणराव हे गरिबीतून वर आलेले नेतृत्त्व आहे. त्यांचा जन्म कोकणातील वरखेडे ह्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील गावात झाला. ते एका गरीब कामगाराच्या कुटुंबात जन्मले. त्यांचे शिक्षण मॅट्रिकपर्यंत झाले (१९७०). त्यानंतर त्यांनी काही काळ इन्कमटॅक्स खात्यात काम केले व १९८४ साली नोकरीचा राजीनामा देऊन ते शिवसेनेचे पूर्णवेळ कार्यकर्ते झाले.

## महानगरपालिकेतील वैधानिक कारकीर्द

राणे यांची सार्वजनिक कामाची कारकीर्द मुंबई महानगर पालिकेत सुरू झाली. १९८५ साली ते मुंबई महानगर पालिकेत निवडून आले होते. १९९० साली ते मालवण मतदार संघातून विधिमंडळात निवडून आले. त्यावेळी शिवसेना व भारतीय जनता पक्ष ह्यांची युती होऊन मनोहर जोशी ह्यांच्या नेतृत्त्वाखाली मंत्रिमंडळ बनले होते.

## मंत्रिपद

राणे ह्यांना मनोहर जोशींच्या मंत्रिमंडळात मंत्री म्हणून स्थान मिळाले. ते कॅबिनेट दर्जाचे मंत्री होते (१४/५/१९९५). त्यांच्याकडे मत्स्यव्यवसाय, पुनर्वसन ही खाती होती. राण्यांच्या कर्तबगारीला ह्याच वेळी बहर आला. त्यांची अभ्यासू वृत्ती व धडाडीचे वक्तृत्त्व ह्या गुणांमुळे पुढे वाव मिळाला.

### मुख्यमंत्रिपद

पक्षादेशामुळे मनोहर जोशी ह्यांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला (११/१/९९). त्यावेळी पी. सी. अलेक्झांडर हे राज्यपाल होते. मनोहर जोशींनंतर मुख्यमंत्रिपदाची माळ साहजिकच नारायणराव राण्यांच्या गळ्यात पडली. परंतु राणे हे फक्त दहाच महिने म्हणजे अत्यंत अल्पकाळ मुख्यमंत्री होते. एवढ्या थोड्या काळात त्यांच्याकडून काही भरीव व प्रभावी कामांची अपेक्षा करणे अयोग्यच. तरी या थोड्या काळात त्यांनी प्रशासकीय सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी निवृत्तीचे वय ६० वरून ५८वर आणले. राण्यांना महिला व तळागळातील लोकांच्या प्रश्नांची जाण आहे व त्यांना साहाय्य करण्याची तळमळ आहे. जिजामात महिला आधार योजना, बळीराजा संरक्षण योजना ह्यांना त्यांनी चालना दिली. महिला योजना ही एका अर्थाने सामाजिक सुरक्षा योजनाच आहे. ह्या योजनेखाली कुटुंब प्रमुखाचे निधन झाल्यास विधवांना संरक्षण मिळणार होते, तर बळीराजा संरक्षण विमा योजनेखाली नैसर्गिक आपत्तीत शेतकऱ्यांना संरक्षण पुरविले आहे. उस तोडणाऱ्या कामगारांना फक्त हंगामातच काम असते. त्यांना वर्षभर रोजगार नसतो. ज्यावेळी उस तोडण्याचा हंगाम नसतो त्यावेळी त्यांना रिटेन्शन भत्ता दिला जातो. अशा कामगारांना वर्षभर रोजगाराची शाश्वती नसल्यामुळे त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय करणे जरूर असते. ह्याकरता मुख्यमंत्री राण्यांनी काही प्रभावी पावले टाकली. स्त्रियांमध्ये औद्योगिक शिक्षणाची आवड निर्माण करण्याकरता त्यांना औद्योगिक शिक्षण संस्थांमध्ये फी माफ केली. त्यांनी दुय्यम सेवा मंडळ स्थापन केले. त्यांच्या पर्यटनाविषयी योजना होत्या, पण त्यांबाबत थोड्या काळात त्यांना विशेष काही करता आले नाही.

### नारायणराव राणे आणि काँग्रेस

आज राणे काँग्रसचे मान्यवर पुढारी आहेत. भावी मुख्यमंत्री म्हणून लोक त्यांच्याकडे पाहतात. ते विलासराव देशमुखांच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री आहेत. त्यांच्याकडे महसूल खाते आहे. अत्यंत धडाडीचे, कर्तबगार, त्वरित व अचून निर्णय घेणारे मंत्री अशी राण्यांची ख्याती आहे. ते काही काळ विरोधी पक्ष नेतेही होते. त्यावेळी विधिमंडळ कार्य व कार्यशैली ह्यांच्यावर त्यांनी प्रभावी पकड जमवली. त्यांचा जनसंपर्क विपुल असून ते एक स्पष्टवक्ते व वेळ आल्यास अप्रिय निर्णय घेण्यास न डगमगणारे मंत्री आहेत. अर्थात राणे ह्यांचा जनसंपर्क व लोकसंग्रह हा त्यांच्या सहृदय स्वभावामुळेच आहे. त्यांचा भविष्यकाळ उज्ज्वल दिसतो व ते अनेक उच्च पदे भूषवतील अशी जनतेची अपेक्षा आहे.

श्री. राजू परुळेकर ह्यांच्या मते काँग्रेसमधील प्रत्येकजण गांधी घराण्याचा आश्रित असतो. महाराष्ट्रात अपवाद सोडता कोणीही स्वबळावर मुख्यमंत्री झालेले नाहीत. त्यामुळे गांधी घराण्याचा आश्रित महाराष्ट्र बदलू शकत नाही. त्यामुळे त्या घराण्याच्या आश्रयाला जाणे ही राण्यांची विकासदृष्टी आहे का? नारायणराव भविष्यात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होतीलही, परंतु सोनियावादी काँग्रेस त्यांना कधीही मुख्यमंत्री करणार नाही. त्या पदापर्यंत पोहोचण्याकरता राणे ह्यांना काय काय व्यूहरचना करावी लागणार आहे हे पाहण्यासारखे आहे.

ooo

---


संदर्भ :

१) सोपान गाडे - 'राणे', २००२, अविष्कार प्रकाशन, पुणे.

२) राजू परुळेकर -'माणसे भेटलेली, न भेटलेली', नवचैतन्य प्रकाशन, बोरिवली (प), मुंबई ९२. (पृष्ठे १८६-१९३)

३) लोकराज्य - माहिती व जनसंपर्क संचालनालय.



# २१. श्री. विलासराव देशमुख

**संयुक्त महाराष्ट्राचे तेरावे मुख्यमंत्री**

(१८-१०-१९९९ ते १८-१-२००३)

(१-११-२००४ ते )

विलासराव हे मराठवाड्यातील तिसरे मुख्यमंत्री. ते लातूर जिल्ह्याचे. त्यांच्या आधी कै. शंकरराव चव्हाण, शिवाजीराव निलंगेकर पाटील हे दोघे मराठवाड्यातील मुख्यमंत्री होते. महाराष्ट्राच्या काँग्रेस पक्षातील अंतर्गत राजकारणामुळे त्यांना १८/१/२००३ रोजी राजीनामा द्यावा लागला.

## जन्म व शिक्षण

मराठवाड्यातील बाभळगाव येथे २५/५/१९४१ रोजी विलासरावांचा जन्म झाला. म्हणजे आज ते ६५ वर्षांचे आहेत. त्यांनी बी.एस.सी. पदवी पुणे येथील गरवारे महाविद्यालयात शिक्षण करून मिळविली. ह्या परीक्षेकरता त्यांचा विषय होता भौतिकशास्त्र. त्यानंतर त्यांनी कायद्याची पदवी मिळविली व १९६८ साली त्यांना कायदा शाखेतील पदव्योत्तर एल.एल.एम.ची पदवी मिळाली. त्यांनी वकिलीस सुरुवात पुण्यासच केली. त्यांना खरे तर लातूर येथे स्थायिक व्हायचे होते, परंतु त्यांच्या महत्त्वाकांक्षेच्या परिमाणात लातूर हे अतिशय मर्यादित क्षेत्र होते.

## सामाजिक व राजकीय कार्य

लातूरला विलासराव १९८० पर्यंत होते. म्हणजे १९६८ ते १९८० ह्या बारा वर्षांच्या काळात सामाजिक व राजकीय उमेदवारी त्यांनी लातूरला केली. ते ग्रामपंचायत व जिल्हापरिषदेमध्ये कार्यशील होते. युवक काँग्रेसचे नेतृत्त्वही त्यांनी काही दिवस केले. ते सहकारी बँकेच्या क्षेत्रातही कार्यशील होते. १९८० साली त्यांना सहकारी चळवळीचा अभ्यास करण्याकरता रशियात जाण्याची संधी मिळाली.

### राजकीय - विधिमंडळ कार्याला सुरुवात

१९८० साली प्रथम त्यांनी लातूर मतदारसंघातून निवडणूक जिंकली. त्यानंतर ते दोनदा विधानसभेत अनुक्रमे १९८५ व १९९० साली निवडून आले. परंतु १९९५-९६ सालच्या दोन्ही निवडणुकांत ते यशस्वी झाले नाहीत. नंतर काही काळ त्यांनी शिवसेनेशी मैत्री करण्याचा प्रयत्न केला आणि विधानसभा व लोकसभेत त्यांच्यामार्फत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यात त्यांना यश मिळाले नाही. सुदैवाने सप्टेंबर १९९९ च्या विधानसभेच्या निवडणुकीत ते यशस्वी झाले व मुख्यमंत्रिपदाच्या गादीवर त्यांनी झेप घेतली.

### संसदीय कारकीर्द

खरे पाहता विलासरावांची संसदीय कारकीर्द १९८२ सालापासूनच सुरू झाली. बाबासाहेब भोसल्यांच्या मंत्रिमंडळात विलासराव राज्यमंत्री होते. त्यावेळी त्यांच्याकडे युवक कल्याण, तंत्रशिक्षण, ग्रामविकास, कृषी ही खाती होती.

### मंत्री

बॅ. भोसल्यांनंतर २/२/१९८३ रोजी वसंतदादा पाटील मुख्यमंत्री झाले. ह्या मंत्रिमंडळात विलासरावांना राज्यमंत्री म्हणून स्थान मिळाले. त्यांच्याकडे गृह व सर्वसामान्य प्रशासन ही खाती होती. वसंतदादांना पक्षांतर्गत विरोधामुळे मुख्यमंत्रिपद सोडावे लागले व त्यानंतर शिवाजीराव निलंगेकर पाटील हे मुख्यमंत्री झाले (१९८५). अर्थात राजकारणातही आवडता-नावडता असतो. निलंगेकरांच्या मंत्रिमंडळात विलासरावांना स्थात मिळाले नाही. परंतु मुख्यमंत्रिपद निलंगेकर-पाटलांना लाभले नाही. कारण मुलीच्या मार्कांच्या घोटाळ्यात त्यांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. १२/३/१९८६ रोजी शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री झाले.

### कॅबिनेट मंत्री

सुदैवाने शंकररावांच्या मंत्रिमंडळात विलासरावांना कॅबिनेट मंत्री होण्याचा मान मिळाला. त्यांच्याकडे अत्यंत महत्त्वाची खाती होती. महसूल, सहकार, सार्वजनिक बांधकाम व संसदीय कामकाज अशी ती खाती होती. १९८८ साली शंकरराव केंद्रीय मंत्रिमंडळात अर्थमंत्री झाले. त्यावेळी शरद पवारांनी विलासरावांना मंत्रिमंडळात घेतले व त्यांच्याकडे महत्त्वाची खाती सोपवली. शरद पवारांच्या मंत्रिमंडळात ते कॅबिनेट मंत्री होते. कृषि-लाभक्षेत्र विकास, फलोद्यान व पर्यटन विकास ही खाती विलासरावांकडे सोपवली होती. १९९०च्या पवारांच्या मंत्रिमंडळात विलासरावांचा अंतर्भाव होता. त्यावेळीही ते कॅबिनेट मंत्रीच होते.

त्यांच्याकडे शिक्षण, तंत्रशिक्षण, पशुसंवर्धन व दुग्धविकास ही खाती होती.

शरद पवारांना १९९१ साली केंद्रीय मंत्रिमंडळात जावे लागले. त्यावेळी नरसिंहराव पंतप्रधान होते. शरद पवारांनी आपली गादी सुधाकररावांकडे सोपविली. नाईकांनी विलासरावांचा मंत्रिमंडळात अंतर्भाव केला व त्यांच्याकडे उद्योग हे खाते सोपवले. सुधाकररावांना मुंबईच्या दंगलीतील असमाधकारक कामगिरीमुळे जावे लागले. शरद पवार हे १९९३ ला पुन्हा मुख्यमंत्री झाले व त्यांनी विलासरावांचा आपल्या मंत्रिमंडळात समावेश केला. त्यावेळी त्यांच्याकडे (१९९५ पर्यंत) महसूल खाते होते.

**मुख्यमंत्री**

दुर्दैवाने काँग्रेसला १९९९ सालच्या निवडणुकीत बहुमत मिळाले नाही. विलासरावांची काँग्रेस पक्षाचे नेते म्हणून निवड झाली व १८/१०/९९ रोजी मुख्यमंत्री होण्याचे भाग्य त्यांना लाभले. १९६० ते १९९९ ह्या काळात महाराष्ट्रात तेरा मुख्यमंत्री झाले. विलासराव हे तेरावे. त्यावेळी पी. सी. अलेक्झांडर राज्यपाल होते व मुख्यमंत्रिपदावर विलासराव १८/२/२००३ पर्यंत होते. परंतु पक्षांतर्गत राजकारणामुळे त्यांना आपले मुख्यमंत्रिपद सोडावे लागले व त्यांच्या जागी त्यांचे सन्मित्र श्री. सुशीलकुमार शिंदे हे पक्षनेते व मुख्यमंत्री झाले. पण सुशीलकुमार देखील पक्षांतर्गत राजकारणाचे बळी ठरले. त्यांची आंध्रचे राज्यपाल म्हणून निवड झाली व १/११/२००४ रोजी विलासराव हे पुन्हा मुख्यमंत्री झाले ते आजतागायत. महाराष्ट्राचा राज्यकारभार व भवितव्य मुख्यमंत्री म्हणून त्यांच्याच हातात आहे.

**विलासरावांचे कार्य**

विलासरावांचा मुख्यमंत्रिपदाचा काळ हा महाराष्ट्रापुढे अनेक प्रश्न असलेला व ही सर्व आव्हाने पेलणे तसे संसदीय लोकशाही व नोकरशाहीचे प्रभुत्त्व ह्या वातावरणात कठीणच! परंतु विलासरावांनी अशा अनेक प्रश्नांना तोंड देऊन अनेक प्रश्न तडीसही लावले.

सर्वांत महत्त्वाचा प्रश्न होता तो राज्याच्या कर्जाचा मोठा बोजा. त्याकरता सर्व क्षेत्रांत खर्चाची काटकसर करण्याची गरज होती. विलासरावांनी त्या दिशेने महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घेतले.

महाराष्ट्र ही सत्तेच्या विकेंद्रीकरणाची जननी. त्याच धोरणाची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याची गरज होती. लोकशाहीची विश्वविद्यालये म्हणून जिल्हा परिषदा, ग्राम पंचायती, तालुका पंचायती ह्यांकडे लोक बघत असत. अर्थात ही सर्व स्थाने राजकारणाचे अड्डे झाले

असून त्यांत घराणेशाहीने प्रवेश केलेला आहे. तरीपण विलासरावांनीं विकासाच्या कळीचे घटक- म्हणजे शिक्षण, आरोग्य, रस्ते, समाजकल्याण हे जिल्हापरिषदांकडे सोपवून त्यांना ह्याकरता पुढाकार घेण्यास उत्तेजन दिले.

श्री. गाडगे महाराज हे ग्राम स्वच्छतेचे शंकराचार्य. गाव स्वच्छ तर मन स्वच्छ ही गाडगे महाराजांची भूमिका. विलासराव गाडगे महाराजांना मानतात. त्यांच्या कार्याचे मूल्य त्यांना कळते. म्हणून त्यांनी ग्राम अभियान व संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाच्या कार्याला गती दिली व मोठे साहाय्यही दिले.

संगणकीकरण, माहिती तंत्रज्ञान हे आज परवलीचे शब्द आहेत. कै. राजीव गांधी ह्यांनी ह्या क्षेत्रांची वाढ होण्याकरता पुढाकार घेतला होता. विलासरावांनी राजीव गांधी ह्यांच्या कार्यातून स्फूर्ती घेऊन संगणकीकरण व माहिती तंत्रज्ञानाच्या (आय.टी.) योजनांना उत्तेजन दिले. प्रशासनात संगणकीकरणाचा संदेश दिला. माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्राला उत्तेजन देण्याकरता त्यांनी माहिती तंत्र प्रमाणपत्र अभ्यासक्रमाला चालना व उत्तेजन दिले.

शिक्षकांचा तुटवडा भरून काढण्याकरता त्यांनी 'शिक्षक सेवा योजने'स प्राधान्य दिले व अंशतः सुशिक्षित बेकारांचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला.

आज आपल्या देशातील अत्यंत अवघड प्रश्न म्हणजे लोकसंख्येची वाढ. 'हम दो हमारे दो' हा संदेश फक्त शहरी भागातच पोहोचला आहे. ग्रामीण भागातील लोकांत पूर्णतः जागृती करण्यात आपण अजूनही यशस्वी झालेलो नाही. लोकसंख्यावाढीच्या प्रमाणात रोजगारी वाढत नाही व दरडोई वा राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होत नाही. म्हणून लोकसंख्येचे नियंत्रण,हे आपले राष्ट्रीय धोरण आहे व ते राबविण्याचा विलासरावांचा प्रयत्न आहे.

महिलांना सक्षम करण्याच्या बाबतीत विलासरावांचा दृष्टिकोन पुरोगामी आहे. त्यांनी महिलांच्या प्रगतीपर चालणाऱ्या चळवळींना उत्तेजन दिले. तसेच त्यांच्यासाठी नोकरी व पदवी अभ्यासक्रमात ३० टक्के आरक्षणाची घोषणा केली.

सहकारी चळवळ हा विषय सर्वच मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्रमांमध्ये अग्रक्रमावर असतो. कारण ग्रामीण विकासाचा सहकार हा पाया आहे. सहकार महामंडळे, पिकांना अनुदान व अर्थसाहाय्य हे त्यांच्या धोरणाचे तीन प्रमुख पैलू आहेत. ह्या चळवळीला उत्तेजन देण्याकरता त्यांनी 'महाराष्ट्र सहकार वित्त व विकास महामंडळ' स्थापन केले. शेतकऱ्यांना कांदा, कापूस, ऊस ह्या पिकांवर अनुदान दिले व ज्यांचे औद्योगिक क्षेत्रात प्रकल्प आहेत त्यांना

अर्थसाहाय्य दिले.

अल्पसंख्यांकांचे प्रश्न ही आज एक मोठी समस्या आहे. तो मतांचा एक गठ्ठा आहे. त्याकरता त्यांच्या प्रश्नांकडे सर्वच राज्यकर्त्यांना व सर्वच राजकीय पक्षांना लक्ष द्यावे लागते. मध्यवर्ती सरकारात अल्पसंख्यांकांकरता एक वेगळे खाते निर्माण केले आहे व बॅ. अंतुले त्या खात्याचे मंत्री आहेत. महाराष्ट्रात विलासरावांनीही त्या दिशेने काही पावले उचलली आहेत. त्यापैकी प्रमुख म्हणजे अल्पसंख्यांक आयोगाची पुनर्स्थापना आणि त्यांच्या प्रगतीसाठी 'अल्पसंख्यांक विकास महामंडळा'ची स्थापना:

विलासरावांना गरीबांबद्दल कळकळ आहे. त्याकरता त्यांचा निवास, संरक्षण, व्यसनमुक्तता, शिक्षण व धान्य पुरवठा ह्याकरता त्यांनी मोहीम सुरू केली आहे. गुटख्याचे होणारे अनिष्ट परिणाम लक्षात घेऊन त्यांनी गुटख्यावर बंदी आणली. गरीबांना व इतरांना शिक्षण सहज उपलब्ध व्हावे म्हणून १०० मीटरवर शाळा स्थापन करण्याचे धोरण आखले. त्यांच्याकरता सार्वजनिक वितरण योजनेतील गहू व तांदुळ ह्यांचे दर कमी केले. झोपडपट्ट्यांचा प्रश्न हा मुंबईतील प्रश्न क्रमांक एक. गुंडांची भीती व झोपडी ताब्यात राहण्याची अशाश्वतता ह्यांमुळे तेथे राहणाऱ्या लोकांची अवस्था अनुकंपनीय असते.

ज्यावेळी विलासराव पुन्हा मुख्यमंत्री झाले त्यावेळी बारबालांसारख्या समाजाच्या दृष्टीने अनिष्ट असणाऱ्या प्रथांवर बंदी आणली गेली. विलासरावांची खरी परीक्षा मुंबई व महाराष्ट्रातील महापुरांच्या काळात झाली. २६ जुलै २००५ रोजी मुंबईत व महाराष्ट्रात महापूर आला. सगळीकडे हाहाःकार झाला. घराघरांत पाणी शिरल्यामुळे लोकांची मालमत्ता वाहून गेली. त्यामुळे गरीबांचे अतोनात नुकसान झाले. अर्थात ह्या दुर्घटनेला मिठी नदीवरील बेकायदेशीर बांधकामे जबाबदार आहेत. ह्यावेळी विलासरावांपुढे दोन प्रश्न होते. एक- पुरात अडकलेल्या लोकांचे पुनर्वसन करणे व दोन - पुन्हा असा प्रकार होणार नाही यासाठी प्रभावी उपाययोजना आखणे. ह्या दोन्ही प्रश्नांच्या बाबतीत त्यांनी प्रत्यक्षात काही पावले टाकलेली आहेत.

महाराष्ट्रात वरील प्रश्नांशिवाय दोन अत्यंत कठीण प्रश्न आहेत. एक - वीज पुरवठा आणि दोन - अनेक गावांत पिण्याच्या पाण्याचा अभाव.

एन्रॉनचा वाद आजही चालूच आहे. महाराष्ट्राच्या विविध भागांतील जनता विजेच्या भारनियमनाने ग्रासली आहे. ज्या प्रमाणात विजेची मागणी वाढली आहे त्या प्रमाणात विजेची

निर्मिती होत नाही. त्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. महाराष्ट्रात ६४०० मेगॅवॅट इतकी वीज निर्मितीची क्षमता आहे. तरी फक्त ४५०० मेगावॅटइतकीच वीजनिर्मिती होते. भारतीय विद्युत कायदा २००३ साली अंमलात आला. एम.एस.ई.बी. ची (महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसिटी बोर्ड) जून २००५ मध्ये पुनर्रचना करण्यात आली. महाराष्ट्रात विजेची निर्मिती आणि वितरण करण्यासाठी विद्युत मंडळाचे विभाजन करून महाराष्ट्र स्टेट पॉवर जनरेशन कंपनी लि. (एम.एस.पी.जी.सी.एल.), महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी ट्रान्समिशन कं. लि. (एम.एस.इ.टी.सी.एल.), महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी डिस्ट्रिब्युशन कं. लि. (एम.एस.इ.डी.सी.एल.) अशा तीन नव्या कंपन्या स्थापन करण्यात आल्या. ह्या तिन्ही कंपन्यांच्या व्यवंस्थापनासाठी एम.एस.ई.बी. ही चौथी कंपनी स्थापन करण्यात आली.* ह्या कंपन्या विजेच्या तुटवड्याचा प्रश्न कसा सोडवतात हे पहायचे.

पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नाचे स्वरूप एवढे मोठे आहे की त्याकरता दूरदृष्टी असलेला राजकारणी पाहिजे. विलासराव ह्या प्रश्नाकडे लक्ष देतील. परंतु त्यांच्या कारकिर्दीतील मोठी अडचण म्हणजे त्यांच्याबद्दल असलेली असूया आणि त्यामुळे सतत भेडसावणारी अस्थिरता. हीच परिस्थिती इतर काही मुख्यमंत्र्यांच्या बाबतीतही होती हेही येथे नमूद केले पाहिजे.

परंतु ते कार्यरत आहेत. परकीय भांडवल महाराष्ट्रात आणण्याकरता त्यांनी एक समिती नेमली आहे. विकासाला गती देण्याकरता 'विशेष आर्थिक क्षेत्र' ( Special Economic Zone - एस. ई. झेड.) स्थापणे गरजेचे असल्यामुळे त्यांनी 'स्पेशल एक्सपोर्ट झोन्स व डेसिग्नेटेड ॲक्ट' नामक एक विशेष कायदा करवून घेतला आहे. विजेचा पुरवठा वाढवण्याकरता त्यांनी महाराष्ट्र इलेक्ट्रिसिटी बोर्डाची वरीलप्रमाणे पुनर्रचना केली. त्याचप्रमाणे मूलभूत सुविधा वाढविण्याकरता भरीव पावले टाकली आहेत.

अर्थात विशेष आर्थिक क्षेत्रांच्या बाबतीत काही वाद आहेत. विशेषतः ज्या क्षेत्रासाठी भूसंपादन करताना घ्यावयाची खबरदारी व ज्यांची जमीन घेतली आहे त्यांचे पुनर्वसन कसे करायचे हे मुख्य प्रश्न आहेत. वे प्रश्न सोडविण्यात शासन कितपत यशस्वी होते ह्यावर ह्या प्रकल्पाचे भवितव्य अवलंबून आहे. **

---

* लोकसत्ता, लोकरंग रविवार दि. ४/२/२००७
** लोकसत्ता, १६ फेब्रुवारी २००७, बुधवार

विलासरावांनी पाटबंधाऱ्यांच्या (इरिगेशन) वाढीकरता अर्थसंकल्पात भरीव तरतूद केली. म्हाडाकडून घराकरता योजना तयार करविल्या.

वरील कार्यक्रमांशिवाय त्यांनी इतर क्षेत्रांतही भरीव पावले टाकलेली आहेत. माहिती हक्काच्या कायद्याची योग्य अंमलबजावणी व्हावी यासाठी त्यांनी 'स्टेट कमिशन फॉर इन्फर्मेशन' ची स्थापना केली. शास्त्रीय व तांत्रिक कार्यक्रमांना गती देण्याकरता त्यांनी 'राजीव गांधी सायन्स अँड टेक्नॉलॉजी कमिशन'ची स्थापना केली. तसेच 'वेस्टर्न फ्री वे लिंक' या प्रकल्पाला गती दिली व टेलिमेडिसनकडे लक्ष दिले.

विलासरावांच्या विरुद्ध टीकेचे मुख्य मुद्दे असे होते की पावसाळ्यात (२००५) त्यांचे धोरण फार गलथानपणाचे होते. त्यांच्या कारकिर्दीत विजेची भयंकर टंचाई झाली आणि ती कमी करण्याकरता त्यांनी कोणतीही भरीव पावले उचलली नाहीत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असताना त्यांनी कंगाल शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष केले. त्यांनी बागाईत शेतकऱ्यांची धन केली आहे. विलासराव देशमुख, सुशीलकुमार शिंदे, सेना भाजप ह्यांनी राज्याच्या डोक्यावर कर्जाचा भार असताना उधळपट्टी केली व राज्याला जास्तच कर्जबाजारी केले. महाराष्ट्रात कोरडवाहू शेतीचे प्रमाण जास्त असताना सुद्धा त्यांनी कोरडवाहू जमिनीचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने कोणतीही भरीव पावले उचलली नाहीत व महाराष्ट्रातील उद्योग तामिलनाडू, कर्नाटक वगैरे प्रदेशांत जात असताना सुद्धा (त्यामुळे महाराष्ट्रातील रोजगारीवर होणारे गंभीर परिणाम दिसत असून देखील) त्याकडे दुर्लक्ष केले. त्यांच्यावर एवढीच टीका झाली नाही तर नियोजन मंडळानेही देशमुखांच्या कारभारवर प्रखर टीका केली आहे आणि एक अयशस्वी शासक म्हणून त्यांची निर्भत्सना केली आहे.

नियोजन मंडळाचे मुख्य आक्षेप असे की विकासाबाबत महाराष्ट्र मागासलेला आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचा दर ८५-८६ ते २०००-२००१ पर्यंत ७.३ टक्के होता. नंतर तो ४.७ टक्क्यांवर आला. मानवी विकास निर्देशांकाच्या यादीत महाराष्ट्र देशात चौथ्या क्रमांकावर आहे. विशेषतः महाराष्ट्रात भ्रष्टाचार फार आहे. लोक मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत. शेती उत्पन्नाला वेग नाही. पाण्याचे नियोजन नाही, गुंडगिरी, ग्रामीण व शहरी बकाल वस्ती, लैंगिक शोषणाचे प्रकार हे आजचे स्थायीभाव आहेत. त्याचप्रमाणे कर्जाची फेड व अनुत्पादक शासकीय खर्च हे प्रश्न भेडसावत आहेत. परकीय गुंतवणुकीबाबत महाराष्ट्राचा नंबर खाली गेला आहे. विकासाचा दर भरीव नाही, तसेच

असमतोलही आहे. बॅकलॉग कमिटीच्या अंदाजाप्रमाणे हा बॅकलॉग जवळजवळ १४०० कोटींचा आहे! जरी महाराष्ट्राचे सरासरी उत्पन्न रु. २५०००/- आहे, तरी कालवे व वीज ह्याबाबत महाराष्ट्रात लक्षणीय तूट आहे.*

वरील सर्व आवाहनांना विलासराव सर्वस्वी जबाबदार आहे असे म्हणता येणार नाही. न बोलून कार्य करण्याची त्यांची पद्धत आहे. त्यांचे योग्य प्रकारे मूल्यमापन होत नाही असाही एक विचार आहे.

**विलासरावांचे व्यक्तिमत्त्व**

विलासरावांचे व्यक्तिमत्त्व प्रसन्न आहे. घराण्याचा खानदानीपणा त्यांच्या डौलदार वागण्यातून दिसून येतो. त्यांना चांगले काम करण्याची उत्कटता आहे. शासकीय कारभारातील अनुभवामुळे राज्याच्या प्रश्नांची त्यांना चांगली जाण आहे. त्यांना माणसाची पारख आहे. निर्णयशक्ती आहे. महाराष्ट्रापुढचे प्रश्नच गंभीर व कठीण आहेत. त्यातून राजकीय हेवेदावे व पक्षीय राजकारणाने महाराष्ट्राला ग्रासले आहे. अशा परिस्थितीत टिकून राहणे ही तारेवरची कसरत आहे. जागा टिकवण्याकरता जाणारा वेळ आणि शक्तीचा ऱ्हास ह्यामुळे भरीव कार्य करणे कठीण आहे. ह्याचे प्रमुख कारण म्हणजे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री हे स्वयंभू नाहीत, त्यांचे अस्तित्त्व श्रेष्ठींच्या मर्जीवर व पक्षीय राजकारणाच्या वाऱ्यावर अवलंबून असते.

राजकीय डावपेचात देशमुख कितपत यशस्वी होतात, पक्षावर ते कितपत पकड मिळवतात, प्रवाही जनहिताच्या कार्यक्रमाच्या जोरावर ते जनप्रवाह कितपत आपल्याकडे कसा फिरवतात ह्यावरच त्यांचे राजकारणातील स्थान व भवितव्य अवलंबून आहे. त्यांच्या जमेची एक बाजू म्हणजे राज्य व राष्ट्रीय पातळीवर त्यांच्या सौहार्दामुळे व प्रसन्न व्यक्तिमत्त्वामुळे त्यांचा लोकसंग्रह प्रचंड आहे. लोकांच्या प्रश्नांची जाण आणि शांत स्वभाव ह्यांमुळे ते नेहमीच प्रकाशात राहतील.

राजू परुळेकर म्हणतात - आमदारांनी त्यांना नेता म्हणून पुन्हा राज्याच्या मुख्यमंत्रिपदी आणले ते त्यांच्या स्वभावातील सुरक्षितता, विश्वासार्हता, दिलदारपणा आणि त्यांचा उमदा दृष्टिकोन पाहूनच. जनसमर्थन आणि पक्षातल्या बहुसंख्य आमदारांचे समर्थनही त्यांना

---

* टीकेचा उल्लेख मी विलासरावांच्या बाबतीतच केला याचे कारण आज राज्यशकट त्यांच्या हातात आहे आणि लोकांची नजर दुर्बिणीतून त्यांच्याकडे आहे! - डॉ. रायरीकर

लाभलेले आहे. अर्थात राजकारण हा बिनभरवशाचा खेळ आहे. राजकीय मुत्सद्देगिरी आणि चातुर्य यांबरोबरच सत्ता टिकवण्याकरता नशिबाचाही आधार लागतो हे त्रिवार सत्य आहे. सुदैवाने इंडिया टुडेने नुकताच मुख्यमंत्र्यांच्या यादीत त्यांना तिसरा क्रमांक दिला असून त्यांच्या कार्याला दिलेली ही पावतीच आहे.

ooo

---


संदर्भग्रंथ :

१) सोपान गाढे - 'श्री. विलासराव देशमुख', जानेवारी २००२, अविष्कार प्रकाशन, पुणे.

२) राजू परुळेकर -'मला भेटलेली माणसे', ऑक्टोबर २००६, नवचैतन्य प्रकाशन, बोरिवली.

३) म. टा. -'महाराष्ट्राच्या आर्थिक अधोगतीची मीमांसा', २१ नोव्हें. २००५, पान ७.

४) टाईम्स ऑफ इंडिया - १०/२/२००६

५) इंडिया टुडे - १२/२/२००७



# २२. श्री. सुशीलकुमार शिंदे

## संयुक्त महाराष्ट्राचे चौदावे मुख्यमंत्री

(१८-१-२००३ ते ३०-१०-२००४)

राजकारण्यांमध्ये सुशीलकुमारजी शिंदे हे एक हसरे व्यक्तिमत्त्व आहे. निरभिमानी, सर्वांशी जवळीक साधणारा असा हा एक नेता आहे. ह्या अर्थाने ते लोकनेते आहेत. अत्यंत गरीब कुटुंबात जन्म घेऊन भारताच्या उपराष्ट्रपतीपदाकरता नामांकन पातळीवर पोहोचणे ह्याचे कारण त्या व्यक्तीत असलेले दुर्मिळ सद्‌गुण. तसे म्हटले तर मुख्यमंत्री म्हणून सुशीलकुमारजींची कारकीर्द थोडीच ठरली.

### जन्म व शिक्षण आणि आयुष्याची घडण

मूळचे उस्मानाबाद जिल्ह्यातील (आता धाराशीव) परांडे गावचे शिंदे घराणे सोलापूरला त्यांच्या आजोबांच्या काळात स्थायिक झाले. सुशीलकुमार हे त्यांच्या आईचे चौथे अपत्य. मूळचे नाव बदलून नाटकात भाग घेताना सुशीलकुमार हे नाव त्यांनी घेतले.

सुशीलकुमारांचा जन्म सप्टेंबर महिन्यात १९४१ साली झाला. लहानपणी त्यांच्या सावत्र आईने त्यांच्यावर चांगले संस्कार केले व त्यांच्यात शिक्षणाची आवड निर्माण केली. त्यांचे बालपण दारिद्र्याशी झगडण्यातच गेले. त्यांना पैशाकरता अनेक उद्योग करावे लागले. आठवीपर्यंत त्यांचे शिक्षण रात्रशाळेतच झाले. त्यांनी काही काळ कोर्टातील शिरस्तेदाराचे शिपाई म्हणून काम केले व त्यावेळी ते बेंचमार्क क्लार्क होते, त्यावेळी त्यांनी ह्या नोकरीचा राजीनामा दिला. सुदैवाने त्यावेळी ते बी.ए. झाले होते. कॉलेजमध्ये असताना त्यांनी कॉलेजच्या विविध कार्यक्रमांत भाग घेतला. त्यांच्या मनात वकील होण्याची महत्त्वाकांक्षा होती. कायद्याचा अभ्यास करताना त्यांनी पुण्याच्या लॉ कॉलेजमध्ये नाव घातले. परंतु त्याचवेळी त्यांची सी.आय.डी. सबइन्स्पेक्टर म्हणून निवड झाली (६ डिसेंबर १९६५). नंतर त्यांनी न्यू लॉ कॉलेजातून (मुंबई) लॉची पदवी मिळविली (१९६९).

**राजकारणात प्रवेश**

१ मे १९७० रोजी त्यांचे उज्जला वैद्य यांच्याशी लग्न झाले. ह्याच काळात त्यांचा शरद पवारांशी परिचय झाला. ह्या तरुणात राजकारणामध्ये प्रवेश करण्यास लागणारे काही गुण आहेत हे शरद पवारांच्या दृष्टीस आले. त्यांनी सुशीलकुमारजींना नोकरीचा राजीनामा देण्यास सांगितले (६ नोव्हें. १९७१) आणि 'काँग्रेस फोरम फॉर सोशालिस्ट ॲक्शन' ह्या संस्थेच्या निमंत्रकपदाची सुत्रे घेण्यास सांगितले. ही त्यांच्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात असे म्हणावयास हरकत नाही.

**विधिमंडळात प्रवेश**

सुशीलकुमारजींची विधिमंडळाची कारकीर्द १९७३ पासून सुरू झाली. कारण १९७२ साली काँग्रेसकडून त्यांना तिकीट मिळाले नाही. वकिली चांगली चालत असताना सुद्धा त्यांनी विधिमंडळात जाण्याचे ठरविले. १९७३ साली त्यांना सोलापूर मतदार संघातून तिकीट मिळाले आणि ते प्रचंड बहुमताने निवडून आले. त्यावेळी वसंतराव नाईकांचे मंत्रिमंडळ होते. नाईकांनी त्यांना राज्यमंत्री म्हणून नेमले (९ नोव्हेंबर १९७३). जवळजवळ १९७३ पासून आजतागायत ते मंत्री आहेत.

शंकरराव चव्हाणांच्या मंत्रिमंडळात ते कॅबिनेट मंत्री झाले (२०/२/१९७५). त्यावेळी त्यांच्याकडे सहा खाती होती. समाजकल्याण, युवकसेवा, खेळ, सांस्कृतिक कार्य, पशुसंवर्धन व दुग्धविकास ही ती खाती. ह्या काळात त्यांनी साहित्यिकांना आणि कलावंतांना खूप मदत केली. गरीब लेखक व कलावंत ह्यांना त्यांनी मानधन सुरू केले. तमाशासारख्या कलेला उत्तेजन देण्याकरता तमाशा उत्सव भरविले. कोल्हापुरात चित्रनगरी स्थापन करण्यात पुढाकार घेतला. इंदिरा गांधींच्या वीस कलमी कार्यक्रमाच्या त्यांनी अनेक गोष्टी कार्यरत केल्या. उदा., हुंडा विरोधी मोहीम.

त्यानंतर आणीबाणी आली. शंकरराव चव्हाणांच्या मंत्रिमंडळाला जावे लागले. शंकररावांच्या जागी वसंतदादा पाटील मुख्यमंत्री झाले. वसंतदादांनी शिंद्यांकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण ही खाती सुपूर्द केली. आरोग्यमंत्री असताना त्यानी ग्रामीण लोकांकरता वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिल्या. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या जागा वाढविल्या. सोलापूर येथील वैद्यकीय महाविद्यालयाला भरीव मदत केली. १९७४ साली शासनाने हे महाविद्यालय ताब्यात घेतले. तेथील खाटा आणि कर्मचारी ह्यांची संख्या

वाढविली. बाह्यरुग्ण विभाग सुरू केला. १९७६ सालच्या चंद्रभागेच्या पुराच्या वेळी त्यांनी लोकांना खूप मदत केली.

वसंतदादांना काटशह देऊन शरद पवार ह्यांनी लोकशाही आघाडीचे सरकार स्थापन केले (१८ जुलै १९७८). शिंद्यांनी पवारांशी हातमिळवणी केली. ते पवारांच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट दर्जाचे मंत्री झाले. त्यांच्याकडे कामगार, पर्यटन ही खाती होती. ह्यावेळी ते आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेला हजर राहिले. कामगारमंत्री असताना त्यांनी आजारी गिरण्यांचे पुनर्वसन करण्याचा प्रयत्न केला. काही धंद्यांमधील किमान वेतन निश्चित करण्याकरता समित्या नेमल्या, तर सामोपचाराने तंटे सोडविण्याकरता कामगार-मालक संघटनांचे मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. गुणवंत कामगारांना पुरस्कार देण्याचा प्रघात पाडला.

जनता सरकार केंद्रात फार काळ टिकले नाही. एप्रिल १९८० ह्या महिन्यात ते पडले. महाराष्ट्रात पुरोगामी आघाडीचे सरकारही पडले. अंतुले मुख्यमंत्री झाले व शरद पवार विरोधी नेते. परंतु सुशीलकुमारजी हे पुरोगामी सरकारात सामील झालेले असल्यामुळे त्यांना काही काळ सत्तेबाहेर राहावे लागले.

प्रतिभा प्रतिष्ठानच्या भानगडीत अडकल्यामुळे अंतुल्यांना राजीनामा द्यावा लागला (२०/१/१९८२) आणि २१/१/१९८२ रोजी बाबासाहेब भोसले मुख्यमंत्री झाले. बाबासाहेबांना १/२/८३ रोजी राजीनामा द्यावा लागला व वसंतदादा पाटील हे पुन्हा मुख्यमंत्री झाले. दादांची मुख्यमंत्री होण्याची ही तिसरी खेप. दादांना सुशीलकुमारांचा कॅबिनेट मंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश केला. इतकेच नव्हे तर अर्थ व नियोजन ह्यांसारखी महत्त्वाची खाती त्यांच्याकडे सोपविली.

अर्थमंत्री असताना त्यांच्यापुढे वाढती महागाई, अंदाजपत्रकात वाढणारी तूट आणि महाराष्ट्रातील दुष्काळ ह्या तीन समस्या होत्या. ह्याच काळात त्यांनी १०० कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना मान्य करून घेतली व सोलापूर शहराची उजनीच्या पाणीपुरवठ्याने सोय केली.

यानंतरची अतिशय दुर्दैवी घटना म्हणजे ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी इंदिराजींची झालेली हत्या. निवडणुका झाल्या व सुशीलकुमार उत्तर सोलापूर मतदारसंघातून निवडून आले. ते कॅबिनेट मंत्री झाले (१०/३/१९८५). वसंतदादा त्यावेळी मुख्यमंत्री होते. सुशीलकुमारांकडे अर्थ, नियोजन, सांस्कृतिक कार्य, क्रीडा, युवककल्याण, कायदा-न्याय

अशी अत्यंत महत्त्वाची खाती होती. दुर्दैवाने २/६/१९८५ रोजी वसंतदादांना राजीनामा द्यावा लागला. शिवाजीराव पाटील निलंगेकर मुख्यमंत्री झाले. नेहमीप्रमाणे सुशीलकुमारांकडे अर्थ व नियोजन, पर्यावरण ही खाती आली. परंतु शिवाजीरावांनाही मुख्यमंत्रिपद फार काळ लाभले नाही. मुलीच्या एम.डी. परिक्षेतीत मार्कांची फेरफार करण्याच्या प्रकरणात त्यांना व राज्यपाल कोना प्रभाकर राव ह्यांना राजीनामे द्यावे लागले. निलंगेकरांच्या जागी शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री झाले (१४/३/१९८६). सुशीलकुमारांकडे अर्थखाते आले. त्यांनी महाराष्ट्रात पहिला 'शून्याधारित' अर्थसंकल्प मांडला. परंतु विरोधामुळे हा प्रयत्न पुढे सोडावा लागला. १९८० ते १९८७ ह्या काळात सुशीलकुमारांनी सात वेळा अर्थसंकल्प मांडला.

शंकरराव चव्हाणांना २४जून १९८८ रोजी राजीनामा द्यावा लागला व पवारांची पक्षनेते व मुख्यमंत्री म्हणून निवड झाली. सुशीलकुमारांकडे पुन्हा अर्थखाते आले आणि १९/३/१९८९ रोजी त्यांना नववा अर्थसंकल्प मांडला. याचवेळी त्यांना दामाणी पुरस्कार मिळाला. १९९० च्या जानेवारीत सार्वत्रिक निवडणूक होऊन पवारांचे मंत्रिमंडळ स्थापन झाले (४/३/१९९०). ह्यावेळी सुशीलकुमारांकडे नगरविकास, विधी व न्याय खाते ह्यांची जबाबदारी सोपविली.

**पक्षकार्य**

त्यांच्या पक्षकार्याची खरी सुरुवात १९९० साली झाली. महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून १६/६/१९९० रोजी त्यांची निवड झाली. पुढे ते नरसिंह रावांच्या मुळे अखिल भारतीय काँग्रेसचे सरचिटणीस झाले. त्यावेळी त्यांचे संघटनाकौशल्य दिसून आले. काँग्रेस कमिटीचे महासचिव म्हणून पुन्हा त्यांची निवड २७/२/१९९८ रोजी झाली. त्यानंतर १९९८ साली ते लोकसभेवर निवडून आले.

**पक्षकार्यातून राजकारणाकडे**

१८/१/२००३ रोजी सुशीलकुमारजी मुख्यमंत्री झाले. मुख्यमंत्रिपदाच्या अल्पकाळात त्यांनी बरेच कार्य केले. रोजगारवाढीला उत्तेजन दिले. पाण्याच्या पुरवठ्याकरता ग्रामीण भागात टँकर सर्व्हिस सुरू केली. जनावरांकरता छावण्या टाकल्या. वीजचोरी रोखण्याकरता स्वतंत्र न्यायालये उघडली. अंधश्रद्धेविरुद्ध जनमत जागृत करण्यात पुढाकार घेतला व त्याबाबत कायदा करण्याचे सुचविले. इ. पाचवी ते ८ वी पर्यंत मोफत शिक्षण देण्याची योजना सुरू केली. विद्यार्थ्यांकरता अपघात विमा सुरू केला.

मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांना तीनच महिन्यात अर्थसंकल्प तयार करावा लागला. परंतु ह्या अशा अठरा महिन्यांच्या कारकिर्दीत त्यांनी तळागाळातील लोकांसाठी ६०० कोटींची तरतूद केली. दोन आयोग स्थापन केले. एक अनुसूचित जातींकरता व दुसरा बालहक्क आयोग. ह्या आयोगाचे मुख्य कार्य म्हणजे अनाथ, आदिवासी, उपेक्षित मुलांच्या हक्कांचे संरक्षण करणे हा होता. शेतकरी समृद्धी योजना, महिला संरक्षण योजना ह्या कार्यान्वित केल्या. हातमाग व यंत्रमाग मजुरांकरता स्वतंत्र प्राधिकरण स्थापले. इंदिरा गांधी महिला संरक्षण योजनेखाली महिलांना त्यांच्या हक्काचे संरक्षण करण्याकरता यंत्रणा उभी केली. मागासवर्गीय महामंडळाची पुनर्रचना केली. याचवेळी सोलापूर विद्यापीठाची घोषणा केली. गरीब विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणाकरता जाण्यास मदत देऊ केली. नोकरीत अनुसूचित जाती व जमातींचा बॅकलॉग कमी करण्याचा प्रयत्न केला.

अल्पकाळ मुख्यमंत्री असल्यामुळे त्यांना फारसे कार्य करता आले नाही. तरीपण त्यांनी सोलापूर करता बऱ्याच गोष्टी केल्या. तुळजापूर-सोलापूर रस्त्यावरील हलगर गावात आश्रमशाळा सुरू केली. सोलापूर जिल्ह्यातही त्यांनी अनेक प्रकल्प राबविले. सिव्हिल हॉस्पिटलचा विस्तार केला. कामगार विमा रुग्णालय स्थापले. विमानतळ, आकाशवाणी केंद्र, नाट्यगृह, सोलापूर-पुणे रस्त्यावर कोंडी ते चिंचोळी ह्या पट्ट्यात औद्योगिक वसाहतीची उभारणी, शेठ वालचंद हिराचंद कॉलेजचा विस्तार, सोलापूर शहराच्या हद्दीत वाढ, स्मशानभूमीचा कायापालट, सावळेश्वर ओढ्यावर पूल इ. अनेक गोष्टी त्यांनी कार्यान्वित केल्या. ह्याशिवाय सोलापुरात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दूरध्वनी सेवा उपलब्ध करून दिली. सोलापूरच्या पाण्याचा प्रश्न सोडवला. सोलापूर ते पाकणी रेल्वे दुहेरीकरण मार्गी लावले.

महाराष्ट्रात मराठेतर मुख्यमंत्री होण्याचा मान त्यांनी मिळविला. अर्थात दलित म्हणून नव्हे, तर सर्वमान्य नेता म्हणून. दलित समाजात जन्म घेऊनही त्यांनी नेहमी जनरल जागेतूनच निवडणूक लढविली. ते नेहमी म्हणतात की 'मी राखीव संघातला, पण खुल्या मतदार संघाने माझा स्वीकार केला! माझे नाते मतदाराशी, जनतेशी, यंत्रणेशी आणि प्रशासनाशी जिव्हाळ्याचे आहे.'

पक्षीय राजकारणामुळे त्यांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला व ते आंध्र प्रांताचे राज्यपाल झाले. परंतु राजभवनाबद्दल त्यांच्या कल्पना रम्य होत्या. त्याबाबत ते म्हणतात, ''हैद्राबाद भवनाचा रस्ता गरीबाच्या झोपडीकडे गेल्यास व मी त्यांच्यासाठी काही केल्यास

मला आनंद होईल. '' राजभवन हे प्रजाभवन व्हावे ही त्यांची इच्छा. (लोकमत ३०/१२/२००५, पृष्ठ ९). ते लोकप्रिय राज्यपाल झाले. मध्यंतरी त्यांचे नाव उपराष्ट्रपतीपदाकरता सुचविले होते.

**केंद्रीय मंत्री**

आंध्रच्या राज्यपालपदात त्यांचे मन रमले नाही. त्यांची त्यानंतर केंद्रीय मंत्रिमंडळात वीजमंत्री म्हणून नेमणूक झाली. ही नेमणूक ते मागासवर्गीय आहेत म्हणून नव्हे, तर त्यांच्या कार्यक्षमतेच्या जोरावर. वीजमंत्री झाल्यावर विजेची चोरी रोखण्याकरता व विजेचे उत्पादन वाढवण्याकरता त्यांनी अनेक योजना आखल्या. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे केवळ तात्पुरते उपाय करून विजेचा प्रश्न सुटणार नाही, तर त्याकरता उर्जानिर्मिती क्षेत्राची पुनर्रचना केली पाहिजे व वीजगळती, चोरी थांबवली पाहिजे.

**मूल्यमापन**

सुशीलकुमारजींनी अनेक मानाची पदे भूषविली व ते सुद्धा एका गरीब कुटुंबात जन्म झालेला असताना. ते महाराष्ट्रात कॅबिनेट मंत्री व मुख्यमंत्री होते. काँग्रेसचे सरचिटणीस होते. आंध्रचे राज्यपाल झाले. लोकसभेचे सदस्य व केंद्रात कॅबिनेट दर्जाचे मंत्री झाले. त्यांचे नाव उपराष्ट्रपतीपदासाठी सूचित केले गेले होते. ह्या सर्वांकडे पाहण्याच्या त्यांचा एक दृष्टिकोन आहे. तो असा - 'सत्ता असली तरी आनंद आहे, नसली तरी दुःख नाही. मी गरीबांची आठवण विसरणार नाही.' (लोकमत, मंथन - पान ८, रविवार दि. ४/९/२००५). डॉ. मेहेंदळे म्हणतात, ''त्यांचे व्यक्तिमत्त्व उमदे, देखणे व हसतमुख आहे. त्यांचा जनसंपर्क मोठा. चपराशापासून चढत जाऊन ते नामदार झालेले आहेत. काँग्रेसशी निष्ठा हे त्यांचे एक शक्तिस्थान आहे. त्यांनी सातत्याने स्वतःच्या गरिबीची जाणीव ठेवून दुर्बल व गरिबांकरता अनेक योजना आखल्या. मोठेपणाने त्यांचा तोल सुटला नाही. ते एक अभ्यासू राजकारणी आहेत. राजकारण हा समाजपरिवर्तनाचा मूलमंत्र मानणारे ते एक बुद्धिजीवी योगी आहेत. राजकारण हा समाजधर्म बनविल्यामुळे खऱ्या अर्थाने ते सर्वधर्म समभावी, धर्मनिरपेक्षतावादी नेते आहेत. त्यांनी जातीचे भांडवल केले नाही. सत्तेची पीठे निर्माण केली नाहीत. ''(डॉ. विश्वास मेहेंदळे, 'मला भेटलेली माणसे').

त्यांची प्रतिमा जनमानसात उजळून निघाली ह्याची कारणे त्यांची मनाची प्रसन्नता, सतत हसतमुख चेहरा, गरिबांविषयी सहानुभूती, रसिकता, वांङमयप्रेम, हौशी वाचक,

समाजसेवक ही ठाम भूमिका आणि प्रेमळ, आपुलकीचा स्वभाव ही होत.

सुशीलकुमारांच्या पुढे उज्ज्वल भविष्यकाळ आहे. कारण लोक म्हणतात की तो त्यांच्या पत्नीच्या नावातच आहे! त्यांचे अनेकविध गुण, समजूतदारपणा, लोकसंग्रहाची हौस, हेव्यादाव्यांपासून अलिप्त, गरिबांविषयी कळकळ हे त्यांचे भांडवल असून त्यांच्या जोरावर आज जे यश कोणाही व्यक्तीला लाभले नाही ते सुशीलकुमारांच्या आवाक्याबाहेरचे नाही.

ooo

---


संदर्भग्रंथ :

१) काळे पांडुरंग -'जीवनपट सुशीलकुमार शिंदे', सुविधा प्रकाशन, गंगा निवास, सोलापूर.

२) अनिल थत्ते -'संध्यानंद', २४/११/२००५, पान ८.

३) मराठे ह. मो. -'एक माणूस एक दिवस - सुशीलकुमार शिंदे', पृष्ठे २४५-२६८.

४) विश्वास मेहेंदळे -'मला भेटलेली माणसे', १९९५, सिग्नेट पब्लिकेशन्स.

५) मधुकर भावे -'लोकमत - मंथन', ४/९/२००५, पृ. ८.

६) राजू परुळेकर -'माणसे भेटलेली व न भेटलेली - श्री. सुशीलकुमारजी शिंदे', नवचैतन्य प्रकाशन, बोरिवली (प), मुंबई ४०० ०९२.

७) रणदिवे विठ्ठल - आत्मचिकित्सा प्रारब्धाचे नीलमणी - सुशीलकुमार शिंदे १७.२.२००३, जाईजुई प्रकाशन, जम्माचाळ, भवानी पेठ, सोलापूर


---

टीप : श्री. सुशीलकुमार शिंदे कामगार मंत्री असताना त्यांनी माझी नेमणूक बिडी कामगारांच्या किमान वेतन समितीवर दोन वर्षांकरता सदस्य म्हणून केली होती. - डॉ. रायरीकर

# २३. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री

### मुख्यमंत्रिपदाचा काळ

१९६० नंतर महाराष्ट्रात चौदा मुख्यमंत्री झाले. १९६० ते २००६ ह्या सेहेचाळीस वर्षांच्या काळात मुख्यमंत्रिपद एका व्यक्तीकडे सरासरीने तीन वर्षे राहिले. ह्याला अपवाद अर्थातच यशवंतराव चव्हाण. कारण त्यांना केंद्रीय मंत्रिमंडळात मंत्री म्हणून जावे लागले. ते २ वर्षे ६ महिने मुख्यमंत्री होते. त्याआधी १९५६ ते १९६० पर्यंत ते द्विभाषिकाचे मुख्यमंत्री होते. तीन वर्षे व त्यापेक्षा जास्त काळ टिकणारे (३ वर्षे, ३ महिने) दुसरे मुख्यमंत्री म्हणजे विलासराव देशमुख. ह्याबाबत विक्रम करणारे मुख्यमंत्री म्हणजे वसंतराव नाईक (सव्वा अकरा वर्षे). बिगर काँग्रेस मुख्यमंत्री म्हणून मनोहर जोशी ह्यांनी ३ वर्षे १० महिने हे पद भूषविले.

मुख्यमंत्रिपदात इतक्या सातत्याने बदल होण्याचे कारण काय असा प्रश्न निर्माण होतो. त्याचे सोपे उत्तर हे की मुख्यमंत्री होणारी माणसे (अपवाद यशवंतराव आणि शरद पवार) ही स्वयंभू आणि स्वयंसिद्ध नव्हती. त्यांची कर्तबगारी जेमतेम होती. त्यांच्या पुढारीपणाची पाळेमुळे फार खोलवर नव्हती. ते श्रेष्ठी व नेहरू घराण्याची कृपा ह्या भांडवलावर मुख्यमंत्री झाले व ज्यावेळी ह्या भांडवलाचे अवमूल्यन झाले त्यावेळी त्यांना ह्या पदाचा त्याग करावा लागला आणि कोणाही सामान्य माणसाने नकाश्रु गाळले नाहीत. नाईक टिकले कारण उगवता सूर्य कोणता हे त्यांनी पूर्णपणे हेरले होते. म्हणूनच गांधी घराण्याशी त्यांनी जवळीक राखली, निष्ठा वाहिल्या, सेवा केली आणि हाजीहाजी केली. म्हणूनच ते ११ वर्षे मुख्यमंत्री राहू शकले. अर्थात मुख्यमंत्र्यांची निवड पक्षश्रेष्ठींकडूनच होते, परंतु पक्षश्रेष्ठींच्या खांद्याला खांदा लावून कार्य करणारे नेते राज्यात असले तर श्रेष्ठींनाही त्यांची जाण ठेवावी लागते. श्री. बी. सी. रॉय, गोविंद वल्लभ पंत, कामराज वगैरे. हे नेते स्वयंभू होते. त्यांची राज्यातील लोकमतावर पकड होती आणि म्हणूनच श्रेष्ठींना त्यांच्या अस्तित्त्वाची दखल घ्यावी लागली. आता ही परिस्थिती पालटली असून ह्यांची परिस्थिती खरे पाहता शिमग्याच्या वाघासारखी आहे.

### महाराष्ट्रात स्त्री-मुख्यमंत्री झाला नाही

महाराष्ट्रातील स्त्री राज्यपाल झाली, परंतु ती सुद्धा एकमेव प्रतिभा पाटील. स्त्रियांना महाराष्ट्रात मंत्री होण्याची संधी मिळाली. मात्र मुख्यमंत्री वा उपमुख्यमंत्री होण्याची संधी

मिळाली नाही. इतर राज्यांत स्त्रिया मुख्यमंत्री होऊ शकल्या. उदाहरणार्थ, यु.पी.मध्ये श्रीमती कृपलानी आणि मायावती, मद्रासमध्ये जयललिता, बिहारमध्ये राबडीदेवी. अर्थात राबडीदेवी ह्या लालूंमुळे नामधारी मुख्यमंत्री झाल्या. ह्या सर्व स्त्रिया काँग्रेस पक्षाच्या सदस्य नव्हत्या. अपवाद म्हणजे काँग्रेसमधील शीला दीक्षित. त्या दिल्लीच्या मुख्यमंत्री आहेत. म्हणजे बहुसंख्य स्त्री मुख्यमंत्री ह्या बिगर काँग्रेसी आहेत व श्रीमती राबडीदेवींचा अपवाद सोडता उच्चशिक्षित आहेत. तसे म्हटले तर महाराष्ट्र हे प्रगतिशील व पुढारलेले राज्य आहे. शिक्षण, बँका, म्युनिसिपालट्या, आय.ए.एस. ह्यांत अनेक स्त्रियांनी उच्च स्थान मिळविले आहे. असे असताना राजकारणातील मुख्य पीठापासून त्या का वंचित राहिल्या हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. थोडक्यात ती कारणे अशी असू शकतील -

सत्तेच्या शक्तीस्थानावर, उदा. - साखर कारखाने, कापूस बाजार, सहकारी क्रेडिट संस्था ह्यांवर कोणाही स्त्रीचे प्रभुत्व नाही. ह्याच लोकमतावर कब्जा मिळविण्याच्या प्रमुख किल्ल्या आहेत. त्याचबरोबर महाराष्ट्रातील व विशेषतः राजकीय दृष्ट्या प्रभावी असलेल्या जातींत स्त्रियांविषयी एक वैचारिक घाट आहे. तो म्हणजे त्यांनी जनसंपर्कात फार येता कामा नये. कदाचित त्यामुळेच कोणीही स्त्री अद्यापपावेतो मुख्यमंत्री झालेली नाही.

### मुख्यमंत्री व त्यांच्या जाती

आपण कितीही धर्मनिरपेक्ष वा जातनिरपेक्ष समाजाचे प्रतिपादन केले तरी राजकारणात एवंच आपल्या कोठल्याच क्षेत्रात स्वजात-परजात ही वैचारिक धारणा अजून मागे पडलेली नाही. जर त्रिभाषिक महाराष्ट्रापासून सुरुवात केली तर अंतुले (मुस्लीम), सुशीलकुमारजी (दलित), बाळासाहेब खेर व मनोहर जोशी (ब्राह्मण) आणि वसंतराव नाईक व सुधाकर नाईक (बंजारा) ह्या बिगर-मराठा जातीच्या व्यक्ती मुख्यमंत्री झाल्या. मोरारजी (गुजराथी) व कन्नमवार (तेलगू) हे अन्य भाषिक मुख्यमंत्री झाले. पारशी समाजातून धनजी शा. कूपर हे एकच मुख्यमंत्री झाले. बाकीचे आठजण मराठा जातीतील आहेत. त्यातील शिवाजीराव पाटील निलंगेकर, विलासराव देशमुख, व शंकरराव चव्हाण हे मराठवाड्यातील तर बाकीचे पाच पश्चिम महाराष्ट्रातील आहेत. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, शरद पवार, बाबासाहेब भोसले आणि नारायण राणे हे ते पाच.

### विभागवार वाटणी

मुख्यमंत्र्यांची विभागवार वर्गवारी केली तर असे दिसते की ह्या चौदा मुख्यमंत्र्यांपैकी

कोकणातले तीन (नारायण राणे, मनोहर जोशी आणि अंतुले), विदर्भातले तीन (वसंतराव नाईक, सुधाकरराव नाईक आणि कन्नमवार), मराठवाड्यातील तीन ( शंकरराव चव्हाण, शिवाजीराव निलंगेकर पाटील आणि विलासराव देशमुख) आणि पाच पश्चिम महाराष्ट्रातील आहेत (यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, शरद पवार, बाबासाहेब भोसले आणि सुशीलकुमार शिंदे).

वरील विवेचनावरून असे दिसते की एकूण मुख्यमंत्रिपदाच्या जागेवर मराठ्यांचे वर्चस्व आहे. ह्याचे कारण असे असू शकेल की ते महाराष्ट्रात बहुसंख्य मराठा समाज असून कळीच्या क्षेत्रांत त्यांचे नेतृत्व मान्य झालेले आहे. तिसरे कारण असेही असू शकेल की श्रेष्ठींच्या विचारधारेप्रमाणे महाराष्ट्रात मराठा मुख्यमंत्रीच टिकू शकेल व त्याला जनादेश मिळणे सोपे जाईल.

विभागवार वर्गवारी पाहिली तर एकाच विभागाचे पूर्ण वर्चस्व आहे असे म्हणता येणार नाही. पश्चिम महाराष्ट्रात कोकण धरले तर एकूण आठ मुख्यमंत्री झाले. ह्याचा अर्थ असा नव्हे की श्रेष्ठींनी जाणीवपूर्वक समतोल वाटणी केलेली आहे. जे श्रेष्ठींच्या जवळ आहेत, जे त्यांच्या म्हणण्यापुढे मान झुकवतील अशांनाच श्रेष्ठींनी नेतृत्त्व दिलेले आहे आणि ही परंपरा अशीच पुढे चालू राहणार आहे. कारण परस्परांतील हेवेदावे, पक्षादेश, स्वतःच्या बळावर उच्च स्थान मिळविणाऱ्या नेत्यांची वाण. जोपर्यंत वरिष्ठ पदाची नेमणूक श्रेष्ठींच्या कृपाप्रसादावर अवलंबून आहे तोपर्यंत अमुकच जातीतील, अमुक प्रदेशातील मुख्यमंत्री येईल असे सांगता येत नाही. नांदेड ते सोलापूर व सोलापूर ते नांदेड असे बदल श्रेष्ठींच्या मर्जीप्रमाणे सहज होऊ शकतात.

### मुख्यमंत्र्यांचे शिक्षण

महाराष्ट्रातील सर्वच मंत्री उच्चशिक्षित आहेत. ह्याला अपवाद कन्नमवार व वसंतदादा पाटील. ह्या दोघांचे प्रापंचिक जबाबदारी व गरीबी ह्यामुळे शिक्षण होऊ शकले नाही. अर्थात त्यामुळे राज्यकारभाराला काहीही बाध आला नाही. इतरांचे शिक्षण होण्याचे कारण ते त्यांना परवडणारे होते. तर यशवंतराव चव्हाण, अंतुले ह्यांच्या पालकांनी शिक्षणाचे महत्त्व जाणले होते. तर काही महात्मा फुले व भाऊराव पाटील ह्यांच्या परंपरेत वाढले होते.

### मुख्यमंत्री होण्याआधीचा राज्यकारभाराचा अनुभव

बाळासाहेब खेर, धनजी शा. कूपर, मनोहर जोशी हे मुख्यमंत्री सोडले तर इतरांना मंत्री

वा उपमंत्री म्हणून अनुभव होता. तसे पाहिले तर मनोहर जोशी व कूपर ह्यांनाही स्थानिक स्वराज्य संस्थेतील कारभाराचा अनुभव होता. बाळासाहेब खेर व कूपर ह्यांना असा अनुभव नव्हता याचे कारण त्यांच्या नेमणुकीपासूनच हे पद व मंत्रिपदे अस्तित्त्वात आली (१९३७). नारायण राणे, मनोहर जोशी व कूपर हे मुख्यमंत्री सोडले तर बाकीचे मुख्यमंत्री काँग्रेसचे होते. शरद पवार हे काँग्रेसचेही मुख्यमंत्री होते व त्याआधी ते काही काळ पुरोगामी आघाडीचे मुख्यमंत्री होते.

### पक्षनिहाय मुख्यमंत्री

मनोहर जोशी आणि नारायण राणे हे शिवसेनेचे मुख्यमंत्री होते (युतीचे). शरद पवार हे काही काळ पुरोगामी गटाचे मुख्यमंत्री होते. बाकीचे सर्वजण काँग्रेसचे मुख्यमंत्री होते.

### मुख्यमंत्रिपदाचा काळ

महाराष्ट्रातील मुख्यमंत्र्यांच्या कारकिर्दीचा काळ बघितला तर असे दिसते की थोड्या काळापुरता का होईना, एक एक व्यक्ती दोन दोनदा वा चार चारदा मुख्यमंत्री होत्या. बाळासाहेब खेर, यशवंतराव चव्हाण, शंकरराव चव्हाण आणि विलासराव देशमुख हे दोनदा मुख्यमंत्री झाले तर शरद पवार, वसंतदादा पाटील हे चारदा मुख्यमंत्री झाले. सुशीलकुमार शिंदे, नारायण राणे, मनोहर जोशी, सुधाकरराव नाईक, वसंतराव नाईक, अंतुले, कन्नमवार, शिवाजीराव पाटील निलंगेकर, कूपर, मोरारजी देसाई हे एकेकदाच मुख्यमंत्री झाले. एकापेक्षा जास्त मुख्यमंत्रिपदाची संधी मिळविणारे काँग्रेस पक्षाचे आहेत. ह्याला थोडासा अपवाद शरद पवारांचा. काही काळ ते पुरोगामी आघाडीत होते.

### मुख्यमंत्र्यांच्या निर्गमनाचे कारण

मुख्यमंत्र्यांना कोणत्या कारणांमुळे जावे लागले हे पाहण्यासारखे आहे. दोन मुख्यमंत्र्यांना न्यायालयाच्या निकालामुळे राजीनामा द्यावा लागला. अंतुले हे प्रतिभा प्रतिष्ठानचे बळी ठरले तर शिवाजीराव निलंगेकर पाटील ह्यांना मुलीच्या परीक्षेच्या निकालात अवैध हस्तक्षेप करण्याच्या आरोपामुळे जावे लागले. स्वतःहून राजीनामा देणारे मुख्यमंत्री एकच आणि ते म्हणजे बाळासाहेब खेर. त्यांनी प्रकृतिअस्वास्थ्यामुळे राजीनामा दिला. बहुमत असलेल्या पक्षाने म्हणजे काँग्रेसने अधिकार स्वीकार करण्याचे ठरविल्यामुळे कूपर ह्यांना जावे लागले. राणे ह्यांना त्यांच्या पक्षाला बहुमत न मिळाल्यामुळे जावे लागले तर शरद पवारांना ते मुख्यमंत्री असताना मध्यवर्ती सरकारने मंत्रिमंडळ बरखात केल्यामुळे जावे लागले

व एकवेळ त्यांना मध्यवर्ती सरकारमध्ये संरक्षणमंत्रिपद घ्यावे लागल्यामुळे जावे लागले. परंतु शिवसेनेचे मनोहर जोशी आणि काँग्रेसच्या इतर नऊ जणांना पक्षादेशामुळे राजीनामा द्यावा लागला. ह्याचाच अर्थ असा की मुख्यमंत्रिपद हे श्रेष्ठींच्या दयेवर किंवा लहरींवर अवलंबून असते. त्या व्यक्तीच्या कार्यक्षमतेवर नाही.

### राष्ट्रपती राजवट

१९६० पासूनच्या काळापासून आजतागायत महाराष्ट्रात एकदाच राष्ट्रपती राजवट आली, ती म्हणजे फेब्रुवारी १९८० ते जून १९८०. त्याचे कारण इंदिरा गांधींनी शरद पवारांचे मंत्रिमंडळ बरखास्त केले होते.

### विभागवार मुख्यमंत्रिपदाचा काळ

विदर्भातील मुख्यमंत्री १५ वर्षे होते. मराठवाड्यातील १३ वर्षे तर पश्चिम महाराष्ट्रातील व्यक्ती १९ वर्षे मुख्यमंत्रिपदावर होत्या. पश्चिम महाराष्ट्रातील मुख्यमंत्र्यांत तीन कोकणातील होते.

### मुख्यमंत्र्यांचे वयोमान

सर्वसाधारणपणे मुख्यमंत्रिपद स्वीकारताना त्या व्यक्तीचे वय ४५ ते ५० च्या दरम्यान होते. अतिशय वृद्ध माणसाला महाराष्ट्राचा मुख्यमंत्री होण्याचे भाग्य लाभले नाही. उत्तरांचलचे मुख्यमंत्री श्री. एन. डी. तिवारी आज ८१ वर्षांचे आहेत. मुख्यमंत्रिपदावर तरूण मंडळी येण्याचे कारण असे की जुन्या पिढीतील जाणकार व्यक्तींना मध्यवर्ती सरकारमध्ये मंत्र्याचे स्थान मिळाले किंवा त्यांच्याकडे संघटनात्मक कामगिरी सोपवली गेली. काहींनी महात्मा गांधी ह्यांच्या विधायक कार्याला वाहून घेतले.

मध्यवर्ती सरकारात कॅबिनेट दर्जाच्या मंत्री होणाऱ्या व्यक्ती म्हणजे यशवंतराव चव्हाण, अंतुले, शरद पवार, शंकरराव चव्हाण आणि सुशीलकुमार शिंदे ह्या होत.

ह्या संदर्भात एक गोष्ट सांगण्यासारखी आहे. ती अशी की १९५६ साली 'सचिवालय' सध्याच्या नवीन वास्तूत आले. त्यावेळी ते एल्फिस्टन महाविद्यालयाच्या वास्तूत होते. आता सचिवालयाला मंत्रालय म्हणतात. अंतुले मुख्यमंत्री असताना काही कार्यालये नव्या मुंबईत गेली.

वर निर्देश केलेल्या मुख्यमंत्र्यांपैकी कूपर, बाळासाहेब खेर, मोरारजी देसाई, यशवंतराव

चव्हाण, कन्नमवार, वसंतदादा पाटील, सुधाकरराव नाईक, वसंतराव नाईक आणि शंकरराव चव्हाण असे नऊ मुख्यमंत्री वयाच्या साठीनंतर मृत्यू पावले.

०००

---

संदर्भ :

१) प्रकाश अकोलकर - 'यशवंतराव ते विलासराव', दीपलक्ष्मी दिवाळी अंक, २००६.

२) लोकसत्ता, लोकरंग - रविवार २९/१०/२००६, पृष्ठ ५.

# २४. मुख्यमंत्री व त्यांचे विकासात योगदान

एकमुखी राज्यकारभाराला जरी कॉंग्रेसने प्रांतिक स्वायत्ततेच्या काळात अधिकार स्वीकारण्यापासून सुरुवात झाली असली तरी प्रांतिक स्वायत्ततेच्या काळात नियोजन व विकास ह्यांचे स्वरूप स्पष्ट नव्हते. खरी सत्ता तर ब्रिटिशांकडेच होती. मंत्रिमंडळ हे नामधारी होते. १९४७ साली जरी स्वातंत्र्य मिळाले तरी १९४६-१९५० हा काळ युद्धामुळे निर्माण झालेल्या अनेक प्रश्नांची गुंतागुंत सोडविण्यातच गेला. निर्वासितांचे पुनर्वसन, धान्याचा तुटवडा, दुष्काळ असे ते अनेक प्रश्न होते. एकूण हा काळ देशाला व अर्थव्यवस्थेला स्थैर्य देण्यात गेला. महाराष्ट्रात ह्यावेळी त्रिभाषिक राज्य होते. मंत्रिमंडळ एक अर्थाने अनेक विभागांचे (गुजराथ, कर्नाटक, पश्चिम महाराष्ट्र) कडबोळे होते. त्यामुळे प्रत्येक विभागातील मंत्री आपल्या विभागाचा विकास करण्याकरता पैसे ओढण्याचा प्रयत्न करीत असत. विकासाचा एकजीवी, एकात्मती असा दृष्टिकोन नव्हता. सुदैवाने महाराष्ट्रातील काही मान्यवर व्यक्ती मध्यवर्ती मंत्रिमंडळात होत्या. उदा., काकासाहेब गाडगीळ. त्यांच्यामुळे महाराष्ट्रात राष्ट्रीय संरक्षण संस्था (National Defence Academy), पिंपरी येथील अँटिबायोटिक कारखाने ह्या संस्था स्थापन होऊ शकल्या. वास्तविक पाहता भारतीय घटना १९५० साली व पहिली पंचवार्षिक योजना त्या दरम्यानच सुरू झाली होती. तरी विकासाबाबत शास्त्रीय दृष्टी आणि एकवाक्यता ह्यांचा महाराष्ट्रात अभावच होता. अर्थात पहिली पंचवार्षिक योजना कोणत्याही अर्थाने महत्त्वाकांक्षी प्रयोग नव्हता. मागच्याच अर्थसंकल्पाची योजनेच्या स्वरुपात ही आकृती होती. महाराष्ट्रापासून कर्नाटक वेगळा झाला व महाराष्ट्र द्विभाषिक झाला. त्यानंतर लगेच महाराष्ट्रात अशांततेचा काळ संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीमुळे उद्‌भवला. जवळजवळ सर्वच पक्षांचे लक्ष ह्याच प्रश्नाकडे होते व १९६० साली एकभाषी संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाला.

१९५६ ते १९६० हा काळ जरी महाराष्ट्रात भाषिक चळवळीमुळे अशांततेचा होता तरी सुदैवाने यशवंतरावांच्या रुपाने महाराष्ट्राला एक द्रष्टे व प्रभावी नेतृत्त्व मिळाले. यशवंतरावांना लोकांच्या प्रश्नांची जाण होती. विकासाविषयी त्यांच्या कल्पना स्पष्ट होत्या. शेती, उद्योग, लघुउद्योग, शिक्षण, कला ह्या राज्याच्या विविध अंगांचा कशा रीतीने विकास व्हायला पाहिजे ह्याचा नकाशा, आरेखन त्यांच्या मनात होते. ह्या काळात त्यांनी महाराष्ट्राच्या विकासाचा नकाशा आखून ठेवला.

संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतरही चव्हाणांची भूमिका स्पष्ट होती. त्यांनी प्रथमच जाहीर करून टाकले की हे राज्य फक्त मराठ्यांचे नसेल तर हे राज्य 'मराठी' असेल व अशा तऱ्हेने महाराष्ट्रातील ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाला सुरुंग लावला. शेतीकरता पाणी, नव्या तंत्राचा उपयोग, कृषिप्रधान उद्योगांना उत्तेजन, फलोद्योग हे शेतीच्या क्षेत्रात कार्यक्रम होते. छोटेमोठे कालवे, धरणे ह्यांना गती देणे हा त्यांच्या धोरणाचा भाग होता. त्याचबरोबर शेतीमालाला योग्य भाव मिळावेत हा त्यांचा अट्टाहास होता.

सत्तेच्या विकेंद्रीकरणाकरता जिल्हापरिषदा, तालुका परिषदा, ह्यांचा विस्तार करणे हे त्यांचे ध्येय होते. त्याचबरोबर उद्योगांचे विकेंद्रीकरण करण्याकरता त्यांनी औद्योगिव वसाहतींची बांधणी केली व लघुउद्योजकांना योग्य व्याजदराने कर्ज मिळावे ह्या दृष्टीने भरीव पावले टाकली. मोठ्या धंद्यांच्या विस्तारालाही त्यांनी योग्य उत्तेजन दिले. त्यांचे उद्योजकांशी स्नेहपूर्ण संबंध होते. यशवंतराव चव्हाण हे राष्ट्रीय दर्जाचे पुढारी होते व त्यांचे वारस मुख्यमंत्री कन्नमवार हे लोकांचे पाठबळ मिळावे म्हणून स्वतःला 'यशवंतरावांची दिंडी पुढे घेऊन जाणारा वारकरी' म्हणवून घेत यातच यशवंतरावांचे मोठेपण सिद्ध होते. यशवंतरावांच्या कार्याला जनतेची मान्यता होती. राजकारणात तर त्यांचा दबदबा होता. तसेच राज्याच्या इतर पैलूंवरही त्यांची छाप होती. उदा., साहित्य, कला, संस्कृती, नाट्य, विश्वकोश इत्यादी.

परंतु यशवंतरावांची परंपरा त्यांच्यानंतर ढासळू लागली. ह्याची दोन प्रमुख कारणे अशी की एक तर यशवंतरावांसारखी दूरदृष्टी असलेल्या नेतृत्त्वाचा अभाव व विकासाचे स्त्रोत सामान्य जनतेपर्यंत पोहोचावण्याच्या बाबतीतली उदासीनता. ह्या सर्वांचे लक्ष स्वतःच्या फायद्याकडेच आणि स्वतःचे स्थान टिकविण्याकडेच अधिक होते. कारण मुख्यमंत्रिपदावर यशवंतरावांचे वारस काही अपवाद वगळता सामान्य दर्जाचे होते. दुसरी गोष्ट म्हणजे ह्या काळात बदललेले राजकीय रंग. कॉंग्रेसमध्ये झालेली फूट व त्यामुळे पक्षात निर्माण झालेले संशयाचे वातावरण. ह्या पार्श्वभूमीवर यशवंतराव त्या संशयाचे बळी ठरले आणि ह्याच काळात कॉंग्रेसमध्ये झालेले मराठे, बिगर मराठे, शहाण्णवकुळी व इतर अशी झालेली फूट. सत्ता त्यामुळे दोलायमान झाली व तिला रस्सीखेचीचे स्वरूप आले. महाराष्ट्राच्या भव्यदिव्य नकाशाचे अवमूल्यन सुरू झाले.

कन्नमवार, सुशीलकुमार शिंदे, सुधाकरराव नाईक, बाबासाहेब भोसले, अंतुले, नारायण

राणे ह्यांच्यापासून काही भरीव काम अपेक्षिणे व्यर्थच. कारण त्यांची कारकीर्द अल्पकाळ होती व त्यातील काहींची बुद्धी व कर्तृत्त्व सुमारच होते. त्यातील काहीजणांचे स्थान अग्निशामक दलासारखे आणीबाणी निवारण्यापुरतेच होते. विलासराव देशमुख आता घोडयावर स्वार झालेले आहेत. वसंतराव नाईक इंदिरा गांधी ह्यांचे शिष्यत्त्व पत्करून अकरा वर्षे टिकले. परंतु त्यांची पार्श्वभूमी गरिबांविषयी कळकळीची होती असे म्हणता येणार नाहीत. मनोहरपंतांनी शहरी विकासाकडे लक्ष दिले, परंतु त्यांना जावयाच्या विरुद्ध आरोपांमुळे जावे लागले. विलासराव देशमुख हे पुढेमागे होणाऱ्या फळीवर बसलेले आहेत. त्यामुळे त्यांना स्थान टिकवण्यात जास्त लक्ष द्यावे लागते. तर बदलत्या राजकारणात पवारांना दिल्लीच जास्त हवीहवीशी वाटते.

वरील सर्व गोष्टींचा परिणाम म्हणजे यशवंतरावांची परंपरा पुढे रेटली गेली नाही. उलट महाराष्ट्राचा विकास रोडावला व दैनंदिन जीवनात अनेक दुष्ट प्रवृत्ती स्थिर होऊन राहिल्या. मंत्र्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप होत आहेत. ते त्यांच्या बंगल्यांचे विजेचे व इतर बिले देत नाहीत. काही शिक्षण महर्षी झाले असून न्यूनतम दर्जाच्या संस्था सुरू करून त्यांनी लोकांना फीच्या स्वरुपात ओरबाडण्याचा धंदा सुरू केला आहे. राज्यात बिल्डरांचे फावले आहे. घरांच्या किमती गगनाला भिडलेल्या आहेत. पाणी, वीज, प्राथमिक शिक्षण ह्यांचे प्रश्न सुटलेले नाहीत. राज्यात खालपासून वरपर्यंत भ्रष्टाचार हाच शिष्टाचार झालेला आहे. कायदा व सुव्यवस्था ह्याबाबत लोक साशंक आहेत. मुंबईतील गिरणगाव उध्वस्त झालेले आहे. महाराष्ट्राची राजधानी धनिकांची बटीक झालेली आहे. शासन आश्वासन देते, पण कार्यवाही मात्र करत नाही. विधिमंडळ म्हणजे गोंधळाचा बाजार झालेला आहे. जनतेच्या प्रश्नांकडे लक्ष देण्याची आवश्यकताच सभासदांना वाटत नाही.

महाराष्ट्रात विकासाकरता लागणाऱ्या पायाभूत सुविधांची वाण आहे. मुंबई एक बकाल शहर झालेले आहे. विजेचा तुटवडा, पाण्याचा अभाव, महागडे शिक्षण, बेकारी, दुष्काळ, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, अतिवृष्टी, अव्यवस्थित सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, अफाट गर्दीचा लोकल प्रवास, बिल्डरांचे वर्चस्व, लाचलुचपत, भ्रष्टाचार ह्या गोष्टी महाराष्ट्राचा स्थायीभाव झाला आहे. १९६०-२००६ म्हणजे ह्या सेहेचाळीस वर्षांत ३९ वर्षे काँग्रेसचे राज्य होते. एक अर्थाने विकासाशिवाय वरील नको त्या गोष्टींचा विकासच जास्त झाला.

ह्याचा अर्थ महाराष्ट्रात प्रगती झाली नाही असा नाही. कारण प्रगती हा नियम आहे,

अपवाद नाही. परंतु ह्या प्रगतीमुळे सामान्य जनांच्या आकांक्षांची पूर्ती झाली आहे का? सामान्य जनांच्या समस्या, प्रश्न व गाऱ्हाणी ऐकून घेतली जातात का? अग्रक्रम देऊन ती सोडविण्याचा प्रयत्न होतो का ह्याचा विचार होण्याची आवश्यकता आहे. आज मंत्रालयात कोणाचा मुक्त वावर आहे? कोणाला व्ही.आय.पी. म्हणून प्रवेश मिळतो? अर्थात ह्या राज्यकारभाराच्या शकटाचे अवमूल्यन केव्हा सुरू झाले? कन्नमवारांची निष्क्रीयता, वसंतराव नाईकांची सधनांशी जवळीक, इतर मुख्यमंत्र्यांपैकी काहींनी त्यांचीच ओढलेली री ह्यामुळे आज ही अवकळा आली आहे का? असे प्रश्न निर्माण होतात. अर्थात महाराष्ट्रात अनेक योजनांची कार्यवाही झालेली आहे. त्या योजनांचे फलित काय? त्यांचे उद्देश्य कितपत साध्य झाले आहे, त्यात काय उणिवा निर्माण झाल्या आहेत ह्या गोष्टी स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे आणि म्हणून ह्या ग्रंथात त्याची चर्चा केलेली नाही.

यशवंतराव हे एक विचार होते. त्या विचाराचा प्रभाव कमी झालेला दिसतो. ह्याबाबत महाराष्ट्र टाईम्सच्या १/५/२००६ च्या अंकात केलेले विश्लेषण मर्मभेदक आहे. प्रश्नांची ज्यांना जाण आहे वा ज्यांना जाण असून कार्य करण्याची उत्कटता आहे अशा नेतृत्त्वाची महाराष्ट्रात वाण आहे. सत्ता, भूखंड व इतर पैशांच्या नद्या ह्यावर सर्वांचे जाणीवपूर्वक लक्ष आहे. मुंबईचा पैसा आपल्या मतदारसंघात खर्च करून मुंबईच्या विकासाकडे दुर्लक्ष करण्यात सर्वच पक्षांचा अंतर्भाव होतो. ह्याबाबत कुमार केतकरांनी एक सिद्धांत मांडला आहे. तो असा की महाराष्ट्रातील राजकारणावर अर्थकारणाचा मोठा प्रभाव आहे. साखर कारखाने, सहकारी बँका, महाविद्यालये ह्यांच्यावर लोक अवलंबून असतात. ही साखळी आता तुटू लागली आहे. साखर कारखान्यांची पकड ढिली झाली आहे. ज्या अर्थकारणाच्या पायावर काँग्रेसचा डोलारा उभा होता तो पाया ढासळू लागला आहे. १९६३-१९७५ ह्या काळात फक्त वसंतराव नाईक मुख्यमंत्री होते, तर १९७५-१९८७ ह्या बारा वर्षांच्या काळात ११ वेळा मुख्यमंत्री बदलले गेले. ग्रामीण भागात अस्वस्थता निर्माण झाली व म्हणून सत्ता दोलायमान झाली.

यशवंतराव आणि बाळासाहेब खेर ह्यांना पाहिल्यावर 'मी मुख्यमंत्री पाहिला' असे कौतुकाने लोक उद्गार काढत असत. त्यांच्या नेतृत्त्वाखाली महाराष्ट्राची एक पुरोगामी, प्रगतिपर, उद्योगशील व जनताभिमुखी शासन ह्या दिशेने वाटचाल सुरू झाली होती. यशवंतरावांच्या शिकवणुकीचा व आदर्शांचा प्रभाव कमी झाला. म्हणूनच महाराष्ट्राच्या भविष्याबद्दल चिंता वाटण्यासारखी परिस्थिती आहे असे तज्ज्ञ सांगतात.

ह्या परिस्थितीवर मात करायची असेल तर जनजागृती ही चळवळ झाली पाहिजे. राज्यकर्त्यांना जनतेची भीती वाटली पाहिजे. जनता आपणास क्षमा करणार नाही ही भावना त्यांच्यात निर्माण झाली पाहिजे.

'People get the government which they deserve' ह्या म्हणीच्या संदर्भात मान वर करता आली पाहिजे. महाराष्ट्राला रानडे, लोकमान्य टिळक, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साने गुरुजी, विनोबा, एस.एम.जोशी अशी मोठी परंपरा आहे. ती त्यांनी उगवत्या पिढीकडे सुपूर्द केली आहे. उगवत्या पिढीने हे आव्हान स्वीकारून महाराष्ट्र राज्यात घुसलेल्या दुष्ट प्रवृत्ती हाकलण्याकरता जनजागृतीची चळवळ उभारली पाहिजे. हीच ह्या नेत्यांना श्रद्धांजली आहे. ''सज्जनांचा पुरस्कार, दांभिकांचा धिक्कार, दीनदुबळ्यांचा कैवार आणि भ्रष्टाचारावर प्रहार'' अशा तत्त्वाने स्फुरलेले नेतृत्त्व महाराष्ट्रात आले पाहिजे.

ooo

---

<u>संदर्भ</u> :

१) प्रकाश अकोलकर -'यशवंतराव ते विलासराव', दीपलक्ष्मी दिवाळी अंक, २००६.

२) महाराष्ट्र टाईम्स -१/५/२००६.

३) पुण्यनगरी - रविवार दि. २४/१२/०६, पृष्ठ ६.

४) कुमार केतकर -'महाराष्ट्राचा अर्थ अनर्थ', लोकसत्ता, दि. १७/१०/२००४, पृष्ठ १,३.

# २२. मुख्यमंत्र्यांचे त्यांच्या मतदारसंघातील कार्य

मुख्यमंत्री हा सर्व राज्याचा मुख्यमंत्री असतो. साहजिकच त्याला राज्याच्या सर्वंकष विकासाकडे लक्ष द्यावे लागते. परंतु मतदार संघ हे मुख्यतः मंत्र्याचे माहेर व तेथील रहिवाशी त्यांचे मायबाप. कारण मंत्र्याची राजकीय कारकीर्द त्याच्यावर अवलंबून असते. साहजिकच असा प्रश्न निर्माण होतो की ज्या मतदार संघातून तो निवडून आला त्या मतदारसंघातील प्रश्न व समस्या सोडविण्याकरता त्याने काय केले ?

अर्थात ह्या प्रश्नाचे उत्तर देणे कठीण आहे. आज महाराष्ट्रातील तीन मुख्यमंत्री केंद्रात कॅबिनेट दर्जाचे मंत्री आहेत. शरद पवार, सुशीलकुमार आणि अंतुले. त्यांनी त्यांच्या मतदार संघाकरता काय केले तर बहुतेक निराशाच पदरी येईल. कारण ह्या मंत्र्यांच्या अधिकारावरही मर्यादा असतात. केंद्रशासनात नियोजित योजनेप्रमाणे काम करावे लागते. दुसरे म्हणजे त्यांना त्यांच्या अधिकारात असलेल्या क्षेत्रातच सर्व देशाचा विचार करून योजना हाती घ्याव्या लागतात. तिसरे महत्त्वाचे कारण भारत हे संघराज्य असून केंद्र सरकार व राज्य सरकार ह्यांच्या अधिकारात कोणत्या गोष्टी असतात ह्याची घटनेत तरतूद आहे. त्यानुसार प्रामुख्याने राज्य शासनाला स्थानिक प्रश्नांकडे लक्ष द्यावे लागते. अर्थात आपल्या मतदारसंघाकरता ते किरकोळ गोष्टीच करू शकतात व त्याची माहिती लाभार्थींकडून सर्वेक्षण करूनच मिळू शकते.

राज्यातील मुख्यमंत्री घेतले तर त्यांच्याकडे त्या त्या मतदार संघातील गरजा, ज्या विभागातून ते येतात त्या विभागाच्या गरजा येतात (उदाहरणार्थ, महाराष्ट्रात पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ) व एकंदर राज्याच्या गरजा अशी त्रिदल जबाबदारी असते.

सर्व राज्याच्या गरजांना प्राधान्य द्यावे लागते. विविध भागांच्या विकासाकरता वैधानिक मंडळे आहेत. ही मंडळे दांडेकर समितीच्या शिफारशीनुसार राज्यातील अनुशेष भरून काढण्याकरता सूचना करतात व त्या मंडळाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार प्रादेशिक असमतोलता कमी करण्याकरता कार्यक्रम हाती घ्यावा लागतो. भारत हे संघराज्य असल्यामुळे राज्याला काही विशिष्ट क्षेत्रांतील (राज्यसूचीतील) विषयांबाबतच कार्यक्रम हाती घ्यावा लागतो. त्याचबरोबर राज्याला आपल्या आर्थिक परिस्थितीचाही विचार करावा लागतो. आपल्या

मतदार संघातील विकासाला मंत्र्याच्या कार्यात तसा वरचा अग्रक्रम नसतो व मंत्री काही किरकोळ बाबीकरता मदत करू शकतो. प्रत्येक आमदाराकडे व मंत्र्याकडे त्याच्या मतदारसंघात खर्च करण्याकरता काही निधी उपलब्ध असतो. त्यातून किरकोळ कामे मंत्री करतात. उदाहरणार्थ, एखादा हॉल बांधून देणे, गावातील दवाखान्याचा विकास करणे, स्मशानभूमी अद्ययावत करणे वगैरे. परंतु मतदार संघात अनेक गावे असतात. त्यांच्या गरजा निरनिराळ्या असतात व मंत्र्यांच्या कामाची जंत्री त्या योजनेमुळे झालेल्या कार्याचे मूल्यमापन सर्वेक्षण करूनच करता येईल. हा अभ्यासाचा वेगळा, स्वतंत्र व महत्त्वाचा विषय आहे. ह्या सर्व मर्यादा लक्षात घेऊन मुख्यमंत्र्यांनी आपल्या मतदारसंघातील केलेल्या ठळक कामांची माहिती देण्याचा प्रयत्न पुढील परिच्छेदात केला आहे. अर्थात तो त्रोटक आहे, परिपूर्ण नाही. तो केवळ सूचक (indicative) आहे. ह्या मर्यादा लक्षात ठेवल्या पाहिजेत.

धनशा कूपर हे प्रभारी प्रधानमंत्री होते. त्यांच्या कारकिर्दीचा काळ फक्त सहा महिन्यांपुरताच मर्यादित होता. त्यामुळे त्यांची वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी नाही. एकाच गोष्टीचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. ती म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकरांची बंदिवासातून सुटका.

बाळासाहेब खेर हे त्रिभाषिक मुंबई राज्याचे मुख्य प्रधानमंत्री. ते विद्यापीठ मतदारसंघातून निवडून आले होते. शिक्षण हा त्यांचा आवडता विषय होता. बाळासाहेब ज्यावेळी दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले त्यावेळी त्यांनी एस.एन.डी.टीं. विद्यापीठाला शासकीय मान्यता देऊन त्या विद्यापीठाच्या पदव्यांना इतर सर्व विद्यापीठांप्रमाणे मान्यता मिळवून दिली. त्यांनी पुणे विद्यापीठाची स्थापना केली व विद्यापीठाकरता गणेश खिंडीतील राज्यपालांच्या वसतिस्थानाची जागा दिली. १९५२च्या सुमारास मुंबईतील इस्माईल युसुफ बंद करण्याचे घाटत होते. ते महाविद्यालय तसेच चालू ठेवण्याचे बाळासाहेबांनी ठरविले. त्यांचे खेरवाडीतील कार्यही संस्मरणीय आहे. ह्या वाडीस पूर्वी 'चामडेवाडी की वाडी' असे म्हणत असत. त्या ठिकाणी प्रामुख्याने चांभारांची वस्ती होती. बाळासाहेब खेरांनी बांद्रा स्टेशन ते टॅनर्स कॉलनीपर्यंत रस्ता करून घेतला (१९३७-३९). चांभारांना तांत्रिक शिक्षण देण्याकरता ट्रेनिंग व लेदर वर्क्स इन्स्टिट्यूट ही संस्था सुरू केली. लोकांनी ह्या वाडीचे नाव 'चामडेवाल्यांची वाडी' ऐवजी 'खेरवाडी' असे करून घेतले ते खेरांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याकरता. तेथील लोकांनी बाळासाहेबांचा तेथे पुतळा उभा केला. आधाररहित महिलांविषयी बाळासाहेबांना अत्यंत सहानुभूती होती व त्यामुळे त्यांनी माटुंगा येथील महिला श्रद्धानंद आश्रमाला भरपूर मदत केली. त्यांनी लीगल एड सोसायटी स्थापन केली. टेलिग्राफ

कार्यालयाकरता क्रॉस मैदानावर जागा दिली. डेक्कन कॉलेज १९३४ पासून बंद होते. ते त्यांनी पदव्युत्तर शिक्षणसंस्था म्हणून पुन्हा सुरू केले. मुंबईच्या लॉ कॉलेजचे सरकारी महाविद्यालयात रुपांतर केले.

कान्हेरी नॅशनल पार्क स्थापून पशुपक्षांच्या अभ्यासाला उत्तेजन दिले. कला विद्यालयाची स्थापना केली. मुंबईत मध्यवर्ती ग्रंथालयाची स्थापना करून त्याचे व्यवस्थापन व प्रशासन एशियाटीक सोसायटीकडे दिले. महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था स्थापन करून (१९४८) कामगार कल्याण अधिकारी ह्या पदाकरता शिक्षणाची सोय केली. चर्चगेट येथील सिडनहॅम महाविद्यालयाच्या इमारतीचा पायाभरणी समारंभ बाळासाहेबांच्या हस्ते झाला.

मोरारजी देसाई १९५२ ते १९५६ पर्यंत त्रिभाषिकाचे मुख्यमंत्री होते. महाराष्ट्रात तो काळ भाषावार प्रांताच्या चळवळीमुळे अशांततेचा होता. त्यामुळे त्यांना फारसे काही करता आले नाही. शिवाय मोरारजी हे अतितत्त्वनिष्ठ असल्यामुळे त्यांनी आपल्या मतदारसंघाकरता (बलसाड) काही केल्याचे दिसत नाही.

मोरारजींनंतर यशवंतराव मुख्यमंत्री झाले. हे राज्य 'मराठा' असणार नाही, 'मराठी' असेल अशी त्यांनी सुरुवातीलाच घोषणा केली. ते सातारा मतदार संघातून निवडून आलेले होते. अर्थात त्यांचा प्रथमचा काळ संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा होता. त्यांच्या कारकिर्दीतील ठळक गोष्ट म्हणजे कोयना धरणाची बांधणी व साखर कारखान्यांना त्यांनी दिलेले उत्तेजन. सैनिकी शिक्षणाकरता त्यांनी साताऱ्यास सैनिकी शाळा काढली. अर्थात यशवंतराव हे महाराष्ट्राच्या जडणघडणीचे अध्वर्यु होते.

दादासाहेब कन्नमवारांची मुख्यमंत्री कारकीर्द अत्यंत अल्पकाळ होती. त्यांनी यवतमाळ जिल्ह्यात शेतकऱ्याच्या मालकीची सहकारी सूत गिरणी सुरू केली आणि विदर्भातील शेतकऱ्यांना कापसाला योग्य भाव मिळावा म्हणून एकाधिकार कापूस योजना सुरू केली.

कन्नमवारांच्या अकस्मात मृत्युमुळे वसंतराव नाईक मुख्यमंत्री झाले. ते जवळजवळ बारा वर्षे मुख्यमंत्री होते. यवतमाळ जिल्ह्याची दळणवळणाच्या दृष्टीने फारशी प्रगती झालेली नव्हती. त्यावेळी नाईकांनी रस्ते तयार करण्याच्या योजना आखल्या. पांढरकवडा तालुक्यातील सायखेडा येथे व पुसद तालुक्यातील पुसद धरण बांधण्यास साहाय्य केले. तसेच १९५७ साली त्यांच्या प्रयत्नांमुळे विद्युतीकरण झाले. त्यांनी बंजारा समाजाला शिक्षण घेण्यास व शेती करण्यास उत्तेजन दिले. त्यांना दारूपासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला.

त्यांच्या स्त्रियांच्या पोषाखात बदल घडवून आणला. 'तांडा तेथे शिक्षण' ही नाईकांची घोषणा होती. त्यांनी आपल्या समाजाकरता आश्रमशाळा सुरू केल्या. जिनिंग, प्रोससिंग हे कारखाने काढण्यास उत्तेजन दिले. पुसद भागात द्राक्षाच्या उत्पादनाला गती दिली. हाताला काम आणि शेतीला पाणी हे सूत्र लोकांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न केला. जनता शिक्षण प्रसारक मंडळ स्थापन केले. ह्या संस्थेची आज सहा महाविद्यालये पुसद येथे आहेत. त्यात कला, वाणिज्य, विज्ञान, गृहविज्ञान, औषधी निर्माण, अभियांत्रिकी, शारीरिक शिक्षण, तंत्रशिक्षण अशा विद्याशाखांचा समावेश होतो. त्यांनी येथील ग्रामीण भागात विद्यालये व वसतिगृहे स्थापन करण्यास उत्तेजन दिले.

शंकरराव चव्हाण महाराष्ट्राचे दोनदा मुख्यमंत्री होते. ते मराठवाड्यातील पहिले मुख्यमंत्री. त्यांनी जायकवाडी व विष्णुपुरी हे उपसा जलसिंचन प्रकल्प पूर्ण केले. विष्णुपुरी प्रकल्प पूर्ण करून त्यांनी नांदेड शहराच्या पाण्याचा प्रश्न सोडविला. सर्व प्रदेशांचा विकास समतोल व्हावा हीच शंकररावांची भूमिका होती. ते वैधानिक विकास मंडळांच्या स्थापनेच्या विरुद्ध होते. प्रकल्प बांधून कोरडवाहू जमिनीला पाणीपुरवठा करण्यास उत्तेजन दिले. येलदरी बांधून नांदेड शहराच्या विजेचा प्रश्न सोडवला. परभणी येथे कृषी विद्यापीठ स्थापण्यात पुढाकार घेतला. ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासाकरता मराठवाडा ग्रामीण विकास बँक स्थापन करण्यात पुढाकार घेतला. मराठवाड्यात नवोदय विद्यालय स्थापण्यात पुढाकार घेतला. त्यांनी नांदेड येथे शारदाभवन शिक्षण संस्था व धर्माबाद शिक्षण संस्था स्थापन केल्या. पुणे येथे मराठवाडा मित्रमंडळ स्थापून त्या ठिकाणी वसतिगृहाची व्यवस्था केली.

वसंतदादा पाटील चार वेळा मुख्यमंत्री होते. त्यांनी विनाअनुदान तत्त्वावर शिक्षणसंस्था स्थापण्यास उत्तेजन दिले. त्यामुळे त्यांच्या मतदार संघातही अशी विद्यापीठे स्थापन झाली. दादा सांगली भागातील विवेकानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष होते. लठ्ठे शिक्षण संस्थेचे महाविद्यालय स्थापण्यात व मिरज येथील मेडिकल महाविद्यालयाचा विस्तार करण्यास त्यांनी मदत केली.

शरद पवारही चार वेळा मुख्यमंत्री होते. त्यांनी बारामतीस जे प्रकल्प उभारले आहेत ते पवार बंधूंच्या आणि पवार कुटुंबियांच्या श्रमांचे फलित. त्यांनी आपल्या मतदार संघात दुधाच्या धंद्याला विकासाला उत्तेजन दिले. त्याकरता सहकारी संस्था स्थापण्यास मदत केली. कृषिपूरक उद्योग व फलोद्योग ह्यांच्या वाढीसाठीही साहाय्य केले. त्याचप्रमाणे रयत शिक्षण

संस्थेच्या महाविद्यालयाच्या विकासात भाग घेऊन तेथील लोकांना शिक्षण घेण्यास संधी उपलब्ध करून देण्यात पुढाकार घेतला.

अंतुले ह्यांनी छोट्या बंदरांच्या विकासाकरता खूप प्रयत्न केले. त्यांनी बऱ्याच गोष्टी करण्याची आश्वासने दिली होती, पण त्यांची पूर्तता ते करू शकले नाहीत. कारण त्यांना मुख्यमंत्रिपदच लवकर गमवावे लागले. तरीसुद्धा रत्नागिरी जिल्ह्याचे विभाजन, कुलाबा जिल्ह्याचे 'रायगड' असे नामांतर, आणि दाभोळसह कोकणातील चार लघु बंदरांच्या विकासाला मंजुरी ह्या गोष्टी त्यांनी आपल्या मतदारसंघात केल्या.

बाबासाहेब भोसले हे नेहरूनगर मतदार संघातून विधानसभेत निवडून आलेले. महसूल न्यायमंडळाचे ते सदस्य असताना ते हाजी अली येथील शासकीय वसतिस्थानात राहत होते. त्या ठिकाणी त्यांनी एक हॉल बांधून दिला व त्या ठिकाणी कल्याण समितीची स्थापना केली. नेहरूनगर विभागाकरता रेल्वे अंडरब्रीज बांधून घेतला. त्यामुळे नेहरूनगर व चुनाभट्टी जोडले गेले. कुर्ल्यास एस.टी.डेपो स्थापन केला. त्या ठिकाणी स्वतंत्र रेशनिंग ऑफिसची सोय केली. स्वतंत्र पोलिस स्टेशनही उभे केले आणि ट्रॅफिक सिग्नल बांधून घेतला.

शिवाजीराव निलंगेकर पाटील मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी मराठवाडा विकासाचा एक कार्यक्रम जाहीर केला होता. परंतु त्यांची कारकीर्द अत्यल्प ठरली.

सुधाकरराव नाईकांचा पुसद हाच मतदारसंघ. त्यांना मुख्यमंत्रिपद अल्पकाळ लाभले. त्यांनी आपल्या मतदार संघात सुताच्या गिरण्या स्थापन करण्यास उत्तेजन दिले. त्यांनी स्वतः पत्रकारिता केलेली असल्यामुळे पत्रकारांना शिक्षण देण्याकरता त्यांनी यवतमाळ येथे एक ट्रस्ट स्थापन केला. संत तुकडोजी महाराजांचे वाङ्मय छापण्यात पुढाकार घेतला आणि महात्मा गांधी यांचे चरित्र अल्प किंमतीत उपलब्ध करून देण्यासाठी एक योजना आखली.

मनोहर जोशी हे धारावी-दादर भागातून निवडून आलेले होते. त्यांनी मुंबईकरता उड्डाणपूल व मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग कार्यान्वित केला. झोपडपट्टीवासीयांना मोफत घरे देण्याची योजना आखली. धारावी स्लम्सचे स्वच्छीकरण करण्याची मोहीम हाती घेतली. झुणकाभाकर योजना सुरू केली. मुंबईत जागोजागी सुलभ स्वच्छतागृहे बांधवून घेतली. त्यांनी स्मार्टपिटीची योजना सुरू केली. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाला ५० लाख रुपयांचे अनुदान शासनाकडून देण्याचे जाहीर केले.

नारायण राणे हे अल्पकाळच मुख्यमंत्री होते. ते मालवण मतदार संघातून निवडून आले

होते. जिजामाता आधार योजना, बळीराजा संरक्षण योजना ह्यांना त्यांनी चालना दिली. स्त्रियांत औद्योगिक शिक्षणाची आवड निर्माण करण्याकरता त्यांनी स्त्रियांना अशा संस्थांमध्ये मोफत शिक्षणाची सोय केली.

विलासरावांच्या कारकिर्दीत अनेक समस्या आहेत. त्यांनी ग्राम अँभियान व संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियानाच्या कार्याला चालना दिली. संगणकीकरण व माहिती तंत्रज्ञान ह्यांच्या शिक्षणाला उत्तेजन दिले. लोकसंख्येचे नियंत्रण करण्याकरता त्यांनी जनजागृतीची मोहीम आखली. सुदैवाने ते आजही अधिकारपदावर आहेत व त्यांच्याकडून खूप अपेक्षा आहेत.

सुशीलकुमार शिंदे फारच अल्पकाळ मुख्यमंत्री होते. ते सोलापूर मतदार संघातून निवडून आलेले होते. ह्या अल्पकाळात त्यांनी सोलापूर विद्यापीठ स्थापण्यात पुढाकार घेतला. सोलापूरकरता त्यांनी तुळजापूर-सोलापूर रस्त्यावरील हलगर गावात आश्रमशाळा सुरू केली. सोलापुरातील सिव्हील हॉस्पिटलचा विस्तार केला. सोलापूरला कामगार विमा रुग्णालय स्थापन केले. तेथे विमानतळ उभारला. आकाशवाणी केंद्र सुरू केले. औद्योगिक वसाहतीची उभारणी केली. शेठ हिराचंद विद्यालयाचा विस्तार केला. स्मशानभूमीचा कायापालट केला. सोलापूरच्या पाण्याचा प्रश्न सोडवला. सोलापुरात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दूरध्वनी सेवा उपलब्ध करून दिली.

एक म्हण आहे की If wishes were horses beggars would ride on them. त्याप्रमाणे मुख्यमंत्र्यांच्या मनात स्वतःच्या मतदारसंघाकरता अनेक गोष्टी करण्याची इच्छा असली तरी त्यांच्या पदामुळे त्यांच्यावर इतक्या मर्यादा पडतात की त्यांना स्वतःच्या मतदार संघाकरता फारसे काही करता येत नाही. शिवाय महाराष्ट्रात मुख्यमंत्र्याची कारकीर्द इतकी अनिश्चित असते की मतदारसंघाचा विचार करण्यास अवधीच सापडत नाही. त्याचबरोबर असा विकास करण्याचा थोडा जरी प्रयत्न झाला की तो मुख्यमंत्री टीकेचा विषय होतो. ह्या संदर्भात शंकरराव चव्हाणांवर झालेली टीका अनेकांना आठवत असेल. म्हणूनच मुख्यमंत्र्याच्या कारकिर्दीचे मूल्यमापन हे त्याने महाराष्ट्राकरता काय केले ह्यावरच ठरविले पाहिजे. विशिष्ट मतदारसंघाचा विकास हा एकूण महाराष्ट्राच्या विकासातच अंतर्भूत आहे. त्यातूनच विकासाचा झरा त्या त्या मतदारसंघात झिरपतो.

ooo

# (परिशिष्ट)

## जीवनपट

**<u>श्री यशवंतराव चव्हाण</u>**

| | |
|---|---|
| १२ मार्च १९१३ | सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे येथे जन्म |
| १९३०-३२ | कायदेभंगाच्या चळवळीत सहभाग व १८ महिने शिक्षा |
| १९३४ | मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण, राजाराम महाविद्यालयात प्रवेश |
| १९३५ | महाराष्ट्रातील समाजवादी पक्षाचे संस्थापक सदस्य |
| १९३८ | मुंबई विद्यापीठातून बी. ए. |
| १९४० | एल.एल.बी. |
| १९४२ | सौ. वेणुताईंशी विवाह व चले जाव चळवळीत भाग |
| १९४२-४५ | तुरुंगवासातून सुटका |
| १९४६ | कऱ्हाड मतदार संघातून मुंबई विधिमंडळाच्या निवडणुकीत गृहखात्याचे पार्लमेंटरी सेक्रेटरी |
| १९५२ | कऱ्हाड मतदारसंघातून पुन्हा निवड, नागरी पुरवठामंत्री |
| १९५६ | द्विभाषिक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री |
| १९६० | महाराष्ट्र राज्याची स्थापना व पहिले मुख्यमंत्री |
| १९६२ | स्वतंत्र भारताचे संरक्षणमंत्री |
| १९६६ | भारताचे गृहमंत्री |
| १९६९ | कानपूर विद्यापीठाची डी. लिट. |
| १९७० | भारताचे अर्थमंत्री |
| १९७२ | सातारा जिल्ह्यातून लोकसभेवर निवड |
| १९७४ | भारताचे परराष्ट्रमंत्री |
| १९७६ | परभणी कृषिविद्यापीठाची डी. लिट. |
| १९७८ | लोकसभेत विरोधी पक्षनेते |
| १९७९ | चौधरी चरणसिंग मंत्रिमंडळात उपपंतप्रधान |
| १९८० | कऱ्हाड मतदारसंघातून लोकसभेत निवड |
| १९८२ | इंदिरा कॉंग्रेसमध्ये प्रवेश |
| १९८२ | आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष |
| १९८३ | वेणुताईंचे निधन |

| | |
|---|---|
| १९८४ | पुणे विद्यापीठाची डी. लिट. ही सन्माननीय पदवी |
| ७-२-१९८४ | 'कृष्णाकाठ'च्या पहिल्या खंडाचे प्रकाशन |
| २५-११-१९८४ | निधन |

**श्री. वसंतराव नाईक**

| | |
|---|---|
| १ जुलै १९१३ | गहुली येथे जन्म |
| १९३३ | मॅट्रिक परीक्षा नागपूरहून उत्तीर्ण |
| १९३७ | बी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण |
| ६ जुलै १९४१ | कु. वत्सला घाटे हिच्याशी विवाह |
| १९४६-५० | पुसद तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष |
| ऑक्टो. १९४६ | पुसद नगरपालिकेचे अध्यक्ष |
| १९५२ | जुन्या मध्यप्रदेशात उपमंत्री |
| १९५६ | द्विभाषिकात यशवंतरावांच्या मंत्रिमंडळात सहकार, कृषी, व दुग्धविकास खात्यांचे मंत्री |
| १९५७ | मंत्रिमंडळात कृषिमंत्री म्हणून नियुक्ती - दुसऱ्यांदा निवड |
| १९५९ | भूदानाच्या कार्याला मदत |
| १९६० | १ मे १९६० - ४ डिसें.१९६३ महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळात महसूल मंत्री, जमीनधारण क्षेत्रासंबंधी कायदा |
| १९६२ | पुसद मतदारसंघातून निवड |
| १९६३-१९७५ | ५ डिसेंबर १९६३ ते २० फेब्रुवारी १९७५ अकरा वर्षे मुख्यमंत्री |
| १९७२ | महाराष्ट्रात दुष्काळ रोजगार हमी योजना |
| २०/२/१९७५ | श्रेष्ठींच्या इच्छेनुसार मुख्यमंत्रिपद सोडले |
| १९७७ | वाशिम निर्वाचन क्षेत्रातून लोकसभेवर निवड |
| १८ऑगस्ट १९७९ | सिंगापूर येथे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने वयाच्या ६६व्या वर्षी निधन |

**श्री. शंकरराव चव्हाण**

| | |
|---|---|
| १९२० | १४/७/२० रोजी पैठण येथे जन्म |
| १९३९ | मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण |
| १९४२ | राजकारणात प्रवेश |

| | |
|---|---|
| १९४३ | बी.ए. |
| १९४४ | श्रीमती कुसुमताईंशी विवाह |
| १९४५ | एल.एल.बी. उत्तीर्ण, वकिली सोडून काँग्रेस चळवळीत भाग |
| १९४८-५३ | नांदेड जिल्हा काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस |
| १९५३ | नांदेड नगरपालिकेचे अध्यक्ष |
| १९५५ | हैद्राबाद प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस |
| १९५३ | मुंबई द्विभाषिकात महसूल उपमंत्री |
| १९५७ | विधानसभेच्या निवडणुकीत धर्माबाद मतदार संघातून यशस्वी |
| १९६० | संयुक्त महाराष्ट्राच्या यशवंतरावांच्या मंत्रिमंडळात पाटबंधारे, वीज व दळणवळण मंत्री |
| १९६२ | कै. मा. सा. कन्नमवार मंत्रिमडळात पुन्हा पाटबंधारे व वीजमंत्री |
| १९६३ | वसंतराव नाईकांच्या मंत्रिमंडळात पाटबंधारे व वीजमंत्री, जायकवाडी प्रकल्प |
| १९६७ | महाराष्ट्र विधानसभा पक्षाच्या उपनेतेपदी निवड |
| १९७२ | भोकर (धर्माबाद) मतदारसंघातून विधानसभेवर चौथ्यांदा निवड. वसंतराव नाईकांच्या मंत्रिमंडळात कृषी व राज्य परिवहन मंडळाचे मंत्री |
| १९७५-७७ | एका मताने महाराष्ट्राच्या विधिमंडळाच्या नेतेपदी निवड आणि मुख्यमंत्री |
| १९७५ | गोदावरी पाणीतंटा सोडविण्यात यशस्वी. संत वांङमयाच्या अभ्यासासाठी पैठण येथे विद्यापीठाची स्थापना. उर्दू अकादमीची स्थापना. इंदिरा गांधी ह्यांच्या वीस कलमी कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी. |
| १९७६ | काळम्मावाडी धरणाचा प्रस्ताव यशस्वी. झोपडपट्टीनिर्मूलन, भिकारी हटाव मोहीम, सक्तीच्या लोकसंख्या नियंत्रणाचे विधेयक |
| १९८० | पाटबंधारे मंत्री |
| १ ऑक्टो.१९८० | केंद्रीय मंत्रिमंडळात शिक्षणमंत्री |
| १९८१-८४ | नियोजनमंत्री |
| १९८६-८८ | १२/३/८६ ते २६/६/८८ मुख्यमंत्रिपद |
| १९९१-१९९५ | गृहमंत्री |

| | |
|---|---|
| १९९७ | राज्यसभेचे सभासद |
| २७/२/२००३ | सौ. कुसुमताईंचे निधन |
| १४/२/२००४ | अपघात |
| २६/२/२००४ | निधन |

**श्री. वसंतदादा पाटील**

| | |
|---|---|
| १३/११/१९१७ | जन्म पदभाळे येथे, सातवीपर्यंत शिक्षण |
| १९३० | या सालापासून राजकीय चळवळीत भाग |
| १९३७ | सांगली तालुका कॉंग्रेसचे सरचिटणीस |
| १९४२ | 'चले जाव' चळवळीत भाग व शिक्षा |
| १९५७ | विधिमंडळाचे सदस्य म्हणून निवड |
| १९६३ | वसंतराव नाईकांच्या मंत्रिमंडळात पाटबंधारे मंत्री |
| १९६७ | पद्मविभूषण |
| १९६९ | महाराष्ट्र कॉंग्रेस व राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे अध्यक्ष |
| १९७७ | मुख्यमंत्री |
| १९७८ | मुख्यमंत्री |
| १९७८ | मुख्यमंत्री |
| १९८३-८५ | मुख्यमंत्री (२/२/८३ ते ९/३/८५ आणि १०/३/८५ ते १/६/८५) |
| १९८५-८७ | राजस्थानचे राज्यपाल |
| १/३/८९ | निधन |

**श्री. शरद पवार**

| | |
|---|---|
| १२ डिसेंबर १९४० | बारामती, जिल्हा पुणे येथे जन्म |
| १९६२ | बी.कॉम., बृहन्महाराष्ट्र कॉलेज, पुणे |
| १९६४ | महाराष्ट्र युवक कॉंग्रेस चिटणीस |
| १९६७ | बारामती मतदार संघातून महाराष्ट्र लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सदस्य म्हणून निवड |
| १९७२-७४ | गृह, अन्न, सिव्हिल सप्लाईज उपमंत्री |
| १९७८-८० | महाराष्ट्राचे मुख्यमंत्री |
| १९८१-१९८४ | महाराष्ट्र लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्ये विरोधीपक्ष नेते |


| | |
|---|---|
| १९८४ | बारामतीहून लोकसभेवर निवड |
| १९८८ | महाराष्ट्राचे मुख्यमंत्री |
| १९९० | महाराष्ट्राचे मुख्यमंत्री |
| जून ९१ ते मार्च ९३ | केंद्रात संरक्षणमंत्री |
| मार्च ९३ ते मार्च ९५ | महाराष्ट्राचे मुख्यमंत्री |
| १९९८ | लोकसभेत विरोधीपक्ष नेते |
| मे १९९९ | नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष |
| २००४ | केंद्रीय कृषिमंत्री |
| नोव्हें. २००५ | भारतीय क्रिकेट कंट्रोल बोर्डाचे अध्यक्ष |

ooo

---

संदर्भ :

टाईम्स ऑफ इंडिया -सोमवार १२, डिसेंबर २००५


मध्यप्रदेश
नंदुरबार
गुजरात
धुळे
जळगाव
बुलढाणा
अमरावती
अकोला
वर्धा
नागपूर
भंडारा
नाशिक
औरंगाबाद
जालना
वाशीम
यवतमाळ
चंद्रपूर
गडचिरोली
हिंगोली
परभणी
आंन्ध्र प्रदेश
ठाणे
मुंबई उपनगर
बांद्रा
मुंबई
अहमदनगर
बीड
नांदेड
अलिबाग
रायगड
पुणे
उस्मानाबाद
लातूर
महाराष्ट्र
राजकीय
सोलापूर
सातारा
सांगली
रत्नागिरी
कोल्हापूर
कर्नाटक
ओरोस बुद्रुक
सिंधुदुर्ग

## डॉ. बाळकृष्ण रायरीकर

* जन्म : १९२०
* १९४५ साली मुंबई विद्यापीठातून अर्थशास्त्र हा विषय घेऊन एम.ए.
* युसुफ इस्माईल व सिडनहॅम महाविद्यालयांमध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक होते.
* एलफिन्स्टन महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख होते.
* लाला लजपतराय महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य.
* एन.एम. इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजतर्फे 'प्रोफेसर एमेरिटस' या किताबाने सन्मानित.
* महाराष्ट्र श्रमविज्ञान संस्थेचे प्राचार्य होते.
  कामगारांच्या वेतनविषयक प्रश्नांचे एक तज्ज्ञ मार्गदर्शक.
* राज्य सरकारच्या किमान वेतन आयोगाचे माजी सदस्य.
* महाराष्ट्र शासनाच्या एन.सी.सी. विभागाचे विशेष अधिकारी म्हणून कार्य केले.
* एशियाटीक सोसायटी, मुंबई या संस्थेचे अध्यक्षपद भूषविले.
* एम.कॉम., एम.फील. आणि पी.एच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांचे गाईड म्हणून मुंबई विद्यापीठातर्फे निवड. मुंबई विद्यापीठाच्या वाणिज्य शाखेचे प्रमुख होते.
* शैक्षणिक आणि आर्थिक क्षेत्रांमध्ये जबाबदारीची अनेक पदे सांभाळली.
* महाराष्ट्र टाईम्स आणि लोकसत्ता या दैनिकांमधून विद्वत्तापूर्ण लेखन.

## डॉ. श्रीनिवास वसंतराव सुरनीस

* पुणे विद्यापीठाची एम.कॉम. पदवी व मुंबई विद्यापीठाच्या एम.फील., पी.एच.डी. पदव्या संपादन केल्या.
* मुंबई येथील चेतना महाविद्यालयात प्राचार्य आणि वाणिज्य व व्यवस्थापन विषयाचे प्राध्यापक, वाणिज्य विभागप्रमुख तसेच प्रपाठक वाणिज्य विभाग म्हणून काम केले.
* ३३ वर्षांचा प्रदीर्घ शैक्षणिक अनुभव.
* मुंबई विद्यापीठ व पद्मश्री डी.वाय. पाटील विद्यापीठातर्फे पी.एच.डी. आणि एम.फिल. गाईड म्हणून मान्यता.
* 'आमचे मुख्यमंत्री' या पुस्तकासाठी डॉ. रायरीकर यांचेसह एक महत्त्वपूर्ण योगदान.